सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. २० जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक १०८ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## लहान व पूर्वेकडील राज्यांच्या विकासाशिवाय विकसित भारताची कल्पना अपूर्ण : अमित शहा

देहराडून, १९ जुलै : वर्ष २०४७ मध्ये विकसित भारताची कल्पना तेव्हाच पूर्ण होईल, जेव्हा लहान व पूर्वेकडील राज्यांचा समावेशक विकास होईल. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या राज्यांच्या विकासासाठी पूर्ण बांधिलकीने कार्य करत आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी केले. याच कार्यक्रमात त्यांनी घोषणा केली की, २०२७ मध्ये भारत जगातील तिसरी सर्वात मोठी आर्थिक शक्ती म्हणून उभा राहील.

अमित शहा रुद्रपूरमध्ये आयोजित उत्तराखंड गुंतवणूक महोत्सव २०२५ मध्ये बोलत होते. या कार्यक्रमात अमित शहा यांच्या हस्ते ५ योजनांचे लोकार्पण आणि १३ योजनांचे भूमिपूजन करण्यात आले. त्यांनी सांगितले की, मी जेव्हा जेव्हा उत्तराखंडमध्ये येतो, तेव्हा एका नवीन ऊर्जा घेऊन परत जातो.



कारण येथे आल्यानंतर चार धामांमध्ये वास करणाऱ्या सर्व देवी-देवतांचे आणि अध्यात्माचा जागर करणाऱ्या संतांचे आशीर्वाद मिळतात. एका बाजूला पर्वत शिखरे संपूर्ण जगाला अध्यात्मिक उंचीवर घेऊन जाण्याचे कार्य करत आहेत, तर दुसऱ्या बाजूला येथे वास्तव्यास असलेले साधूसंत भारतीय संस्कृतीला अधिक बळकट करत आहेत. येथील नद्या देशाच्या निम्म्या भागाला सिंचन व पिण्याच्या पाण्याचा स्रोत पुरवतात.

शहा पुढे म्हणाले की, उत्तराखंड सरकारने औद्योगिक विकास आणि पर्यावरण यामध्ये संतुलन राखले आहे. रोजगाराला स्थायित्व दिले आहे. नितीमध्ये पारदर्शकता, अंमलबजावणीत गती आणि दृष्टीकोनात दूरदृष्टी असलेली धोरणं राबवली आहेत. यामुळे उत्तराखंडच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा उभा राहिला आहे.

तसेच, त्यांनी हेही स्पष्ट केले की उत्तराखंडच्या राज्याच्या लढ्यात काँग्रेसने आंदोलनकर्त्यांवर अत्याचार केले, पण तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी उत्तराखंडसह झारखंड आणि छत्तीसगड यांची स्वतंत्र राज्य म्हणून घोषणा केली. अटलजींनी तीन राज्ये तयार केली आणि आता मोदी सरकार ही राज्ये विकासाच्या नव्या शिखरांवर घेऊन जाण्यासाठी काम करत आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांनी मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांची विशेष स्तुती केली. त्यांनी सांगितले की, मैदानी भागांमध्ये उद्योग सुरू करणे सोपे असते, पण उत्तराखंडसारख्या लहान राज्यात, जेथे भौगोलिक अडचणी मोठ्या आहेत, तिथे १ लाख कोटींची गुंतवणूक मिळवणे आणि ८१ हजारांहून अधिक रोजगार निर्माण करणे ही अतिशय कठीण बाब आहे, पण धामी आणि त्यांच्या कार्यसंघाने हे शक्य करून दाखवले. त्यासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो.

## संघटित समाजाचं नुकसान कोणीही करू शकत नाही - बावनकुळे

अमरावती, १९ जुलै : समाज संघटित असेल, तर कोणताही संघर्ष निर्माण होऊ शकत नाही. एकटा विरोधक किंवा बाहेरचा कितीही प्रयत्न केला, तरी तो संघटित समाजाचं नुकसान करू शकत नाही, असे स्पष्ट मत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. प्रत्येकाने समाज संघटित करण्यासाठी पुढे आले पाहिजे. संघटित समाज हेच त्याचे खरे बळ आहे. संघर्ष टाळण्यासाठी, स्वाभिमान जपण्यासाठी आणि प्रगती साधण्यासाठी समाजात ऐक्य व एकजूट अत्यावश्यक आहे, असेही ते म्हणाले. अमरावतीत तेली समाजाच्या राज्यस्तरीय उद्योजक मेळाव्यात ते बोलत होते.

या मेळाव्यादरम्यान राज्यभरातून आलेल्या तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा बावनकुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. समाजातील तरुणांनी उद्योग क्षेत्रात देखील भरारी घ्यावी, यासाठी नवउद्योजकांना प्रोत्साहित करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. सुप्रसिद्ध उद्योग प्रशिक्षणतज्ज्ञांच्या माध्यमातून नवउद्योजकांना व्यवसायवृद्धी, निधी व्यवस्थापन आणि मार्केटिंग यासारख्या विविध बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात समाज एकत्र येऊन आर्थिक आणि सामाजिक उन्नती साधू शकतो, हा विश्वास अनेक वक्त्यांनी व्यक्त केला.

या मेळव्यास महाराष्ट्र प्रांतिक तेली समाजाचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार रामदास तडस, माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते समाजातील विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्ती यांची विशेष अतिथी म्हणून विशेष उपस्थिती होती.

### गुणवंतांचा झाला सत्कार

इयत्ता दहावी व बारावीमध्ये गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच विविध क्षेत्रात उत्तुंग यश प्राप्त करून नावलौकिक प्राप्त करून तेली समाजाचे भूषण ठरणाऱ्या गुणवंतांचा सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला.

## उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियानासाठी ५ कोटीचा निधी देणार - एकनाथ शिंदे

ठाणे, १९ जुलै : उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियानातंर्गत महिलांची गर्भाशय कर्करोग तपासणी जलदगतीने व्हावी यासाठी नगरविकास विभागाकडून ठाणे महापालिकेच्या आरोग्य विभागास पाच कोटींचा निधी देण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाण्यात केली.

ठाणे महानगरपालिका, रोटरी क्लब आणि आदित्य बिरला कॅपिटल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'उपमुख्यमंत्री निरोगी महिला' अभियानाचा आज ठाण्यातील लोकमान्य नगरमधील कोरस आरोग्य केंद्रात शुभारंभ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपायुक्त उमेश बिरारी, डॉ.प्रसाद पाटील, डॉ.कारखानीस, आदित्य बिर्ला फाउंडेशनचे पदाधिकारी तसेच रोटरी क्लबचे महाजन आणि त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते. गर्भाशयाचा कर्करोग हा जगातील दुसरा सर्वसाधारण आढळणारा आजार असून त्यांचे निदान लवकर झाले तरच त्यावर उपाय करणे शक्य होते. आपल्या कुटुंबातील महिला भगिनी या कायम कुटुंबाकडे लक्ष देताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे या शिबिराकडे दुर्लक्ष न करता जास्तीत जास्त महिलांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी याप्रसंगी केले.

माझ्या लाडक्या बहिणींसाठी हे अभियान सुरू करण्यात आले असून, पुढील तीन महिन्यांत पाच लाख महिलांची विनामूल्य वैद्यकीय तपासणी या अभियानाच्या माध्यमातून करण्यात येईल, असे यावेळी जाहीर केले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे गर्भाशय मुखाचा कर्करोग, ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी एचपीव्ही लस, मधुमेह तसेच हिमोग्लोबिन तपासणी तसेच स्त्रियांच्या निरोगी आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत संवाद याचा अंतर्भाव या शिबीरात करण्यात येणार आहे. यासाठी इथे सोनोग्राफीची अद्ययावत मशीन, मॅमोग्राफीची गाडी सज्ज ठेवण्यात आली आहे. त्या माध्यमातून नामवंत डॉक्टरांची मदत घेऊन हे अभियान राबविण्यात येईल असे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ प्रसाद पाटील यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी उंच भरारी, शेतकऱ्यांना परदेश अभ्यास दौऱ्याची सुवर्णसंधी

तभा वृत्तसेवा

हिंगोली, दि. १९ : विविध देशांनी विकसित केलेले शेतीविषयक तंत्रज्ञान व तेथील शेतकऱ्यांनी त्याचा केलेला अवलंब व त्याव्दारे त्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ याबाबत त्या त्या देशातील शास्त्रज्ञ, शेतकरी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा, क्षेत्रीय भेटी तसेच संस्थांना भेटी इत्यादीव्दारे शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरिता राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे आयोजित करण्यासाठी कृषि विभागाने राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौरे-राज्य पुरस्कृत योजना सन २०२५-२६ ही योजना आयोजित केली आहे, त्यानुसार सन २०२५-२६ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत युरोप, नेदरलँडस, जर्मनी, स्वित्झर्लंड, फ्रान्स, इस्त्राईल, जपान, मलेशिया, व्हिएतनाम व फिलीपाइन्स, चीन व दक्षिण कोरिया इत्यादी संभाव्य देशांची निवड करण्यात आली आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हयातून किमान एक महिला शेतकऱ्याची, विविध कृषि पुरस्कार प्राप्त व पीक स्पर्धा विजेते शेतकरी आणि इतर शेतकरी निवड करावयाचे आहेत. कृषि विभागामार्फत निवड केलेल्या शेतकऱ्यांना अभ्यास दौऱ्याच्या एकूण खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त एक लाख रुपये यापैकी जे कमी असेल ती रक्कम अनुदान म्हणून देय आहे. निवड झाल्यास दौऱ्याच्या एकूण खर्चाच्या ५० टक्के किंवा एक लाख रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती वगळून उर्वरित रक्कम प्रवासी कंपनीकडे आगाऊ भरणा करणे बंधनकारक आहे. सदरची रक्कम शेतकऱ्याने कॅशलेस पध्दतीने त्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत स्वतःच्या बँक खात्यातून एनईएफटी, आरटीजीएस, आयएमपीएस, धनाकर्ष किंवा धनादेशाव्दारे प्रवासी कंपनीस अदा करणे आवश्यक राहील. शेतकऱ्यांना देय असलेले ५० टक्के शासकीय अनुदान कमाल एक लाख रुपये अभ्यास दौरा पूर्ण करुन परत आल्यानंतर व आवश्यक ती कागदपत्रे (प्रवासाचे विमान तिकीट बोर्डींग पास, शेतकऱ्यांचे दौऱ्याबाबत सकारात्मक अभिप्राय इ.) दौऱ्यासोबत असणाऱ्या अधिकाऱ्यांकडे जमा केल्यानंतरच प्रवासी कंपनीच्या बँक खात्यात कृषि आयुक्तालयमार्फत जमा करण्यात येईल. हिंगोली जिल्ह्यातील इच्छुक शेतकऱ्यांनी आपले अर्ज वैध पारपत्रधारक (Passport), फार्मर आयडी, सातबारा, ८ अ, आधारकार्ड, शिधापत्रिका व बँक खात्यांचा तपशील इत्यादी कागदपत्रे संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाकडे दि. २५ जुलै, २०२५ पूर्वी अर्ज सादर करावेत. प्राप्त अर्जामधून सोडत काढून निवड करण्यात येणार आहे. या अभ्यास दौऱ्याचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी घ्यावा व अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारो कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन राजेंद्र कदम, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

## चंद्रभागेत तीन महिलांचा बुडून मृत्यू

पंढरपूर : शनिवारी सकाळी चंद्रभागेच्या नदी पात्रात जालना जिल्ह्यातील तीन महिला बुडाल्या . २ महिलांचा मृतदेह सापडला असून तिसऱ्या महिलेचा अजून तपास सुरु आहे.पंढरपूर येथे श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी अनेक भाविक येत असतात . दर्शनासाठी जाण्यापूर्वी भाविक पहिले चंद्रभागा नदीत पवित्र स्नान करतात . आज सकाळी विठ्ठल दर्शनासाठी आलेल्या काही महिला भाविक स्नानासाठी नदीकाठी पोहोचल्या . यातील ३ महिला चंद्रभागा नदीत स्नानासाठी उतरल्या होत्या. त्या पुंडलिक मंदिराजवळ स्नानासाठी गेल्या. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे या तिन्ही महिला बुडाल्या. संगीताबाई संजू सपकाळ, वय ४२ आणि सुनीताबाई महादू सपकाळ, वय ३८ अशी त्यांची नावे आहेत. तिसऱ्या महिलेचे नाव अद्याप निश्चित झालेले नाही.

नदीपात्रात स्नानास उतरलेल्या आपल्या सोबतच्या महिला भावीक बुडू लागल्यावर इतर महिलांनी आरडा ओरड करून मदतीसाठी पुकारणा केली. मात्र पाण्याचा प्रवाह वेगात असल्याने तिन्ही ही महिला बुडल्या. चंद्रभागेवरील कोळी बांधवांनी बुडालेल्या दोन महिलांचा मृतदेह बाहेर काढला असून तिसऱ्या महिलेच्या मृतदेहाचा शोध अजूनही सुरू आहे. धरणातून सोडलेल्या पाण्यामुळे सध्या चंद्रभागा नदी दुथडी भरून वाहत आहे. भाविकांना पाण्याचा अंदाज न आल्याने ही घटना घडली आहे. या घटनेची नोंद पंढरपूर पोलीस ठाण्यात झाली आहे.

नदीकाठी आपत्कालीन व्यवस्था तैनात नसल्याने त्वरित मदत मिळाली नाही आणि या तीन भाविक महिलांना आपला जीव गमवावा लागला असं घटनास्थळी दाखल असलेलं इतर भाविक सांगत आहेत. दरम्यान या घटनेमुळे स्थानिक प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे .

या घटनेनंतर चंद्रभागेच्या काठावर कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापनाची एक रेस्क्यू टीम तैनात करण्यात यावी अशी मागणी भाविक आणि इतर स्थानिकांकडून करण्यात येत आहे .

## मुंबईत क्यूआर कोड घोटाळा, दुकानदारांना बसला फटका

मुंबई : मुंबईत डिजिटल पेमेंट क्यूआर कोडद्वारे फसवणुकीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे, एका अज्ञात इसमाने दुकानांबाहेर लावलेले मूळ क्यूआर कोड त्याच्या स्वतःच्या क्यूआर कोडने बदलून ग्राहकांचे पेमेंट त्याच्या वैयक्तिक बँक खात्यात वळवले आहे . खार पोलिसांनी या प्रकरणात एका आरोपीला अटक केली आहे, ज्याने दक्षिण मुंबई आणि पश्चिम उपनगरातील शेकडो दुकानांबाहेर स्वतःचे क्यूआर कोड ठेवल्याची कबुली दिली आहे.

खार (पश्चिम) येथील एका दुकानदाराला हि बाब लक्षात आली . ग्राहक नियमितपणे यूपीआयद्वारे पेमेंट करत असूनही, त्यांच्या मोबाइल वर कुठलाही मेसेज येत नव्हता . सुरुवातीला त्यांना त्यांच्या यूपीआय मशीनमध्ये बिघाड झाल्याचा संशय आला कारण पेमेंटनंतर नेहमी येणारा अलर्ट वाजणे बंद झाले होते.

ग्राहकांनी केलेल्या पेमेंटचे मेसेज त्यांच्या फोनवर पूर्णपणे दिसणे बंद झाल्यावर, गुप्ता यांनी स्वतः क्यूआर कोड स्कॅन करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांना धक्का बसला, कोडमध्ये त्यांच्या स्वतःच्या ऐवजी दुसऱ्याच व्यक्तीचे नाव येत होते . बारकाईने तपासणी केल्यावर त्यांना आढळले की कोणीतरी त्यांच्या मूळ क्यूआर कोडवर वेगळा क्यूआर कोड लावला आहे.

त्यानंतर त्यांनी जवळच्या इतर दुकानदार आणि फेरीवाल्यांकडे चौकशी केली, परंतु त्यांना आढळले की त्यांच्यापैकी अनेकांचे ठट कोड बदलले आहेत. खार परिसरात असे जवळपास १० ते १२ प्रकरणं नोंदवली गेली आहेत . संबंधित दुकानदारांनी खार पोलिस ठाण्यात धाव घेतली आणि तक्रार दाखल केली.

पोलिसांनी तातडीने कारवाई करत एफआयआर नोंदवला आणि तांत्रिक देखरेख सुरू केली. कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) आणि इलेक्ट्रॉनिक ट्रॅकिंगचा वापर करून त्यांनी आरोपी शिव ओम दुबे (२२) याचा शोध सुरू केला.

आरोपी मूळचा उत्तर प्रदेशचा रहिवासी आहे. तो मागील काही महिन्यांपासून कुलाबाच्या मच्छिमार नगरमध्ये वास्तव्यास होता. पोलिसांनी आरोपीला शोधले. ठोस पुराव्यांच्याआधारे पोलिसांनी आरोपीला अटक केली.

## जिल्हा परिषद निवणुकीत २० जागा निवडून आणा, मंत्रीपद देतो

### सुनील तटकरेंचे आ नवघरेना आश्वासन

तभा वृत्तसेवा

हिंगोली, १९ जुलै

आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे २० सदस्य निवडून आणा, यावेळी हिंगोली जिल्ह्याला निश्चित मंत्रीपद देऊ असे आश्वासन राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा सुनील तटकरे यांनी कार्यकर्ता संवाद मेळाव्यात दिले. विधानसभा निवडणुकीच्या वेळीही आ राजू नवघरे यांना निवडून दिल्यास मंत्रीपद देऊ असे आश्वासन देण्यात आले होते.



येथील महावीर भवनात शनिवार, १९ जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट पक्षाचा कार्यकर्ता संवाद मेळावा घेण्यात आला. राष्ट्रवादी पक्षाकडून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात पक्ष संघटन आणि चाचपणी सुरू आहे. या मेळाव्याला प्रदेशाध्यक्ष खा सुनील तटकरे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आ धनंजय मुंडे, आ राजेश नवघरे, प्रवक्ते परांजपे, जिल्हाध्यक्ष बी डी बांगर, प्रकाश थोरात, रामदास पाटील सुमठानकार आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले की, महायुतीमध्ये आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये मोठ्या प्रमाणावर विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते प्रवेश करीत आहेत. शेवटी विकास कामाच्या मुद्द्यांवर आम्ही महायुतीमध्ये सहभागी झालो.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आजही शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारा पक्ष आहे. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद, नगर पंचायत निवडणुकीसाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपापल्या गटात, वार्ड मध्ये कामाला लागण्याच्या सूचना दिल्या. महायुती सरकारने शेतकरी, महिला, कामगार तसेच गोरगरिबांसाठी महत्वाकांक्षी योजना सूरु केल्या आहेत. वृध्द अपंग लोकांसाठी ही योजना आणल्या. त्याची अंमलबजावणी होत आहे. महायुतीच्या काळात राज्याचा विकास झपाट्याने होत आहे. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विरोधकांच्या आरोपाला सडेतोड उत्तर देऊन कामाच्या माध्यमातून आपली छाप निर्माण करायची आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत आम्ही कार्यकर्त्याला पाठबळ देणार असून तरुणांना वाव देणार आहोत. पक्षामध्ये शिस्त असली पाहिजे असेही यावेळी त्यांनी बजावले. यावेळी जिल्हयातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मेळाव्याला पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांची अनुपस्थिती होती.

## कन्नड अर्बन को-ऑफ क्रेडिट सोसायटीमध्ये घोटाळा, मुदत ठेवीदारांची फसवणूक ! चौकशीची मागणी

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१९ जुलै - शहरातील कन्नड अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड या संस्थेचे चेअरमन, व्यवस्थापक आणि संचालक यांनी ठेवीदारांची फसवणूक केली असून, आमच्या ठेवलेल्या मुदत ठेवी व बचत खात्यातील रक्कम परत न करत रक्कम देण्यासाठी हेतुपुरस्सर टाळाटाळ केली आहे. तसेच, या प्रकरणी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी संस्थेला लेखी सूचना दिली असतानाही संस्थेने त्याचा अनादर केल्याची तक्रार खातेदार अनिता विष्णूकुमार वैद्य यांना कन्नड शहर पोलिस ठाण्यात दिली आहे. या या सोसायटी मध्ये ठेवलेल्या मुदत ठेवी मुदत ३० एप्रिल २०२३ रोजी संपलेली आहे. सदर रक्कम बचत खाते क्र. ८३१ मध्ये हस्तांतरण करण्यात आलेली आहे. परंतु बचत खात्यातून दोन वेळेस ३० हजार रु मात्र असे मिळून ६० हजार रुपये मिळालेले आहे. उर्वरीत रक्कम अद्यापही मिळालेली नाही. वारंवार लेखी व तोंडी मागणी करूनहो संस्थेने आम्हाला रक्कम परत दिलेली नाही यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार सहकार अधिकाऱ्यांनी संस्थेला रक्कम परत करण्याबाबत आदेश दिले होते, तरीही संचालक मंडळाने दुर्लक्ष केले आहे. यामुळे ठेवीदारांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक झाली असून, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी हेतुपुरस्सर अपहार केला आहे.

संस्थेचे चेअरमन, व्यवस्थापक व संचालक मंडळ यांनी संगनमताने आर्थिक गैरव्यवहार व अपहार व फसवणूक प्रकरणी संस्थेच्या चेअरमन, व्यवस्थापक आणि संचालक मंडळाविरुद्ध भारतीय दंड संहिता, विश्वासघात, लोकसेवक किंवा बँक संस्था अधिकाऱ्याने अपहार करणे, फसवणूक व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत गुन्हा दाखल करावा व संस्थेच्या संपूर्ण आर्थिक व्यवहारांची तपासणी करून ठेवीदारांचे पैसे परत मिळावेत व संबंधित अधिकारी व संचालक मंडळाची चौकशी करून त्यांना पदावरून बरखास्त करून आम्हाला आमच्या ठेवींची संपूर्ण रक्कम व्याजासहित परत मिळावी अशी तक्रार कन्नड शहर पोलिस ठाण्यात आनिता वैद्य यांनी दाखल केली आहे.

**श्रीमती आनिता वैद्य यांच्या बचत खात्यात मुदत ठेव एक लाख ७० हजार रुपये व त्याचे व्याज २० हजार रुपये असे एक लाख ९० हजार रुपये बचत खात्यात जमा करून त्यापैकी ३० हजार रुपये दोन वेळेस असे ६० हजार रुपये दिलेले आहे.त्यापैकी राहीलेली रक्कम १ लाख ३० हजार रुपये चेक तयार आहे. त्यांना चेक घेऊन जाण्याचे सुचित केले आहे असे या वित्त सोसायटीच्या अध्यक्षानी पत्राद्वारे कळविले आहे.**

**मुदत ठेवीदारांना तत्काळ रक्कम अदा करावी असे पत्र सोसायटीला देण्यात आले असून कलम ८९ अंतर्गत लेखा चाचणी परीक्षण करण्यात येत असून अहवालाच्या प्रतीक्षेत आहोत अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील निर्णय घेण्यात येईल**

**विनय धोटे**
**सहाय्यक निबंधक कन्नड**

**आमच्याकडे खातेदारांनी तक्रार केलेली असून आम्ही त्या अनुषंगाने तपास करत आहोत,लेखा चाचणी परीक्षणाचा अहवाल आला की पुढील कारवाई होईल**

**कुणाल सूर्यवंशी**
**सहाय्यक पोलिस निरीक्षक**
**कन्नड शहर पोलिस स्टेशन**

## महत्त्वाच्या पोस्ट ऑफिसमध्ये 'IT 2.0 APT अप्लिकेशन'चा शुभारंभ
## पोस्ट ऑफिस आता आणखी स्मार्ट होणार!


मुंबई - डाक विभागाकडून डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, 'APT अप्लिकेशन' हे पुढच्या पिढीतील नवीन सॉफ्टवेअर २२ जुलै २०२५ रोजी काही निवडक प्रमुख पोस्ट ऑफिसमध्ये राबवण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत खालील मुख्य पोस्ट ऑफिस आणि त्याअंतर्गत येणाऱ्या सब पोस्ट ऑफिस आणि शाखा पोस्ट ऑफिसमध्ये नव्या प्रणालीची अंमलबजावणी केली जाईल.

**या पोस्टऑफिसमध्ये होणार नव्या प्रणालीची अंमलबजावणी**

महिम मुख्य पोस्ट ऑफिस, ठाणे मुख्य पोस्ट ऑफिस, श्रीरामपूर मुख्य पोस्ट ऑफिस, जळगाव मुख्य पोस्ट ऑफिस, अमरावती मुख्य पोस्ट ऑफिस, कोल्हापूर मुख्य पोस्ट ऑफिस.

**सर्व व्यवहार तात्पुरते बंद**

नवीन प्रणालीच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी २१ जुलै २०२५ रोजी पोस्ट ऑफिसमधील सर्व व्यवहार तात्पुरते बंद ठेवण्यात येणार आहेत. या काळात डेटा माइग्रेशन, सिस्टीम तपासणी आणि



आवश्यक कॉन्फिगरेशनची प्रक्रिया पार पाडली जाणार आहे.

**अझढ अप्लिकेशनची वैशिष्ट्ये काय?**

अधिक वेगवान आणि प्रभावी सेवा, ग्राहकांसाठी वापरायला सुलभ आणि आधुनिक इंटरफेस, जलद सेवा वितरणाची हमी, कार्यक्षम, स्मार्ट आणि भविष्योन्मुख पोस्ट सेवा प्रणाली.

**ग्राहकांना विनंती**

सर्व ग्राहकांनी आपल्या पोस्ट ऑफिस भेटीचे नियोजन वेळापत्रकानुसार करावे. दिलगिरी व्यक्त करत आहोत की या प्रक्रियेमुळे थोडा त्रास होऊ शकतो, मात्र या डिजिटल परिवर्तनामुळे भविष्यात आणखी जलद, सुरक्षित आणि सोयीच्या सेवा मिळणार आहेत.

तरुण भारत

छोटे उस्ताद



## तुम्हाला माहिती आहे का?

● गगनयात्री शुभांशू शुक्ला यांनी ह्यूमन स्पेस फ्लाइट सेंटरच्या समन्वयाने भारतीय संशोधन संस्थांनी विकसित केलेल्या सात सूक्ष्मगुरुत्वाकर्षण प्रयोगांचा संच पूर्ण केला. या प्रयोगांमध्ये स्नायूंचे पुनरुत्पादन, शैवाल वाढ, पीक व्यवहार्यता, सूक्ष्मजीव टिकून राहण्याची क्षमता, अवकाशातील संज्ञानात्मक कार्यक्षमता आणि सायनोबॅक्टेरियाचे वर्तन यांचा शोध घेण्यात आला. प्रत्येक प्रयोगाचा उद्देश मानवी अंतराळ उड्डाण आणि सूक्ष्म गुरुत्वाकर्षण विज्ञानाची समज वाढवण्याचा होता.

## अशी पाखरे येती

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

# गाणारा पक्षी : सल्फर बेलीड वार्बलर

पक्षी हा बराच वेळपर्यंत एकाच जागी शांत बसलेला आपण कधी पाहिला आहे का? शक्यच नाही! कोणताही पक्षी एका जागी स्थितप्रज्ञावस्थेत बसूच शकत नाही. तो चंचल आहे. बहुतेकदा झाडाच्या खोडांवर, भिंतींवर किंवा खडकांवर पक्ष्यांना रेंगाळतानाच आपण पाहतो किंवा जुन्या इमारतींच्या आजूबाजूच्या खडकाळ भागात राहून तेथेच विहार करायला पक्ष्यांना अधिक आवडते. अशा एका गाणाऱ्या पक्ष्याची ओळख आज आपण करून घेऊ. त्याचे नाव आहे सल्फर बेलीड वार्बलर अर्थात फिलोस्कोपस ग्रिसेओलस! सल्फर-बेलीड वार्बलर नामक हा पक्षी अतिशय चंचल असून कुणाच्या फारसे लक्षात येऊ नये म्हणून, चोरून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरताना आढळतो. सल्फर बेलीड वॉर्बलर या



**लीफ वॉर्बलरची सल्फर बेलीड वॉर्बलर ही एक प्रजाती असून अफगाणिस्तान, कझाकस्तान, किर्गिस्तान, मंगोलिया आदी ठिकाणी आपला घरठाव करतात. ही प्रजाती लहान गटात आढळते. विहार करताना सतत गातच राहणे हे या पक्ष्याचे वैशिष्ट्य आहे.**

गाणाऱ्या पक्ष्याला जुन्या इमारतींभोवती खडकाळ भागात राहायला आवडते. त्याचमुळे पक्षिमित्रांना या पक्ष्याला आपल्या कॅमऱ्यात कैद करण्याची आवड निर्माण झाल्याखेरीज राहात नाही. फक्त त्यासाठी संयम अतिशय गरजेचा आहे. त्याच्या तीक्ष्ण अशा वैशिष्ट्यपूर्ण आवाजाच्या अंदाजानेच आपला कॅमेरा धरून त्याला चित्रबद्ध करता येऊ शकते. सल्फर बेलीड वार्बलर या पक्ष्यांमधील नर आणि मादी दिसायला सारखे जरी असले, तरी त्या दोघांचा आकार ११ सेंटीमीटर एवढाच असतो. वरचा भाग तपकिरी, डोळ्यावर पट्टे, पुढचा भाग नारंगी-पिवळा असलेले सुपरसिलियम, पंखांचे पट्टे नसलेले आणि खालचा भाग तपकिरी पिवळा अशी त्याच्या शरीराची ठेवण असून, झाडांच्या लहान फांद्या आणि पानांमधून कीटक गोळा करण्याचे कसब त्यांच्यात असते. खडकाळ टेकड्या आणि झाडी जंगलातील अधिवासात सल्फर बेलीड वार्बलर प्रामुख्याने आढळतात. लीफ वॉर्बलरची सल्फर बेलीड वॉर्बलर ही एक प्रजाती असून अफगाणिस्तान, कझाकस्तान, किर्गिस्तान, मंगोलिया आदी ठिकाणी आपला घरठाव करतात. ही प्रजाती लहान गटात आढळते. विहार करताना सतत गातच राहणे हे या पक्ष्याचे वैशिष्ट्य आहे. सल्फर बेलीड वार्बलर आपल्या गायनाचा उपयोग इतर पक्ष्यांना हुसकावून लावण्यासाठी करीत असावा सल्फर बेलीड वार्बलरची चोच पातळ असून त्याच्या पोटाचा रंग पिवळा असल्याचे आढळून आले आहे.








## देशोदेशीच्या लोककथा

प्रीती वडनेरकर/ ९८२३९९४७९२

# झोपलेली राजकन्या

भाग ३



फ्रान्स देशातील छोट्या गावातली गोष्ट आहे. गावचे राजाराणी अतिशय प्रेमळ, उदार आणि योग्य न्यायदान करणारे होते. त्यांची प्रजा अतिशय समाधानी अन् खाऊन पिऊन सुखी होती. प्रत्येक नागरिकाला, एकेक व्यवसाय राजाने नेमून दिलेला होता. जो तो अतिशय प्रामाणिकपणे, आपला व्यवसाय आनंदाने चालवित असे. कोणामध्ये भांडणतंटा नाही, मत्सर नाही, द्वेष नाही. राजाराणी अतिशय कर्तव्यदक्ष आणि प्रजाहित तत्पर होते.

इतके उत्तम गुण असूनही एक दुःख मात्र त्यांना होतं ते म्हणजे अपत्यसुख! 'महाराज, आपल्यावर आपलं नशीब का रूसलंय की, त्याने आपल्याला मुलगा-मुलगी काही देऊ नये? आपलं पूर्वजन्मीचं पाप की, याजन्मीची काही चूक?' राणीनं राजाला विचारलं. खरं तर राजाही त्याच चिंतेत होता, 'प्रिये, मलाही खरंच कळत नाही. आपलं दैव आपल्यावर का रूसलंय? आपली प्रजा सुखी, समाधानी आहे. सर्वजण आपल्याला दुवा देतात. मग काही देवता आपल्यावर का रुष्ट झाल्या आहेत?' राजाही दुःखी कष्टी झाला होता. 'आपल्या नगरीच्या बाहेर, पऱ्यांचा मोठा राजवाडा आहे. तिथे जाऊन आपण त्यांचा सल्ला घेतला तर? त्या नक्की आपल्याला मार्ग दाखवतील, मदत करतील,' राणी म्हणाली. राजाला हा विचार पटला.भल्या पहाटे तयार होऊन राजा-राणी, आपल्या सात घोड्यांच्या रथातून पऱ्यांच्या राजवाड्याकडे निघाले.

पऱ्यांनी आनंदाने राजाराणीचं जंगी स्वागत केलं. राजाराणींनी सर्व पऱ्यांसाठी सोन्याचांदीच्या उंची वस्तू भेट म्हणून दिल्या. 'एरवी, येते का आमची आठवण? कधी विचारपूस करता आमची? मग आता कशी आली? स्वार्थी आहात तुम्ही,' सात पऱ्यांपैकी एक परी दुष्ट-चिडकी, संतापी होती, ती म्हणाली.

'तुम्ही तिच्याकडे मुळीच लक्ष देऊ नका. ती स्वतः दुष्ट आहे म्हणून तिला सगळेच दुष्ट आणि स्वार्थी वाटतात,' पहिली परी म्हणाली. राजाराणीने आपल्या येण्याचे कारण सांगितले. 'तुमच्या नगरीच्या बाहेरून एक नदी वाहते. तिच्या काठाला घनदाट जंगल आहे. तिथे आदिवासी लोक राहतात. त्या जंगलात खूप जुना, विस्तीर्ण वृक्ष आहे. त्या वृक्षामधे त्यांचा देव राहतो, अशी त्यांची समजूत आहे. त्या देवाकडे तुम्ही अपत्यासाठी मागणं मागा. देव प्रसन्न होऊन, तुमचं मागणं पूर्ण करेल,' मोठ्या परीने सांगितले.

सर्व पऱ्यांचे आभार मानून, राजा-राणी राजवाड्यात परतले. आदिवासींच्या वस्तीविषयी, त्यांच्या देवाविषयी प्रधानजींनी पूर्ण माहिती मिळवली. आदिवासी जमात मागासलेली होती. राजाराणींनी तिथे जाऊन, देवाला साकडं घातलं. त्याचबरोबर, आदिवासींसाठी सर्व सुखसोयी सुधारणा करवून घेतल्या. त्यांना पक्की घरं बांधून दिली. शिक्षण-रुग्णालयांची सोय केली.

'महाराज, त्या देवानं आपलं गाऱ्हाणं ऐकलं. आपल्याला लवकरच अपत्यप्राप्ती होणार आहे,' राणीनं सांगितलं. राजा आणि सर्व प्रजा आनंदली. राणीला कन्यारत्न झालं. अतिशय नाजुक, कोमल आणि देखण्या राजकन्येचं बारसं थाटामाटात करण्याचं ठरवलं. देशोदेशीच्या राजाराणींना आणि मुख्य म्हणजे साऱ्या पऱ्यांना आमंत्रण गेलं. प्रधानजींनी स्वतः जातीनं लक्ष घालून, सर्व पऱ्यांच्या नावानं लाल जर्द रेशमी कापडावर, सोनेरी अक्षरांनी मजकूर लिहिलेला लखोटा पाठवला.

मात्र, त्यांच्या हातून एक चूक झाली. सर्व पऱ्यांच्या नावात एक नाव लिहायचं राहूनच गेलं. ती नेमकी दुष्टपरीचं होती. सर्व शाही पाहुण्यांसाठी संपूर्ण नगरीत, गुलाबाच्या फुलांच्या पाकळ्यांच्या पायघड्या घातल्या गेल्या. उंची अत्तर अन् गुलाबपपाण्याचं शिंपण केलं गेलं. मेजवान्या झडल्या.राजकन्येसाठी खास सोन्याचा पाळणा बनवला होता. त्याला हिरे, माणिक अन् पाचूची नक्षी होती. राजकन्येचं नाव 'ॲरोरा' ठेवलं.

एकेक पाहूणे येऊन राजकन्येला उंची भेटी आणि तोंड भरून आशीर्वाद देऊ लागले.

सर्वात शेवटी पऱ्या आल्या. पाच पऱ्यांच्या मागे सहावी दुष्ट परी होती. सातवी परी मात्र मुद्दामच दुष्ट परीच्या मागे लपली होती. 'संपूर्ण जगातील सुंदर राजकन्या म्हणून तुझं नाव होईल.' पहिल्या परीनं आशिर्वाद दिला. 'जगातील सारी सुखं तुझ्या पायाशी लोळण घेतील,' दुसरी म्हणाली. 'आईवडिलांचं आणि प्रजेचं भरभरून प्रेम तुला मिळेल,' तिसरी म्हणाली.

'सर्वगुणसंपन्न, देखणा राजपुत्र, तुला जीवनाचा जोडीदार म्हणून मिळेल,' चौथीनं आशिर्वाद दिला. 'तुझ्या पायगुणानं संपूर्ण नगरीत सुख, समृद्धी, भरभराट होईल,' पाचवी म्हणाली. सहावी परी, तिचं नाव आमंत्रण लखोट्यात न लिहिल्यामुळे तणतणत उभी होती. संतापानं तिचा चेहेरा लालबुंद झाला होता. डोळे तर आग ओकत होते. 'हे सुंदर मुली, तुझ्या सोळाव्या वाढदिवशी मोठी सुई टोचून तुला जखम होईल. तू मरशील,' तिनं शाप दिला. तसे सर्व पाहुणे, राजाराणी, पऱ्यांना जबरदस्त धक्का बसला. सारे घाबरले. इतक्यात, लपलेली सातवी परी पुढे आली. 'नाही बाळा, तू मरणार नाहीस. फक्त गाढ झोपशील. शंभर वर्षे झोपशील. नंतर एका राजपुत्राच्या स्पर्शानं तू जागी होशील,' सातव्या परीनं उःशाप दिला.

सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

ॲरोरा दिसामासी मोठी होऊ लागली. ती १६ वर्षांची झाली अन् राजानं फतवा काढला, 'ज्या कोणाला विणकाम, शिवणकाम, भरतकाम करायचं असेल, त्यानं बंद खोलीत स्वतःला कोंडून घेऊनच करायचं. राजमहालाच्या जवळपास कोणी सुया घेऊन फिरकायचंही नाही.'

सारी प्रजा, राजाची आज्ञा, तंतोतंत पाळत होती. कोणीच त्यांचं उल्लंघन करत नव्हतं. सौंदर्य, नम्रता आणि औदार्यानं ॲरोरा राजमहालातील सर्वांच्या गळ्यातला ताईत बनली होती. आपल्या गोड आवाजानं सर्वांना मोहवत होती.त्यादिवशी तिचा सोळावा वाढदिवस होता. राजाराणी, ॲरोरावर विषेश लक्ष ठेवून होते. तिला राजमहालाच्या बाहेर जाऊ देत नव्हते. ॲरोरा राजमहालातच सर्वात उंच असलेल्या कक्षात गेली. राजमहालातल्या एका दासीची आई, तिथे सुया घेऊन विणकाम करत होती. तिला राजानं काढलेल्या फतव्याविषयी काहीच माहीत नव्हती.

ॲरोरा तिच्या जवळ गेली. तिला त्या सुयांचं कुतूहल वाटलं. 'आंटी, तुम्ही काय करत आहात?' तिनं विचारलं. 'याला विणकाम म्हणतात बाळा.' दासीची आई म्हणाली. 'मला शिकवाल?' ॲरोरानं विचारलं. आईनं दोन्ही सुया तिच्या हातात दिल्या. ॲरोराच्या हाताच्या बोटाला सुया टोचल्या आणि त्यातून रक्त आलं. दासीची आई ओरडली. राजमहालातले सारे नोकर, चाकर, राजाराणी धावत आले. त्यांना रागीट परीचा शाप आठवला. ॲरोरा झोपली होती.

ॲरोराला सर्वांनी उचलून तिच्या महालात नेलं. राजेशाही पलंगावर ठेवलं आणि झुळझुळीत पांघरूण पांघरलं. ॲरोरा अगदी गाढ झोपल्यासारखी दिसत होती. सारे आपापल्या कामाला लागले. ही बातमी सातव्या परीपर्यंत पोहचली. ती तातडीनं उडत राजमहालात पोहचली. तिनं झोपलेल्या ॲरोराच्या चेहऱ्यावरून हात फिरवला. 'स्वप्नांच्या जगात विहार कर बाळा' ती म्हणाली. जाताना तिनं तिच्या हातात भुकटी घेतली आणि काही मंत्र पुटपुटत संपूर्ण नगरीवर ती फुंकरीनं विखुरली.

आश्चर्य म्हणजे, अचानक सारी नगरी, माणसं, पशूपक्षी, झाडंवेली सारेच झोपले. इतके गाढ की, जणू त्यांचे पुतळेच बनले. नगरीभोवती वृक्षवेली भराभर वाढले. त्यांनी त्या नगरीला वेढूनच टाकलं. दिवसांमागून दिवस, महिन्यांमागे महिने आणि वर्षांमागून वर्षे गेली. त्यावेळी, सुवर्ण नगरीतल्या राणीला पुत्ररत्न झाले. बघता बघता तो लहानाचा मोठा, तरुण झाला. अतिषय देखणा, शूरवीर, लोभस तरुण! लहान वयातच त्याने अनेक लढाया जिंकून वडिलांचं साम्राज्य वाढवलं. प्रजाहित तत्पर आणि जनसंपर्क अफाट असल्याने, त्याच्यापासून कुठलीच गोष्ट लपून राहत नसे. आपल्या वडिलांचं साम्राज्य वाढवून, त्याने सम्राट ही पदवी प्राप्त केली. साम्राज्य वाढविण्याच्या नादात तो ॲरोराच्या नगरीच्या बाहेर येऊन पोहचला. सेनापतीला परिसराची माहिती मिळवण्यासाठी पाठवलं.

'सम्राट मी एक अद्भूत दृश्य पाहिलं. या अफाट वृक्षवेलींच्या कुशीत एक नगरी वसलेली आहे. मोठमोठे राजमहाल आहेत. पण, तिथे फक्त पुतळेच पुतळे आहेत. सारे निर्जिव! या राज्यावर आपण लगेच ताबा मिळवू शकतो. तत्पूर्वी आपण नगरीतून फेरफटका मारावा.' राजपुत्र आपल्या लवाजम्याबरोबर फेरफटका मारायला निघाला. व्यवस्थित घरे, रस्ते, बाजार, पाण्याच्या विहिरी असलेली ही नगरी आखीव रेखीव होती. पण, सारं जुनं झालेलं आणि प्रजा...? सारे पुतळे! राजकुमार चालत चालत राजमहालात गेला. ॲरोराच्या महालात गेला. गाढ झोपलेल्या ॲरोराच्या गालांना त्याने स्पर्श केला मात्र, ती लगेच झोपेतून जागी झाली.

'तुम्ही आलात? मी तुमचीच वाट पहात होते.' राजशय्येवरून खाली उतरत ती म्हणाली. ॲरोरा उठताचक्षणी सारी नगरी उठली, जागी झाली. दासदासी, प्रजा, राजाराणी, प्राणीपक्षी सारेच झोपेतून जागे झाले. राजाराणी राजकुमाराला भेटायला ॲरोराच्या महालात आले. त्यांनी ॲरोराच्या आणि साऱ्या राज्याच्या प्रजेच्या झोपेची हकिकत कथन केली.

ॲरोरा आणि राजकुमाराच्या विवाहाची घोषणा केली.थाटामाटात शाही विवाह संपन्न झाला. साऱ्या खाशा स्वाऱ्यांबरोबर सहा पऱ्याही उपस्थित राहिल्या. त्यांनी दुष्ट परीला कोंडून ठेवलं आणि विवाह सोहळा संपन्न झाल्यावर मोकळं केलं. राजकुमार आणि राजकुमारी ॲरोरा अतिशय सुखाने राहू लागले.

## प्रश्नसंच - २२




**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू आहे. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारीत दहा प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखीत स्वरुपात दै.तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा.

### प्रश्नसंच क्र. २१ चे भाग्यवान विजेते

**एकूण ४२७ जणांनी उत्तरे दिलीत.**

अनुराधा कोळी, सुनिता सोनार, आरती दप्तरी, संगिता शेंडकर, डॉ. आनंद पळसोदकर, आशा पै, प्रेरणा थोरात, वीणा पाटील, संगिता जोशी, शर्वरी परब, डॉ.दीप्ती काशीकर, मीना खेडेकर, चित्रा शिनकर, रवींद्र साधू, माधवी हातवळणे, साक्षी पांडे, सुषमा टांकसाळे, वैशाली देवळे, रत्नमाला तांदुळे, डॉ. स्वाती कुळकर्णी, सुषमा गावडे, मंजुषा साठे, आरती कुळकर्णी, मनोहर पाटील, दिपाली कथने, सुचिता खनगई, वीणा देशपांडे, कविता दातार, अतुल देवगडे, अश्विनी चोळकर, स्नेहल अवचट, रवींद्र धांडे, रंजना धांडे, शांता शाह, नंदिनी कुलकर्णी, आशारानी सुतार, वैशाली सप्रे, शीला पडोळे, रवींद्र टोंगळे, सतीश देवरस, सुहासिनी दलाल, सुषमा सोमठाणकर, योगिता अभ्यंकर, देवश्री बिडवाई, नारायण तायडे, प्रसाद कावळे, स्मिता खर्डीकर, मृदुला लोखंडे, कुंजलता सरनाईक, सुहास खर्डीकर

**ओवीतील ४ चरणांपैकी एक चरण चूक किंवा बरोबरही असेल. ते ओळखा व कोणते चरण चूक आहे की बरोबर आहे, ते त्या अक्षरावर क्लिक करा.**

१) अ.वृत्ति आनंदली त्याची। ब.दुःख अवघे निवारावे। क.पातकाला न उरू द्यावे। ड.माझ्या ठायी यत्किंचित॥
अ. ब. क. ड. इ. कोणतेही नाही

२) अ. तुझी कृपा व्हाया। ब. नाही धनाचे प्रयोजन। क.चरणी होता अनन्य। ड. तू ते साह्यकरिशी॥
अ. ब. क. ड. इ. कोणतेही नाही

३) अ. संतदर्शन आजवरी। ब. जाऊन वंदू समर्थांसी । क.उगीच त्रासून अंतरी। ड. भलते काही करू नको॥
अ. ब. क. ड. इ. कोणतेही नाही

४) अ. तुम्हा आम्हा कारणे ब. जे कां धाडले ईशाने. क. तेच आहे आपणांकारणे। ड. अवघ्या आहेत योगक्रिया॥
अ. ब. क. ड. इ. कोणतेही नाही

५) अ. या माझ्या ओट्यावरी । ब.अडचण होते भारी । क.केलेस कां हे प्रदर्शन। ड. उत्सवासी गुरुराया ॥
अ. ब. क. ड. इ. कोणतेही नाही

६) अ. हा धर्मपीठ वाराणसी । ब.जी भागीरथीच्या तटा काशी । क. अध्ययना जाती देशावरी। ड. वेदवेदांग स्मृतीच्या॥
अ. ब. क. ड. इ. कोणतेही नाही

७) अ. तुझ्या वशिल्यावाचून। ब. अवघी कृत्ये आहेत। क.आर्य संस्कृतीचे रक्षण। ड. होणे नाही तुझ्यावीण॥
अ. ब. क. ड. इ. कोणतेही नाही

८) अ. ते ज्योतिर्लिंग मनोहर। ब. करी पातकांचा संहार । क. नको करू आता उशीर। ड. जाऊ भागीरथी स्नानाला॥
अ. ब. क. ड. इ. कोणतेही नाही

९) अ. शक्याशक्य विचार । सुज्ञे करावा निरंतर। क.उगीच पूल सागरावर। ड. बांधावया जाऊ नये ॥
अ. ब. क. ड. इ. कोणतेही नाही

१०) अ. आणले ताट वाढूनी ब. पडेल बापा ते ठायी क. कशानेही कधी काही ड. कमी पडणार नाही

### प्रश्नसंच - २१ उत्तरे

१) बरोबर २) चूक ३) चूक ४) बरोबर ५) चूक ६) चूक ७) चूक ८) चूक ९) बरोबर १०) बरोबर

## वारसा

प्रवीण अविनाश योगी/+९१ ७५०७४ ९३११२

**भारतातील जागतिक वारसा स्थळे आणि त्यातून प्रकट होणारे विज्ञान जडणघडणीच्या वयात असणाऱ्या किशोरवयीन मुलांना त्यांच्याच भाषेत समजावून सांगणे फार महत्त्वाचं आहे. त्यात सध्याची किशोरवयीन पिढी ही माहिती तंत्रज्ञानाच्या स्फोटामुळे आधीच्या पिढ्यांपेक्षा कितीतरी पट जास्त स्मार्ट आहे. युनेस्कोने निर्देशित केलेल्या दोन संस्था 'इंटरनॅशनल कौन्सिल ऑन मॉनुमेंट्स अँड साईट्स' आणि 'इंटरनॅशनल युनियन फॉर कंजर्वेशन ऑफ नेचर' त्याचे स्वतंत्रपणे मूल्यांकन करून जागतिक वारसा समितीला अहवाल सादर करतात. जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी त्या स्थळाने उत्कृष्ट वैश्विक मूल्याच्या' दहा पैकी किमान एक निवड निकष पूर्ण केला पाहिजे. मराठा साम्राज्यातील ११ किल्ल्यांचा वारसा स्थळांमध्ये समावेश प्रत्येकासाठी अभिमानाची बाब आहे. हा वारसा महत्त्वाचाच आहे. त्यांचा सांभाळ करणे, जतन संवर्धन करणे आपल्याच हाती आहे. या सदरातून जाणून घेऊ या किल्ल्यांची माहिती!**

# किल्ले शिवनेरी

महाराष्ट्रातील किल्ले आणि शिवछत्रपती यांचा अन्योन्य संबंध आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे या किल्ल्यांशी शिवरायांचे नाव निगडित आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म-वास्तव्य-राज्याभिषेक आणि मृत्यूही किल्ल्यावरच घडला. त्यांच्या ताब्यात शेकडो किल्ले होते, पैकी त्यांनी स्वतः काही किल्ले उभारले तर काहींची डागडुजी केली. सह्याद्रीत कुठेही उभे राहून नजर फिरवली तर दर चार-दोन शिखराआड एखाद शिखर, तटबुरूजांचं शेलापागोटं चढवून उभं असतं. यातील बहुतेक दुर्गांनी श्रीशिवछत्रपतींची चरणधूळ आपल्या मस्तकी धारण केली आहे. त्या शिवस्पर्शाने पावन झालेली ही महाराष्ट्राची तीर्थे आहेत. या गडकोट किल्ले आणि दुर्गांमधून या देशीचे पुत्र ताठ मानेने वावरले आहेत. या बळवंत दुर्गांच्या आधारावर शिवरायांनी दिल्लीश्वराला नामोहरम केले अन्

*या भूमंडळाचे ठायी, धर्मरक्षी ऐसा नाही।*
*महाराष्ट्रधर्म राहिला काही, तुम्हा कारणे॥*

ही समर्थोक्ती सार्थ केली. महाराष्ट्राच्या दुर्ग कारणात सोन्याचा कळस शिवछत्रपतींनीच चढविला म्हणूनच त्यांना समर्थ रामदासांनी 'गडपती' म्हणून गौरविले आहे.

१९ फेब्रुवारी १६३०, फाल्गुन वद्य तृतीया, शके १५५१, शुक्रवार! शिवनेरी किल्ल्यावर महाराष्ट्राचा स्वातंत्र्यसूर्य उगवला. श्रीक्षेत्र भीमा शंकराच्या जटात आणि नाणेघाटाच्या ओठात हा जडावाचा किल्ला आहे. शिवनेरी हा नाणेघाटाचा संरक्षक दुर्ग.? कल्याण, भडोच, नालासोपारा या सागरावरच्या बंदरांचा देशावर होणारा व्यापार नाणेघाटातून होई. नाणेघाटाचे खोदकाम सातवाहनांनी केले. पुणे जिल्ह्यातील जुन्नर ह्या तालुक्याच्या गावापासून अवघ्या दोन-तीन किलोमीटर अंतरावर हा अकराशे मीटर उंचीचा किल्ला आहे. प्राचीन काळापासूनच जुन्नर ही मोठी बाजारपेठ राहिलेली आहे. या जुन्नर शहराचे संरक्षण करणारा हा संरक्षक दुर्ग!

इसवी सनाच्या तेराव्या शतकात शिवनेरी यादवांच्या ताब्यात होता. इ.स.१४४३ मध्ये मलिक उल तुजारने यादवांकडून जिंकून घेऊन बाहमनींच्या राज्यात सामील केला. पुढे १४८५ मध्ये मलिक उल तुजारचा प्रतिनिधी म्हणून मलिक अहमद याने शिवनेरीचा ताबा घेतला. बहमनी सत्तेशी बंड करून मलिक अहमदने निजाम उल मुल्क भैरी या नावाने स्वतःची द्वाही फिरवून सार्वभौम राज्याची त्याने घोषणा केली. ही निजामशाहीची सुरुवात होती. १४९४ मध्ये अहमदनगरची उभारणी करून निजाम उल मुल्कने तेथे आपली राजधानी हलवली.



परकीयांच्या ताब्यातून सोडवून महाराष्ट्राचा बराच भाग स्वतंत्र करून हिंदवी स्वराज्य निर्माण करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांच्या हयातीत आपलं जन्मस्थान स्वराज्यात आणण्यात यश मिळाले नाही. १६७३ मध्ये अजीज खान या किल्लेदाराला फितवून अन् १६७८ मध्ये जुन्नर लुटून शिवनेरीला माळा लावून जिंकण्याचे दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले. पुढे १७१६ मध्ये छत्रपती शाहूराजांनी हा किल्ला स्वराज्यात आणून आपल्या आजोबांची इच्छा पूर्ण केली.

गडावर जाण्याचे दोन मार्ग आहेत. पहिला सातवाहनकालीन खोदिव दगडी पायऱ्यांचा! मात्र, एका मागोमाग एक असलेली सात दारे त्यासाठी ओलांडावी लागतात. दुसरा मार्ग शिवनेरीच्या कमरेत मेखलेप्रमाणे शोभणाऱ्या लेण्यांच्या मालिकेतून जाणारा मार्ग किल्ला जरी अकराशे मीटर उंचीचा असला तरी, प्रत्यक्ष चढण अडीच-तीनशे मीटरची आहे. महादरवाज्यातून आत गेले की लागतो परवानगी दरवाजा! त्याच्या कमानीच्या दोन्ही अंगास शरभाची शिल्प आहेत त्या शरभाच्या पायाखाली हत्ती आहेत. शरभ हा वाघ किंवा सिंहासारखा दिसणारा काल्पनिक पशू! तिसरा 'हत्ती दरवाजा' तर चौथा 'पीर दरवाजा'! गडाच्या अर्ध्या उंचीवर असणारा शिपाई दरवाजा म्हणजे संरक्षक तटबंदीचा उत्कृष्ट नमुनाच आहे. तिथून उजवीकडे गेले की, कमानदार दारातून श्री शिवाई मंदिराकडे जाता येते तर खोदीव पायऱ्यांवाटे वर चढले की, फाटक दरवाजा व कुलाबकर दरवाजा ओलांडून गडात प्रवेश होतो. येथील अंबरखाना म्हणजे धान्य कोठार प्रेक्षणीय आहेत. गडावर विपुल प्रमाणात पाणी साठवण्यासाठी टाकी आहेत. त्यातील 'गंगा-यमुना' टाकी आवर्जून बघण्यासारखी! गडाचा आकार बाणाच्या अग्रासारखा निमुळता आहे. उत्तरेकडच्या जागेस कडेलोट टोक म्हणतात. त्या अलीकडे माचीवर मध्यभागी पाण्याचे मोठे तळे आहे, याचे नाव बदामी तलाव! त्याच्या अलीकडे काठावर आहेत सरकारवाडे तिथेच एका खोलीत शिवप्रभूंनी जन्म घेतला. विपुल पाणी, भरलेले धान्य कोठार, बुलंद आणि बेलाग किल्ला व जीवाला जीव देणारी सहकारी मिळाले तर शिवनेरी केवळ अजिंक्य आहे. मरगळलेल्या मनाला उभारी देणारी आणि मान वर करून स्वाभिमानाने जगायला शिकवणारी ही शिवस्थानं पाहायलाच हवी!

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# २१ जुलैपासून शहर परिसरासह सर्वदूर धो-धो कोसळण्याचा तज्ज्ञांचा अंदाज

## दक्षिण मराठवाड्यात येलो अलर्ट

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

सोमवार, २१ जुलैपासून छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यात सर्वदूर पावसाला सुरुवात होणार आहे. २१ पासून २२ आणि २३ जुलै असे सलग तीन दिवस पाऊस कोसळणार आहे. १७, १८ चा पाऊस बहुतांश ठिकाणी झाला नाही. काही मोजक्या ठिकाणी अतिवृष्टी स्वरूपात पडला, असे हवामान अभ्यासक राजाभाऊ उगले यांनी सांगितले.

पावसाच्या उघडिपीमुळे तापमानाचा पारा तिशीपार असून, उन्हाचा चटका आणि उकाडा वाढला आहे. मराठवाड्याच्या दक्षिणेकडील जिल्ह्यांत विजांसह पावसाची शक्यता असल्याने दक्षतेचा इशारा (येलो अलर्ट) हवामान विभागाने दिला आहे. उर्वरित ठिकाणी विजांसह हलक्या सरींची शक्यता वर्तविण्यात आली आहे, असे हवामानतज्ज्ञांनी सांगितले.

ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे म्हणाले, उत्तर प्रदेश आणि परिसरावर तीव्र कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय आहे. ही प्रणाली मध्य प्रदेशाकडे सरकत आहे. मान्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा राजस्थानमधील बिकानेरपासून दातीया, तीव्र कमी दाबाचे केंद्र, देहरी, पुरुलिया, दिघा ते आग्नेय बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे.

_दक्षिण मराठवाड्यातील लातूर, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड या जिल्ह्यांत विजांसह पावसाची शक्यता असल्याने दक्षतेचा इशारा (येलो अलर्ट) देण्यात आला आहे. काही तुरळक ठिकाणी विजांसह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. धाराशिव, लातूर, बीड, परभणी, हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्यात पावसाची शक्यता असल्याने दक्षतेचा इशारा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

# २२ जुलै रोजी पंडित दीनदयाल रोजगार मेळावा

अहिल्यानगर, दि.१७– जिल्ह्यातील उमेदवारांना विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी २२ जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत कै. माणिकराव नरसिंगराव पाटील, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुरुडगावरोड, अहिल्यानगर येथे पंडित दीनदयाल रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे. मेळाव्यात जिल्ह्यातील १५ ते २० नामांकित कंपन्यांचे उद्योजक सहभागी होऊन प्रत्यक्ष मुलाखती घेऊन उमेदवारांची निवड करणार आहेत. एचएससी, सर्व शाखेतील पदवीधर, आयटीआय, डिप्लोमा आणि डिग्रीधारक उमेदवारांनी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर तसेच https://forms.gle/CDMcrNKWzDNp-brL9 या लिंकवर आपली नोंदणी करून पात्रतेनुसार अर्ज करावा.

अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांकक ०२४१–२९९५७३५, रोजगार मेळावा समन्वयक वसीमखान पठाण (९४०९५५५४६५), संतोष वाघ (८८३०२१३९७६), बद्रीनाथ आव्हाड (९४२०७२५२८०) आणि योगेश झांजे (९५८८४०८८९०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### केंद्रपुरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा – खा. वाकचौरे

# योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा : खा. निलेश लंके

अहिल्यानगर, दि.१८ – सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी राबवल्या जाणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी समन्वय व सकारात्मक दृष्टीकोनातून प्रभावीपणे करावी, असे निर्देश खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी दिले. तर योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी अधिकाऱ्यांनी संवेदनशीलपणे काम करा, असे आवाहन खासदार निलेश लंके यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केंद्र पुरस्कृत जिल्हा विकास समन्वय व नियंत्रण (दिशा) समितीच्या बैठकीत अध्यक्षस्थानी बोलताना श्री. वाकचौरे यांनी मार्गदर्शन केले. बैठकीस सहअध्यक्ष खासदार निलेश लंके, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, आयुक्त यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, सदस्या सुनीता भांगरे, प्रकल्प संचालक राहुल शेळके आदी उपस्थित होते.

खासदार वाकचौरे म्हणाले, रोजगार हमी योजनेतून बेरोजगारांना शाश्वत रोजगार मिळावा यासाठी निधीचा पुरेपूर वापर करावा. प्रत्येकाला हक्काचे घर मिळावे, यासाठी घरकुल योजना अधिक जोमाने राबवावी. महावितरणशी संबंधित प्रलंबित प्रश्नांचे निवारण करण्यासाठी स्वतंत्र बैठक घ्यावी. जिल्ह्याला सोलरयुक्त करण्यासाठी सोलर योजनेत गती द्यावी. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील कामांची गुणवत्ता चांगली राहावी, याकडे लक्ष द्यावे. अंत्योदय योजनेत लाभार्थ्यांना पुरेसे धान्य व शिधापत्रिका मिळाल्याची खात्री करावी.

योजनांचे उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करून लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवाव्यात. यासाठी तालुका स्तरावर मेळावेही घ्यावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

खासदार निलेश लंके म्हणाले, कृषी विभागाच्या योजना तातडीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवाव्यात. ठिबक, स्प्रिंकलर, कांदाचाळ आदींच्या अनुदानाची रक्कम थेट खात्यावर जमा करावी. मागेल त्याला सोलर योजनेसाठी पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळावा व हयगयी करणाऱ्या एजन्सींवर कारवाई करावी.

ग्रामीण भागातील रोहित्र त्वरित दुरुस्त करून नागरिकांचा त्रास कमी करावा. स्वस्त धान्य दुकानांवरील कारवाई नियमाप्रमाणे व्हावी. पीक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा पाठपुरावा करावा.

शाळांतील पोषण आहार व रुग्णालयातील सेवा दर्जेदार ठेवाव्यात. महापालिकेची कामे वेळेत पूर्ण करावीत व गणेशोत्सवापूर्वी शहरातील रस्त्यांची दुरुस्ती व्हावी, असे निर्देशही श्री. लंके यांनी दिले.

# ढोल ताशांच्या गजरात आ प्रशांत बंब यांचे माता पित्यांसह वृक्षारोपण

### निसर्गाशी एकरूप होण्याचे केले आवाहन

खुलताबाद प्रतिनिधी

ज्याप्रमाणे आईला मुलाने कितीही त्रास दिला तर ती तोंडातू भ्र शब्दही काढत नाही; त्याचप्रमाणे आपण देखील कोणत्या ना कोणत्या कारणासाठी, घराच्या, इमारतीच्या अडचणीसाठी मोठया प्रमाणात झाडांची कत्तल करतो. आणि झाडे देखील निमूटपणे सहन करतात. परंतु आता प्रत्येकाने एक तरी झाड लावून ते जगवले पाहिजे व निसर्गाशी सर्वांनी एकरूप झाले पाहिजे असे आवाहन गंगापूर खुलताबाद मतदारसंघाचे आ प्रशांत बंब यांनी केले

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्या जन्मदिवसानिमित्त एक पेड मा के नाम हे अभियान राबविण्यात येत असून गंगापूर तालुक्यातील दिवशी पिंपळगाव येथे भारतमाता मंदिर परिसरात (दि.१९) रोजी मोठ्या प्रमाणात ढोलताशांच्या गजरात, लेझीम खेळत वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर मातोश्री कांचन बंब, वडील डॉ. बन्सीलला बंब, सरपंच मोहन बडोगे, धन्वंतरी डॉ. असोसिएशनचे डॉ. जीवन ताजी डॉ.रणजीत गायकवाड, डॉ.गणेश जाधव, डॉ. जगताप डॉ.खरात व्यापारी सुरेश मुनोत, प्रीतम मुथा, कृउबा समिती सभापती शेषराव जाधव, गटशिक्षणाधिकारी कापसे, विस्ताराधिकारी सकदेव यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. पुढे बोलताना बंब म्हणाले



की, येत्या २२ जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्म दिवस असून त्या अनुषंगाने गंगापूर आणि काही खुलताबाद तालुक्यात विविध समाजोपयोगी वेगवेगळे उपक्रम हाती घेतले आहे. त्याच एक भाग म्हणून एक पेड मा के नाम या अभियानांतर्गत सुलतानाबाद,आरापूर, खडक नारळा, वैरागाड, माळीवाडगाव, पाचपीरवाडी आणि दिवशी पिंपळगाव या ठिकाणी १० हजार झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे. त्यापैकी ९० टक्के झाडे जगवण्याचा मानस देखील त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हा परिषद शाळा पिंपळगाव दिवशी तसेच सहकार अकॅडमीचे विद्यार्थी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होऊन ढोल ताशांच्या गजरात आमदार प्रशांत बंब यांनी लेझीम खेळत वृक्षांची मिरवणूक काढून भारत माता मंदिर परिसरामध्ये जवळपास ५०० झाडांचे वृक्षारोपण करण्यात येऊन दि. ३० जुलैपर्यंत हे अभियान असेच सुरू राहणार असून हजारो वृक्षांची लागवड करण्यात येणार असल्याची माहिती भाजप तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली. दरम्यान यावेळी डॉक्टर असोसिएशनचे सदस्य, सहकार अकॅडमीचे शिंदे व विद्यार्थी, जिल्हा परिषद शाळा दिवशी पिंपळगाव येथील शिक्षक, विद्यार्थी भाजप युवा जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, सुरेश जाधव, महेश गुजर, सदस्य इंद्रजीत जाधव, ज्ञानेश्वर वर्णे, सुजित वावरे, सुनील वावरे, बाळू वावरे, आकाश बडोगे, सुनील बोडके, सचिन बडोगे, राम बोडोगे, वैभव वरणे, संदीप शेलार, मीनाताई संजय पांडव, शिलाताई गाडे, कविता चव्हाण, आबासाहेब सरोवर, ज्ञानेश्वर आहेर, ज्ञानेश्वर निकम, अंबरसिंग जंघाळे, शरद नायमाने, सुनील जोनवाल, गणेश देशमुख, शिवनाथ मालकर, गुजर सर, रवि राठोड, मदन सुंदरडे, कृष्णा कीर्तिकर, मच्छिंद्र कीर्तिकर, गणेश देशमुख, भगवान बनकर, गणेश कुकलारे, गणेश चव्हाण, तुळशीराम झळके, श्रीहरी मांडवगड, गोरख लांडगे, निखिल चव्हाण, गणेश लांडगे, यांच्यासह मोठ्या प्रमाणात परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# पैठणच्या दिंडीने घेतले श्री मोहिनीराज यांचे दर्शन

तभा वृत्तसेवा


पैठण दि १९ : श्री क्षेत्र पैठण च्या दक्षिण काशीतील श्री मोहिनीराज देवतांच्या दर्शनासाठी पैठण ते श्री क्षेत्र नेवासा पायी दिंडी पैठण येथील गावातील नाथ वाड्यातील विजयी पांडुरंगाचे दर्शन घेऊन निघाली. पायी प्रवास करीत हि दिंडी नेवासा येथील भगवान विष्णूंचा अवतार असलेल्या मोहिनीरूपाची अर्ध नारी व नर असलेले श्री मोहिनीराज मंदिरात पोहचली. भक्तांनी मंदिरात मोहिनीराज देवतेचा जय जयकार करत मनोभावे दर्शन घेतले.

अनेक वर्षांपासून आषाढ मासिक पर्वात दरवर्षी तीन दिवशीय परंपरा चालीरीती व रूढी प्रमाणे पैठणकर दिंडीने नेवास येथील श्री मोहिनीराजांच्या दर्शनासाठी जातात. दिंडी प्रस्थान करण्यापूर्वी गातील नाथ मंदिरात नाथ



वंशज ह. भ. प. रावसाहेब महाराज गोसावी व ह. भ. प. प्रफूल्लबुवा तळेगावकर महाराज यांच्या हस्ते श्री मोहिनीराज पादुकांची व प्रतिमा पूजन वे. मू.उत्तमगुरू सेवनकर, वे. मू. रेणुकादास गुरू गर्गे,वे.मू.विजयगुरू शिवपुरी ,वे.मू.सतिषगुरू वाघेश्वरी, वे. मू. प्रमोदगुरू आपेगावकर यांच्या मंत्रघोषात पार पडले. हा दिंडी उत्सव साजरा करण्यासाठी नगराध्यक्ष सुरज लोळगे, वे.मू.दत्तागुरू सेवनकर, तुळसीदास आठवे, योगेश गर्गे,रविंद्र कुलकर्णी मुधलवाडकर,भालचंद्र कुलकर्णी नंदकिशोर देऊळगावकर,विजय वाहेगावकर,ऋषीकेश गर्गे, देवेंद्र शिवपुरी,सतिष गोले, देविदास आखेगावकर, सखाराम सेवनकर, दिनेश गर्गे,भुषण भंडारी,योगेश धर्माधिकारी,हरेश शिवपुरी,चेतन देव, विनोद कुलकर्णी,वे. मू. अनंत खरे कृष्णकांत निवारे, सचिन गाडेकर, देवेश मुळे, राजूदेवा कुलकर्णी, समर्थ जोशी, सतिषराव येळीकर, संतोष मुळे, अनंतराव देशपांडे, डॉ. पांडुरंग कुलकर्णी, संत नागेबाबा संस्थान, भाऊसाहेब गायकवाड, विलासराव लोखंडे, चंद्रकांत काळे पाटिल, अनिलराव बडवे, श्री भालचंद्र बडवे यांनी परिश्रम घेतले

# युवक काँग्रेसतर्फे वृक्षारोपण व शालेय साहित्य वाटप



पैठण दि १९:- जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या वाढदिवसानिमित्त पैठण तालुक्यात युवक काँग्रेसच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत पैठण तालुक्यातील चणकवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून त्यांच्या शिक्षणास हातभार लावण्यात आला. त्याचप्रमाणे परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.याप्रसंगी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष संभाजी काटे, तालुका अध्यक्ष रवींद्र आमले, अनुसूचित जाती जमाती सेलचे तालुका अध्यक्ष अनिल मगरे, तसेच सज्जनदादा भोसले, बबलू मगरे, बबरू कदम आदींची उपस्थिती होती

# बुलडाणा अर्बनचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.सुकेशजी झंवर यांचा स्वागत समारंभ संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ जुलै

सहकाराला सामाजिक कार्याची जोड देऊन सर्वसामान्य घटकांच्या आर्थिक व सामाजिक उत्थानासाठी कार्य करणाऱ्या बुलडाणा अर्बन संस्थेच्या सिल्लोड विभागीय कार्यालय येथे संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.सुकेशजी झंवर यांची दि.१८ शुक्रवार रोजी सिल्लोड विभागातील शाखा व्यवस्थापक यांची एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.यावेळी त्यांनी संस्थेच्या व्यवहार वाढीकरिता गोदाम व सोनेतारण कर्ज तसेच ठेवीवाढ,संस्थेच्या सामाजिक उपक्रम वृक्ष लागवड व वृक्षांसाठी



जाळी.शाळा,मंदिर व पोलीस स्टेशनला आसन व्यवस्थे साठी बाकडे उपलब्ध करून देणे,गरीब गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करणे तसेच संस्थेची माहिती देण्यासाठी जनसंपर्क वाढविणे त्याचबरोबर शेतकरी मेळावा,कृषी केंद्र मेळावा,जिनिंग प्रेसिंग यांचा मेळावा आयोजित करणे.शाखा वर्धापन दिन साजरा करणे, स्थानिक संचालक सभा नियमितपणे आयोजित करणे या विषयांवर मार्गदर्शनपर सूचना केल्या,तसेच विभागातील शाखांची माहिती घेतली.यावेळी सुरेश बनकर,अशोक गरुड, स्थानिक संचालक गोपालजी चांडक,हरीश खंडेलवाल तसेच रतनकुमार डोभाळ,अमोल डोभाळ,ड.संजय मंडलेचा,शीतल गोसावी यांच्या वतीने नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.सुकेशजी झंवर यांचा स्वागत सत्कार करण्यात आला. सदर कार्यशाळेसाठी विभागीय व्यवस्थापक संजय दळवी, विभागीय लेखा परीक्षक व सर्व शाखा व्यवस्थापक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# छत्रपती संभाजीनगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सिमांकनासाठी सहकार्य करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.१८ :–छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, क्षेत्रात भविष्यातील विकासाचे नियोजन करण्यासाठी सिमांकन करण्यात येत आहे. तसेच बांधकामाबाबत भविष्यात होणारी नागरिकांची फसवणूक व आर्थिक हानी टाळण्याच्या दृष्टीने संबंधित विभागाचे ना–हरकत प्रमाणपत्र घेऊन व बांधकाम परवानगी घेऊनच बांधकामे करावीत तसेच संबंधित यंत्रणांना सिमांकनासाठी सहकार्य करावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, क्षेत्रात गेल्या आठवड्याभरापासून रस्त्यांच्या सिमांकनाची कार्यवाही संबंधित यंत्रणांकडून सुरु आहे, सदर सिमांकनांच्या कार्यवाहीबाबत नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

सद्यस्थितीत प्राधिकरण क्षेत्रातील प्रमुख रस्त्यांची शासन नियमात नमूद केलेल्या इमारत रेषा व नियंत्रण रेषा यांचे सिमांकन करण्याची कार्यवाही संबंधित यंत्रणा जसे की, सार्वजनिक बांधकाम विभाग, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जागतिक बैंक, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर व इतर यंत्रणाकडून सुरु आहे.

शासनाने प्रत्येक रस्त्याच्या प्रकारानुसार इमारत रेषा व नियंत्रण रेषा रस्त्याच्या मध्यापासून किती अंतरावर असाव्यात या बाबतची नियमावली मंजूर केलेली आहे. सद्यस्थितीत अशा जागा हद्द फक्त नागरिकांना अवगत व्हावे म्हणून सिमांकीत करण्यात येत आहेत.

यंत्रणांच्या मालकीच्या जागेत रस्त्यात येणारी तात्पुरते पक्की बांधकामे अतिक्रमीत समजण्यात येतील व तो संबंधित विभागाकडून निष्कासित करण्यास पात्र ठरतील.

नियंत्रण इमारत रेषेच्या आतमध्ये येणारी व संबंधित विभागाकडून परवानगी न घेता केलेली बांधकामे ही अनधिकृत समजण्यात येतोल, अशी अनधिकृत बांधकामे निर्मूलनाबाबत तूर्त कार्यवाही करण्यात येणार नाही.

भविष्यातील विकासाचे नियोजन करण्यासाठी सिमांकन करण्यात येत आहे. तसेच बांधकामाबाबत भविष्यात होणारी नागरिकांची फसवणूक व आर्थिक हानी टाळण्याच्या दृष्टीने संबंधित विभागाचे ना–हरकत प्रमाणपत्र घेऊन व बांधकाम परवानगी घेऊनच बांधकामे करावीत तसेच संबंधित यंत्रणांना सिमांकनासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

# ५० दिवसांत १०० रोबोटिक शस्त्रक्रियां केवळ संख्या नाही; रुग्णांचा आमच्यावर असलेला विश्वास – डॉ. दीपेन शाह

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर – एखाद्या व्यक्तीच्या आणि त्यांच्या प्रियजनांच्या जीवनावर वेदनांचा किती खोल परिणाम होऊ शकतो हे आम्हाला समजते. आमचे ध्येय केवळ रोग बरे करण्यापलीकडे जाते; ते आशा, प्रतिष्ठा आणि पूर्ण जीवन जगण्याची क्षमता पुनर्संचयित करण्याबद्दल आहे. ५० दिवसांत १०० रोबोटिक शस्त्रक्रियांचा हा टप्पा केवळ एक संख्या नाही; तो आमच्या रुग्णांचा आमच्यावर असलेल्या विश्वासाचा आणि एका वेळी एक वेदनारहित पाऊल टाकून, हृदयाला स्पर्श करणारी आणि जीवन बदलणारी करुणामय, अत्याधुनिक काळजी प्रदान करण्याच्या आमच्या अटळ वचनबद्धतेचा पुरावा आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटल्स नवोपक्रमात आघाडीवर आहे, त्यांच्या रुग्णांसाठी सर्वोत्तम संभाव्य परिणाम सुनिश्चित



करण्यासाठी सतत प्रगत तंत्रज्ञान आणि उच्च कुशल व्यावसायिकांमध्ये गुंतवणूक करत आहे. या महत्त्वपूर्ण कामगिरीसह, मेडिकोव्हर हॉस्पिटल्सने आरोग्यसेवा क्षेत्रातील एक विश्वासार्ह भागीदार म्हणून आपले स्थान पुन्हा एकदा सिद्ध केले आहे, जे लोकांना वेदनांच्या बंधनातून मुक्त भविष्य स्वीकारण्यास मदत करण्यासाठी समर्पित असल्याचे मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे डॉ. दीपेन शाह म्हणाले ते हॉस्पिटल ने केवळ ५० दिवसांत १०० यशस्वी रोबोटिक शस्त्रक्रिया केल्याबद्दल आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

पुढे बोलताना केवळ ५० दिवसांच्या आश्चर्यकारक कालावधीत १०० रोबोटिक शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या. ही ऐतिहासिक कामगिरी मेडिकोव्हरच्या नावीन्यपूर्णतेसाठी, प्रगत वैद्यकीय सेवेसाठी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आता वेदनामुक्त भविष्याकडे वाटचाल करणाऱ्या १०० हून अधिक व्यक्तींच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याच्या समर्पणाला अधोरेखित करते असे शहा म्हणाले.

या वेळी डॉ. किशोर मुंडे, डॉ. कपिल पोरे, डॉ. मालपाणी, म्हणाले, आमच्या टीमच्या अथक समर्पणाचा आणि कौशल्याचा आम्हाला खूप अभिमान आहे, ज्यामुळे ही उल्लेखनीय कामगिरी साध्य झाली आहे. या १०० शस्त्रक्रियांपैकी प्रत्येक शस्त्रक्रिया जीवनाला स्पर्शून गेलेल्या, गतिशीलता, स्वातंत्र्य आणि आनंद परत मिळवण्यासाठी सक्षम झालेल्या रुग्णाचे प्रतिनिधित्व करते. रोबोटिक शस्त्रक्रिया आम्हाला अतुलनीय अचूकतेसह अत्यंत जटिल प्रक्रिया करण्यास सक्षम करते, ज्यामुळे आमच्या रुग्णांना कमी वेदना, लहान चीरे आणि लक्षणीयरीत्या जलद पुनर्प्राप्ती मिळते. पूर्ण आणि सक्रिय जीवनाकडे परतण्याच्या त्यांच्या प्रवासावर या तंत्रज्ञानाचा खोलवर परिणाम पाहणे खरोखरच नम्र असल्याचे नमूद केले.

# विठ्ठल इंगळे यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ जुलै – काळे नगर येथील रहिवासी विठ्ठल तुकाराम इंगळे (वय.७५) यांचे अल्पशा आजाराने दि.१९ शनिवार रोजी सकाळी ६:०५ वाजता निधन झाले.त्यांचेवर दुपारी १:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले,एक मुलगी,सुना,नातवंडे असा परिवार आहे. ते माजी नगरसेवक भगवान इंगळे यांचे ते मोठे बंधू होत.

# सोयगाव खरेदी विक्री संघाच्या चेअरमनपदी राजेंद्र राठोड तर व्हाईस चेअरमनपदी रंगनाथ वराडे

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ जुलै

सोयगाव तालुका खरेदी विक्री संघाच्या चेअरमन व्हाईस चेअरमन पदाच्या निवडणूकीसाठी शनिवार रोजी सोयगाव येथील खरेदी विक्री संघाच्या कार्यालयात प्रक्रिया पार पडली.या निवडणुकीत चेअरमन पदी शिवसेना (उबाठा) जिल्हाध्यक्ष राजेंद्र राठोड यांची तर व्हाईस चेअरमनपदी रंगनाथ रामदास वराडे यांची निवड झाली.या निवडीनंतर सोयगाव शहरातील आमदार अब्दुल सत्तार यांच्या जनसंपर्क कार्यालय सेनाभवन समोर कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.याप्रसंगी आमदार






सोयगाव तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत आमदार अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना (शिंदे गट ) व शिवसेना (उबाठा) दोन्ही गटाचे पदाधिकारी एकत्र येवुन त्यांनी शेतकरी सहकार विकास पॅनलच्या छत्री निशाणीवर निवडणूक लढली होती.या निवडणुकीत शेतकरी सहकार विकास पॅनलचे १७ पैकी १३ उमेदवार निवडून आले. दि.२९ जून २०२५ रविवार रोजी निवडणूक झाली होती.तर दि.३० जून सोमवार रोजी मतमोजणी होवून निकाल जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर आज चेअरमन,व्हाईस चेअरमन पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली.

अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती.आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत नवनिर्वाचित चेअरमन,व्हाईस चेअरमन व संचालकांच्या उपस्थितीत शहरात भव्य विजयी मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणुकीदरम्यान एका खुल्या वाहनातून नवनिर्वाचित चेअरमन राजेंद्र राठोड,व्हाईस चेअरमन व संचालकांनी शहरवासीयांचा सत्कार स्वीकारून मतदार व नागरिकांचे आभार मानले.प्रारंभी सेनाभवन येथे नवनिर्वाचित चेअरमन,व्हाईस चेअरमन व संचालकांचा आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या विजयी रॅलीमध्ये नवनिर्वाचित संचालक प्रभाकर आबा काळे,संजय निकम,सुभाष बोरसे,मुरलीधर वेहळे, भगवान लहाने,राधेश्याम जाधव,गुलाबसिंग पवार,चंदाबाई राजपूत,प्रतिभा सोळंके,भारत तायडे,मोतीराम तेली यांच्यासह शिवसेना शिंदे गट व उबाठा गटाचे पदाधिकारी – कार्यकर्ते उपस्थित होते.

# बजाजनगर जैन मंदिरात २० जुलै रोजी चातुर्मास कळस स्थापनेचे आयोजन

## आर्यिका विपुलमती माताजी यांचा होणार चातुर्मास

छत्रपती संभाजीनगर – श्री.१००८ संभवनाथ दिगंबर जैन मंदिर महाराणा प्रताप चौक बजाजनगर येथे प.पु.आचार्य विवेकसागरजी महाराज यांच्या शिष्या प.पु.आर्यिका १०८ विपुलमती माताजी, आर्यिका विमुक्तमती माताजी, क्षुल्लिका विशालमती माताजी यांच्या २०२५ चा चातुर्मास होणार असुन दिनांक २० जुलै रोजी दुपारी १ वाजता चातुर्मासाची मंगल कलश स्थापना होणार आहे. यावेळी अनिता महावीर संकेत कासलीवाल परिवाराच्या वतीने धर्मध्वजारोहन होउैन कार्यकमाची सुरैवात होणार आहे. तसेच यावेळी उपस्थित भाविकांना संभवनाथ ग्रुप बजाजनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे. आमदार पालकमंत्री संजयजी शिरसाट साहेब व खासदार संदीपानजी भुमरे छत्रपती संभाजीनगर उपस्थित राहणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष डॉ.राजेंद्र काला, सचिव सुजित गोधा, उपाध्यक्ष अतुल चुडीवाल, कोषाध्यक्ष सुदेश अजमेरा, चातुर्मास समिती अध्यक्ष डॉ.दिलीप चुडीवाल,



उपाध्यक्ष अनिल गोधा, कोषाध्यक्ष सचिन पाटणी यांच्यासह धर्म रक्षिका वर्षायोग समिती २०२५ व सकल जैन समाज बजाजनगर यांनी केले आहे. वरील कार्यकम संभवनाथ दिगंबर जैन मंदिर महाराणा प्रताप चौक बजाजनगर येथे होणार आहे.

कार्यकमासाठी छत्रपती संभाजीनगर शहराच्या विविध भागातुन व जिल्हयातुन भाविक उपस्थित राहणार आहे. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेदं्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

## अग्रलेख...

# लोकशाहीची मान झुकली

राज्यातील लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र विधानभवनात गुरुवारी सायंकाळी जे काही घडले, त्यामुळे लोकशाहीवर प्रेम करणाऱ्यांची मान शरमेने खाली झुकली, असे म्हणायला हरकत नाही. एखाद्या ॲक्शनपॅक्ड चित्रपटातील हाणामारीचे शूटिंग आपण पाहात असल्याचे प्रत्यक्षदर्शींना वाटले. हा सारा प्रकार 'याचि देही याचि डोळा' पाहून यातील अनेकांच्या डोळ्यांचे पारणेही फिटले असेल. तर अशा मोक्याच्या क्षणी त्याठिकाणी आपण नव्हतो, म्हणून अनेकांनी आपल्या नशिबाला दोष दिला असेल. एखाद्या महाविद्यालयात निवडणुकीच्या वेळी विद्यार्थ्यांच्या दोन गटांत जशी हाणामारी होत असते, तशीच हाणामारी आमदारांच्या दोन गटांत विधानमंडळात घडल्यामुळे आम्ही कोणत्या लायकीचे लोकप्रतिनिधी निवडून दिले, असा प्रश्न मतदारांना पडणे स्वाभाविक म्हणावे लागेल. ही हाणामारी बाहेर रस्त्यावर झाली असती तर लोकांना त्याचे फारसे वाईट वाटले नसते. पण विधानसभवनात झाल्यामुळे त्याचे गांभीर्य कित्येक पटींनी वाढले. महाविद्यालयीन विद्यार्थी तरी हाणामारी करताना थोडीफार लाजलज्जा ठेवतात, मर्यादा पाळतात, पण या दोन आमदारांच्या समर्थकांनी तर सगळ्या मर्यादा आणि लाजलज्जा सोडून तमाशा केला. त्यामुळे विधानभवनाच्या परिसरात जो काही राडा झाला, त्याचे वर्णन नंगानाच असे केले तरी ते फारसे चूक ठरणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांनी जो काही तमाशा केला, ते पाहून 'हेचि फळ काय मम तपाला' असे राज्यातील जनतेला वाटले तर त्यांना दोष देता येणार नाही. यात सुदैवाची बाब म्हणजे जे काही घडले त्यात आव्हाड आणि पडळकर यांचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता, तर अप्रत्यक्ष सहभाग होता. म्हणजे दोघांनी आपल्याला कार्यकर्त्यांना चिथावणी दिली, असे म्हणायला हरकत नाही. विधानभवनाच्या दोन्ही सभागृहांत आतापर्यंत गोंधळ आणि गदारोळ नेहमीच होत होता. पण आता सभागृहाच्या बाहेर म्हणजे विधानभवनाच्या आवारात नाही तर प्रत्यक्ष विधानभवनातही हाणामाऱ्या सुरू झाल्या आहेत.

या प्रकाराला सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत आळा घातला नाही तर उद्या विधानभवनाच्या आवारात गोळीबार झाला, चाकूने वार करत खून झाला तरी आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण आम्ही आजपर्यंत जे पेरत आलो, तेच उगवायला आता सुरुवात झाली आहे. या घटनेसाठी कोणत्याही एका पक्षाच्या आमदारावर ठपका ठेवता येणार नाही. टाळी जशी एका हाताने वाजत नाही, तसेच विधानभवनातील गुंडागर्दीच्या या घटनेसाठी दोन्ही पक्षांचे आमदार सारखेच जबाबदार म्हणायला पाहिजेत. आतापर्यंत बिहार आणि उत्तरप्रदेश विधानभवनात जे घडत होते, ते आता महाराष्ट्राच्या विधानभवनातही घडू लागले आहे. आमचे डोळे आताही उघडले नाहीत तर याच्यापेक्षाही गंभीर स्वरूपाच्या गुन्हेगारी घटना विधानभवनात घडलेल्या आम्हाला पाहाव्या लागतील. जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर म्हणजे एकाला झाकावे आणि दुसऱ्याला काढावे, असे म्हटले पाहिजे. दोन-तीन दिवसांपासून या दोघांमधील तणाव वाढला होता, एक दुसऱ्याला शिवीगाळ करण्यापर्यंत आणि धमक्या देण्यापर्यंत दोघांची मजल गेली होती. त्यामुळे हे दोन्ही आमदार ज्या पक्षाचे आहे, त्या पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांनी याची तातडीने गंभीर दखल घेत दोघांनाही समज द्यायला पाहिजे होती, पण तसे झाल्याचे दिसले नाही. त्यामुळे या दोघांनी आणि त्यांच्या समर्थकांनीही सर्व मर्यादा ओलांडल्या. आपण कसंही वागलो तरी आपले कोणीही काही वाकडे करू शकत नाही, असा समज या दोन्ही नेत्यांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी करून घेतला असावा असे वाटते. जो घटनाक्रम समोर आला, त्यावरून दोन तीन दिवस आधी जितेंद्र आव्हाड यांनी गोपीचंद पडळकर यांना पाहून आणि त्यांना ऐकू जाईल अशा आवाजात मंगळसूत्र चोर असे म्हटले. मुळात आव्हाड यांनी अशी चिथावणीखोर कृती का केली, हे त्यांनाच माहिती. याचीच परिणती गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांच्यात दुसऱ्या दिवशी एकदुसऱ्याला शिवीगाळ करण्यात आणि धमक्या देण्यात झाली. या दोन आमदारांमधील गंभीर स्वरूपाचे मतभेद समोर आले, पण थोड्याफार फरकाने असेच मतभेद आणखी काही आमदारांमध्येही असू शकतात, त्यामुळे झाला तो प्रकार म्हणजे हिमनगाचे वरचे टोक म्हणायला हरकत नाही. राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्याचे आतापर्यंत म्हटले जात होते, त्याची प्रचीती या घटनेने आणून दिली आहे. काही वर्षांपूर्वी राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचा आढावा घेण्यासाठी वोरा समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने काँग्रेस राजवटीतच आपला अहवाल सादर केला होता, पण अन्य अहवालांचे जसे होते, तसेच या अहवालाचेही झाले. हा अहवालही दाबून ठेवण्यात आला. तो बाहेरही येऊ दिला नाही. पण अहवाल जरी दाबला तरी राजकारणातील गुन्हेगारी दबून थोडीच राहणार? ती वेगवेगळ्या निमित्ताने आणि रूपात समोर येतच असते. जशी ती महाराष्ट्र विधानभवनात पडळकर आणि आव्हाड यांच्यात रूपात समोर आली. विधानभवनाचा परिसर हा विधानसभेच्या अध्यक्षांच्या विशेषाधिकारात असतो. याठिकाणी घडलेल्या कोणत्याही घटनेवर कारवाई करण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षांचाच असतो. त्यांनी परवानगी दिल्याशिवाय वा बोलावल्याशिवाय या ठिकाणच्या घटनेसाठी पोलिसही कारवाई करू शकत नाही. मात्र या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवला आहे, असे दिसते. पोलिसांनी या प्रकरणी आ. जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांच्याविरोधात गुन्हा नोंदवला आहे. देशमुख यांना पोलिस घेऊन जात असताना आव्हाड यांनी पोलिस गाडीसमोर धरणे देत कार्यकर्त्यांवरील आपल्या प्रेमाचे प्रदर्शन केले असले तरी आमदार म्हणून त्यांची वागणूक समर्थनीय म्हणता येणारी नाही. आपल्या कार्यकर्त्याची पाठराखण करण्याचा, त्याला कायदेशीर मदत करण्याचा आव्हाड यांना पूर्ण अधिकार आहे, पण याचा अर्थ ते पोलिस कारवाईत अडथळा आणू शकत नाही. त्यामुळेच सरकारी कामकाजात अडथळा आणल्याचा गुन्हा पोलिसांना त्यांच्यावर दाखल करावा लागला. आपण जबाबदार लोकप्रतिनिधी आहे, याचे भान जसे गोपीचंद पडळकर यांनी ठेवायला पाहिजे होते, तसेच ते जितेंद्र आव्हाड यांनीही ठेवायला पाहिजे होते. आपल्या मतदारसंघातील जनतेने आपल्याला त्यांचे प्रश्न सोडवायला, समस्यांना वाचा फोडायला निवडून दिले आहे, याचे भान या दोन्ही आमदारांनी ठेवले नाही. गुंडागर्दीच्या घटनांनी आपण आपल्या पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांच्या गुडबुकमध्ये जाऊ, असा कोणाचा समज असेल तर तो चुकीचा आहे. अशा कृत्यांनी तुम्ही तुमच्या नेत्याच्या गुडबुकमध्ये नाही तर बॅडबुकमध्ये जाता. कारण अशा घटनांनी पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांचीडी अडचण होत असते.

विधानभवनात जे काही घडले, त्याचे कोणालाच समर्थन करता येणारे नाही. प्रत्येकाला या घटनेचा निषेध करावाच लागला. दोषींवर कारवाई करण्याची मागणी करावी लागली. यावेळी जे झाले ते झाले, पण भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, याची काळजी सर्वपक्षीय नेत्यांना घ्यावी लागणार आहे. कारण 'बुंद से गई वो हौद से नहीं आती', याचे भान सगळ्यांनाच ठेवावे लागणार आहे. महाराष्ट्र हे देशातील प्रगतिशील आणि औद्योगिकदृष्ट्या विकसित राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था ही देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत खूप चांगली आहे. त्यामुळे देशात गुंतवणुकीच्यादृष्टीने महाराष्ट्र सर्वांत पुढे आहे. महाराष्ट्राची ही प्रतिमा आम्हाला कायम ठेवायची आहे. महाराष्ट्राचा आम्हाला महाराष्ट्रच ठेवायचा आहे. त्याचा बिहार आणि उत्तरप्रदेश होऊ द्यायचा नाही. त्यासाठी या प्रकरणातील दोषींवर, मग तो कोणत्याही पक्षाचा, सत्ताधारी पक्षाचा का असेना त्याच्यावर कठोरातील कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. हाच या प्रकरणाचा शोध आणि बोध म्हणावा लागेल.

## यंगिस्तान

# आव्हाडांच्या तोंडी गीता!

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या सुरुवातीच्या टप्प्यात सावरकरांच्या सन्मानार्थ एक बैठक झाली. त्यात छोटेसे भाषण करताना सावरकर म्हणाले, "माझ्याविषयी अनुकूल ग्रह असणारीच मंडळी येथे जमली आहेत; पण प्रतिकूल ग्रह असणारे लोक कोणी जमवले तर मला आनंदच होईल. कारण आपल्याविषयी उलटसुलट सर्व विचार कळणे आवश्यक आहे." राजकारणात विरोधक असतात, शत्रू नसतात हे धोरण स्वा. सावरकरांनी व्यवस्थित अंमलात आणलं होतं. इतकंच काय तर समाजकारणातही वैचारिक विरोधकांचा त्यांनी कधीच द्वेष केला नाही. मात्र दुर्दैव असे की त्यांच्या विरोधकांनी त्यांना सुरुवातीपासूनच शत्रू मानले. आजही त्यांचे विरोधक त्यांना शत्रू मानतात. काँग्रेसचे अहिंसक नेते इंग्रज व जिहादींशी वागताना मिळमिळीत धोरण ठेवत, मात्र आपल्याच बांधवांशी ते कठोरपणे वागत. तेव्हा त्यांच्या अहिंसेची नौका कोणत्या वैचारिक वादळात सापडायची कुणास ठावूक. गांधी हत्येनंतर अहिंसेच्या पुजाऱ्यांनी घातलेला हैदोस महाराष्ट्र अजूनही विसरलेला नाही. १०५ मराठी माणसांचा जीव घेणाऱ्या काँग्रेसचा इतिहास रक्ताने माखलेला आहे. हे संस्कार राजकारणात रुजत गेले आणि राजकारण खुनशी होऊन बसले. जर सावरकर प्रभृती नेत्यांच्या हाती सुरुवातीला सत्ता गेली असती तर खरोखरच देशावर चांगले राजकीय संस्कार झाले असते. मात्र चांगले होत असताना दुर्दैव आपल्या माथी लिहिलेलेच आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना दीर्घायुष्य लाभलं असतं तर हिंदू-मराठ्यांचा इतिहास वेगळा असता. कदाचित इंग्रजी सत्ता भारतावर आलीच नसती. पण दुर्दैव पाहा, संभाजी महाराजांची इस्लामी पद्धतीने हत्या झाली. पुढे बाजीराव पेशव्यांनाही कमी आयुष्य लाभले. त्यामुळे पुढची अनेक गणिते चुकली. त्याचप्रकारे स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर काँग्रेसच्या हाती सत्ता गेल्यामुळे चुकीच्या सवयी अंगवळणी पडल्या. चुकीचे धोरण हेच संस्कार झाले तर सज्जनांनाही त्याच धोरणांचा अवलंब करून दुर्जनांशी तसाच व्यवहार करावा लागतो.

हा इतिहास आठवण्याचं कारण म्हणजे सध्या महाराष्ट्रात पडळकर-आव्हाड यांच्यामधील वाद पेटला आहे. गोपीचंद पडळकर हे गावरान तरुण आहेत आणि जितेंद्र आव्हाडांचा इतिहास सर्वांनाच ठावूक आहे व तो तितकासा चांगला नाही. सत्तेचा व पदाचा वापर करून आव्हाडांनी यापूर्वी अनेकदा सर्वसामान्य माणसांवर गुंडगिरी केलेली आहे. तुम्ही त्यांच्या टीव्हीवरील चर्चा पाहिल्या की ते नक्की आमदार आहेत की अरेरावीचा वेगळा व्यवसाय करत असताना चुकून ते आमदार झाले आहेत, असा प्रश्न आपल्याला पडावा इतका त्यांचा इतिहास लोकशाहीला व ते ज्या संवैधानिक पदावर बसले आहेत त्या पदाला लाजवेल असा आहे. थिएटरमध्ये त्यांच्या कार्यकर्त्यांनी एका सज्जन प्रेक्षकाला केलेली मारहाण असो किंवा एका महिलेला आव्हाडांनी दिलेला धक्का असो, ज्यासाठी त्यांच्यावर घाणेरडे आरोप व तक्रारही झाली होती. आव्हाडांची भाषा ही संसदीय नाही हे आपण सर्वच जण जाणतो. अनंत करमुसे या प्रकरणात तर त्यांनी माणुसकीला काळिमा फासणारे वर्तन केले आहे. एका तरुणाला, त्यांच्यावर टीका केली अशा क्षुल्लक कारणावरून त्याचे अपहरण करून त्याला अमानुष मारहाण केली होती. या प्रकरणातील एका हवालदाराला आत्महत्या करावी लागली. करमुसे यांच्या कुटुंबाला प्रचंड मानसिक तणावाखालून जावे लागले. अनंत करमुसे यांना दोन मुली आहेत. त्या मुलींच्या मनावर काय परिणाम झाले असतील? त्यांच्या पत्नीला किती वेदना झाल्या असतील? पण या सर्वांचा विचार सत्ता असताना, मंत्रिपद असताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संवैधानिक पद असताना आव्हाडांनी केला नाही आणि वर राक्षसी कृत्य केलं, संविधानाची गळचेपी केली, लोकशाहीची हत्या केली. हा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान आहे. तो अपमान ते वेळोवेळी करत असतात. तरीही मुखातून ते संविधान व आंबेडकर असे नामस्मरण करत असतात. हा इतका विरोधाभास करणे हे त्यांना कसे जमते हाच मोठा प्रश्न आहे. म्हणजेच ते उत्तम अभिनेते देखील आहेत, असे म्हणावे का?

सर्वांशीच अरेरावीने वागणारे आव्हाड आज पुन्हा एकदा संविधान वगैरेची भाषा करू लागले आहेत. कारण "मंगळसूत्र चोर" अशा नाक्यावरच्या पोरासारखी चिडवाचिडवी त्यांनी केली. खोटं वाटत असेल तर तो व्हिडीओ सोशल मीडियावर फिरत आहे. तो पाहिल्यावर आपल्याला या वाक्याची प्रचीती येईल. अशा चिडवाचिडवीनंतर गोपीचंद पडळकर आणि आव्हाडांमधील संघर्ष आणखी पेटला. पडळकरांकडून आपल्यावर शिवीगाळ झाली असल्याचे आरोप आव्हाडांनी केले आहेत. आता तर दोघांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाल्याची बातमी झळकते आहे. यानंतर आव्हाडांनी व्हिक्टिम कार्ड खेळायला सुरुवात केली आहे. ते कार्यकर्ते आपल्यालाच मारायला आले होते, असा आरोप त्यांनी केला आहे. काही दिवस आधी संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड यांच्यावर शाईफेक झाली होती. त्यानंतर ते शरद पवारांना भेटले असल्याची बातमी आली. जितेंद्र आव्हाड हे शरद पवार गटाचे नेते आहेत. संभाजी ब्रिगेड या संघटनेने महाराष्ट्राचं वातावरण दूषित करण्याचा विडा उचलला आहे. हिंदुद्वेष, जातीयवाद, ब्राह्मणद्वेष इत्यादी मुद्दे या व अशा तत्सम संघटनांनी निर्माण केले व त्यास बळ दिले. गायकवाड आणि आव्हाड दोघांचाही शरद पवारांशी जवळचा संबंध आहे. पवार हे अत्यंत ज्येष्ठ नेते आहेत. मात्र त्यांचा संबंध अशा लोकांशीच का येतो, हे कोडं महाराष्ट्राला पडलेलं आहे. असो. तर मुद्दा असा की आव्हाड आता व्हिक्टिम कार्ड खेळत असून लोकशाही व संविधानाचे रक्षण कसे करायचे याचे धडे देत आहेत. हे म्हणजे अफझलखानाने मूर्तिपूजेवर प्रवचन देण्यासारखे झाले नाही का! काही का असेना. आव्हाडांच्या तोंडून गीतेचे पाठ ऐकायला मिळत आहेत. आता तरी त्यांनी या वचनाला धरून वागायला हवे. लोकशाही, संविधानाचे रक्षण ही बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात न होता जितेंद्र आव्हाड यांच्या अंगवळणी पडावे ही ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांनी यापुढे कोणालाच त्रास न देण्याची शपथ घ्यायला हवी व लोकशाहीचे रक्षण करण्याचा खरोखर विडा उचलायला हवा. यासाठी त्यांना माझ्या पूर्ण शुभेच्छा आहेत. बाकी माझे असे स्पष्ट मत आहे की लोकप्रतिनिधींनी कायद्याचे पालन करावे जेणेकरून जनतेला कायदा पाळण्याचे प्रोत्साहन मिळेल. वैचारिक विरोधकांना त्यांनी शत्रू मानू नये म्हणजे राजकारण हसतखेळत होत राहील. परंतु ही जबाबदारी काँग्रेस, डावे व त्या संस्कृतीतील पक्ष व नेत्यांची आहे. कारण वर उल्लेख केल्याप्रमाणे राजकारण दूषित करण्याचं काम यांनीच केलं आहे. आता झालेला चिखल स्वच्छ करण्याचे कामही त्यांनी मोठ्या मनाने हाती घ्यायला हवे. नाहीतर सगळेच पडतील चिखलात आणि तोंड होईल काळं!

जय संविधान. जय लोकशाही!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

# शासकीय सदनिकांचा सदुपयोग व्हावा!

**अनिल फेकरीकर**

प्रकल्प अथवा शासकीय उपक्रम सुरू करण्यापूर्वी कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांकरिता खास सदनिकांची अथवा वसाहतींची निर्मिती केली जाते. त्या सदनिका उभारताना हेतू चांगला असतो, पण कालांतराने त्यांची वाट लागते अन् शासनाचा पैसा पाण्यात जातो. परिणामी या सदनिका चोरांसाठी नंदनवन ठरतात. असे प्रकार का होतात, का म्हणून शासकीय विभाग याकडे कानाडोळा करतात, याचे उत्तर शोधायची आता वेळ आलेली आहे.

नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील गुमगावात पोलिस कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून सन २०२१ मध्ये सदनिका बांधण्यात आल्या. पण चार वर्षांचा काळ लोटला तरी तिथे राहण्यासाठी पोलिस कर्मचारी, अधिकारी आलेच नाहीत. असाच प्रकार नागपुरातील राजनगरात सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेल्या सदनिकांच्या संदर्भात घडला होता. या राजनगरातील सदनिकांमध्ये लावण्यात आलेली महागडी वीज उपकरणे, दरवाजे, खिडक्या, नळाचे पाईप, तोट्या सर्व काही सामान चोरांनी अक्षरशः लुटून नेले होते. विशेष म्हणजे सर्व सामान चोरांनी लुटल्यानंतर संबंधित विभागाला जाग आली व त्यांनी पुन्हा नव्याने निविदा काढून त्यांची डागडुजी केली. पण वाया गेलेल्या पैशांचे काय? त्याचे उत्तर राज्यकर्त्यांनी विचारलेच नाही.

तसे पाहता शासकीय सदनिका मिळाव्यात याकरिता पूर्वी आणि आजही गरजवंत कर्मचारी, अधिकारी सतत आटापिटा करीत असतात. तिथेही त्यांना वशिला लावून तोडपाणी करावी लागते. एवढे महत्त्व त्या सदनिकांचे आहे. पण संबंधित विभागाचे थोडे दुर्लक्ष झाल्यास त्याच सदनिका चोरांचे धन होते, असे का व्हावे याचे उत्तर शोधून उपाय करण्याची वेळ आलेली आहे. विदर्भात जलसंपदा विभागाकडून अनेक ठिकाणी वसाहती उभारण्यात आल्या आहेत. पशुसंवर्धन विभागानेही शासकीय निवासस्थाने बांधली आहेत. पोलिसांनीही कर्मचाऱ्यांसाठी घरे बांधली आहेत. वन विभागासह महसूल खात्यानेही कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उपलब्ध करून दिली आहेत. पण आज त्या सर्व वसाहतींची अवस्था दयनीय झाली आहे. कालांतराने घरे खराब होतात, हे मान्य करावेच लागेल. पण समजा त्या निवासस्थानांची योग्य देखभाल केल्यास ती घरे सहजतेने १०० वर्षे टिकतात. पण ते घर वैयक्तिक नसून, शासनाचे असल्याने त्याकडे लक्ष देण्याची कुणालाही गरज भासलेली नाही. याच कारणाने शासनाने बांधलेली शेकडो घरे आज कचराघर आणि चोरांची निवासस्थाने बनली आहेत.

गावखेड्यात राहण्यासाठी चांगली घरे नाहीत, असे म्हणत कर्मचारी, अधिकारी अपडाऊनला प्राधान्य देतात. अशा कर्मचाऱ्यांना मुख्यालयी ठेवायचे झाल्यास अशा शासकीय सदनिकांचा चांगला उपयोग होऊ शकतो. यातून अनेक फायदे होतील. एक तर शासनाला एचआरए अर्थात घरभाडे भत्ता देण्याची गरज भासणार नाही व कर्मचारी/अधिकारी मुख्यालयी राहतील. लोकहिताच्या कामांना प्राधान्य मिळेल. अशावेळी शासकीय सदनिका कुठल्याही विभागाच्या असो, तिथे त्या रिकाम्या राहिल्यास एक खिडकी योजनेनुसार त्यांची व्यवस्था लावण्याचे काम दोन चार अधिकाऱ्यांवर सोपवायला हवे. याकरिता उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, ठाणेदारांच्या नेतृत्वात प्रत्येक तालुक्याची एक समिती गठित केली जावी. त्यांनी आपल्या तालुक्यात नेमकी किती शासकीय निवासस्थाने आहेत, त्यांची वस्तुस्थिती याचा अभ्यास करून गरजवंत कर्मचाऱ्यांना तिथे राहण्याची व्यवस्था करून द्यावी. जेव्हा शासकीय कर्मचाऱ्यांना अशा सदनिका सहजतेने मिळतील तेव्हा ती घरे चांगली राहतील. तेथील सामान चोरण्याची हिंमत कुणाचीही होणार नाही. शासकीय मालमत्तेचे विद्रुपीकरण थांबेल. तिजोरीतून काढलेल्या पैशाचा विनियोग चांगला होईल. खाजगी लोकांना या सदनिका भाडेतत्त्वावर राहायला दिल्या तरीही फायदा शासनाचा होऊ शकतो. उलट अशा योजनेला अधिक प्रतिसाद मिळेल अन् लोक शासकीय निवासस्थानात राहण्यासाठी प्राधान्य देतील. कारण तिथे घरमालकाची अरेरावीसह कटकट राहणार नाही. शासनाकडे चटई क्षेत्राप्रमाणे दर महिन्याचे भाडे भरायचे अन् आनंदात राहायचे, असाही पवित्रा अनेक जण घेतील. ही योजना चांगली वाटत असली तरी यात अनेक अडचणी आणल्या जातील. मात्र सरकारची ताकद अमर्याद आहे. त्यामुळे सरकारने मनावर घेतले तर नक्कीच शासकीय सदनिकांचा सदुपयोग सहज शक्य आहे. केवळ याकरिता इच्छाशक्तीची गरज आहे. ही इच्छाशक्ती प्रत्यक्षात कृतीत उतरल्यास 'घर असावे शासकीय सदनिकांसारखे' असे गाणे म्हणत लाभार्थी सुखावतील.

९८८१७१७८५९

## तंत्रवेध

# व्हिज्युअल डबिंगमध्ये एआयची चमक

**डॉ. दीपक शिकारपूर**

'ऑटोमेशन' आणि 'कृत्रिम बुद्धिमत्ता' ही आज सगळ्यात वेगाने वाढणारी क्षेत्रे बनत चालली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा ॲनालिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा अधिकाधिक ऑटोनॉमस म्हणजे स्वतंत्रपणे निर्णय घेणाऱ्या आणि स्वयंभू बनत आहेत यात शंका नाही. इंडस्ट्री ४.०, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि डेटा अनॅलिटिक्स हे उद्याच्या तंत्रजीवनपद्धतीचे अविभाज्य घटक असतील. व्यक्तिगत तर सोडाच, परंतु औद्योगिक, सामाजिक आणि सार्वजनिक पातळीवर संगणकाच्या या विविध अवतारांचे अत्यंत क्रांतिकारी आणि दूरगामी परिणाम होतील. अनेक पारंपरिक संकल्पना मोडीत निघून नव्या पद्धती चटकन रुळतील. आज संगणकीय सूक्ष्म तंत्राचा प्रवेश प्रत्येक पैलूमध्ये झालेला आढळेल, किंबहुना तो तसा असणे हेच आपण गृहीत धरू इतक्या सहज हा बदल होणार आहे. याला 'इंटेलिजंट कॉम्प्युटिंग' असे म्हटले जाते. या क्षेत्रातील सतत बदलणारे तंत्रज्ञान आपल्या जगण्याच्या कल्पनाच बदलेल. बदलांचा हा वेग येत्या पाच-दहा वर्षांमध्ये अधिक वाढणार आहे. तो अधिक सर्वव्यापी होईलच, पण ज्या पैलूंमध्ये बदल दिसण्याची आपण कल्पनाही केली नव्हती अशा ठिकाणी तो आढळेल

आगीचा वापर किंवा चाकाच्या शोधापेक्षा कृत्रिम बुद्धिमत्ता हा एक महत्त्वाचा शोध टप्पा ठरू शकतो. हे जगात आतापर्यंतचे सर्वांत वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान आहे. यामध्ये भाषा मॉडेल्स आणि सॉफ्टवेअर एजंट्सद्वारे अनेक व्हाईट-कॉलर नोकऱ्या पूर्णपणे संपवण्याची क्षमता आहे तसेच बुद्धिमान ह्युमनॉइड रोबोट्सच्या वाढत्या पिढीद्वारे अनेक ब्लू-कॉलर नोकऱ्याही संपू शकतात. हा असा पहिला शोध आहे, जो जवळजवळ प्रत्येक प्रकारे मानवापेक्षा श्रेष्ठ असण्याची धमकी देतो. कदाचित आपण विचार केला त्यापेक्षा लवकर. स्टिफन हॉकिंग्ज यांनी हा इशारा अनेक वर्षांपूर्वी दिला होता. आतापर्यंत शास्त्रीय आणि तांत्रिक बाबींमध्ये या तंत्राचा वापर झाला होता. मात्र कलाक्षेत्र यापासून दूर कसे राहील? चित्रपट एका भाषेत बनवला जातो. तो जगभरातील वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचा असतो, तेव्हा डबिंगचा उपयोग केला जातो. यामुळे प्रेक्षकांना चित्रपट त्यांच्या स्वतःच्या भाषेत समजण्यास मदत होते आणि ते कथेला अधिक चांगल्या प्रकारे जोडले जातात. डबिंगमुळे चित्रपटाचा प्रेक्षकवर्ग अनेक पटींनी वाढतो. प्रेक्षकांना उपशीर्षके (सबटायटलस) वाचण्याऐवजी डब केलेला चित्रपट पाहणे अधिक सोयीचे आणि आरामदायक वाटते. विशेषतः, लहान मुले किंवा वाचायला त्रास होणाऱ्यांसाठी डबिंग अधिक उपयुक्त ठरते. एकाच चित्रपटाच्या आवृत्या वेगवेगळ्या भाषांमध्ये तयार केल्याने तो प्रादेशिक बाजारपेठेत यशस्वी होऊ शकतो. वेगवेगळ्या भाषांमध्ये चित्रपट पुन्हा शूट करण्यापेक्षा डबिंग करणे अधिक सोपे आणि कमी खर्चाचे ठरते. यामुळे निर्मात्यांना कमी गुंतवणुकीत जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचता येते. आपण हे दाक्षिणात्य चित्रपटांबद्दल पाहिले आहे . आता अनेक चित्रपट एकाच दिवशी अनेक भाषांमध्ये प्रदर्शित केले जातात .



डबिंग ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. यामध्ये अनेक टप्पे असतात. सर्वांत आधी मूळ चित्रपटातील संवाद दुसऱ्या भाषेत अचूकपणे भाषांतरित केले जातात. हे काम व्यावसायिक भाषांतरकार करतात, जे दोन्ही भाषा आणि चित्रपटाच्या सांस्कृतिक संदर्भांचे जाणकार असतात. भाषांतर केलेले संवाद पडद्यावर बोलणाऱ्या कलाकारांच्या ओठांच्या हालचालींशी जुळतील अशा प्रकारे तयार केले जातात. यासाठी शब्दांची निवड आणि वाक्यांची रचना काळजीपूर्वक करावी लागते. प्रत्येक पात्रासाठी योग्य आवाज असलेल्या कलाकारांची निवड केली जाते. हे कलाकार मूळ कलाकारांच्या आवाजाशी मिळताजुळता किंवा त्या पात्राच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा आवाज देतात. यासाठी ऑडिशन्स घेतल्या जातात. निवडलेले आवाज देणारे कलाकार स्टुडिओमध्ये जातात आणि पडद्यावर चित्रपट पाहताना भाषांतरित संवाद मायक्रोफोनवर रेकॉर्ड करतात. त्यांना मूळ कलाकारांच्या अभिनयाची आणि वेळेची जुळवाजुळव करावी लागते. रेकॉर्ड केलेले आवाज मूळ चित्रपटातील आवाजाच्या जागी व्यवस्थित जोडले जातात. आवाजाची गुणवत्ता, पार्श्वसंगीत आणि इतर ध्वनी प्रभावांची काळजी घेतली जाते, जेणेकरून डब केलेला भाग नैसर्गिक वाटेल. प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यात, डब केलेले संवाद, संगीत आणि ध्वनी प्रभाव एकत्र मिसळले जातात. यामुळे संपूर्ण चित्रपट एकसंध आणि प्रभावी वाटतो. डबिंग करताना मूळ चित्रपटातील भावना, पोत आणि अभिनयाचा अंदाज कायम राखणे महत्त्वाचे असते. चांगल्या डबिंगमुळे प्रेक्षकांना चित्रपट इतर प्रदेशातील आहे असे वाटत नाही आणि ते कथेमध्ये पूर्णपणे सामील होऊ शकतात.

आज डबिंगमध्ये एआयचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि या प्रक्रियेत अनेक महत्त्वपूर्ण बदल घडवत आहे. एआय-आधारित सॉफ्टवेअर मूळ संवादांचे जलद आणि अचूक भाषांतर करू शकते. एआय आता मानवासारखे नैसर्गिक आवाज तयार करू शकते. हे आवाज मूळ कलाकारांच्या आवाजाच्या टोन, लय आणि भावनांशी जुळवण्याचा प्रयत्न करतात. 'टेक्स्ट-टू-स्पीच' तंत्रज्ञानाचा वापर करून भाषांतरित मजकूर स्वयंचलितपणे आवाजात रूपांतरित केला जातो. एआय अल्गोरिदम व्हिडीओतील पात्रांच्या ओठांच्या हालचालींचे विश्लेषण करून तयार केलेला आवाज त्यांच्याशी जुळवण्याचा प्रयत्न करतात. एआय तंत्रज्ञान मूळ कलाकाराच्या आवाजाची नक्कल करू शकते. यामुळे डब केलेल्या संवादातही मूळ कलाकाराचाच आवाज असल्याचा अनुभव येतो. मूळ कलाकार डबिंगसाठी उपलब्ध नसतात किंवा त्यांचे निधन झालेले असते, अशा वेळी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. काही प्रगत प्रणाली तर व्हिज्युअल माहितीचा वापर करून अधिक नैसर्गिक लिप-सिंक तयार करू शकतात. यामुळे डब केलेला भाग मूळ भागासारखाच दिसतो.

पूर्णपणे एआय-आधारित डबिंगमध्ये भाषिक आणि सांस्कृतिक बारकावे गमावले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे या कामी मानवी देखरेख आवश्यक आहे. एकंदरीत, डबिंग उद्योगासाठी एआय गेम-चेंजर ठरले आहे. यामुळे निर्मिती प्रक्रिया अधिक कार्यक्षम, जलद आणि परवडणारी होत आहे. यामुळे मनोरंजन उद्योगात नवनवीन शक्यता निर्माण होत आहेत. भविष्यात, मानवी सर्जनशीलता आणि एआय तंत्रज्ञानाचे सहकार्य या क्षेत्रांना अधिक उंचीवर घेऊन जाईल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वाचक पत्रे

### विधिमंडळ परिसरातील हाणामारी अशोभनीय



विधिमंडळ परिसरात आ. पडळकर आणि आ. आव्हाड यांच्या समर्थकांमध्ये जोरदार हाणामारी झाली. महाराष्ट्राच्या संस्कृतीला न शोभणारी आहे. महाराष्ट्र विधिमंडळात आजपर्यंत अनेक दिग्गज नेत्यांनी जनतेचे प्रतिनिधित्व केलेले आहे, हा इतिहास आहे. पण काल विधिमंडळ परिसरात जे घडले त्यावरून संपूर्ण देशात महाराष्ट्राची मान खाली झाली आहे.

विधिमंडळात सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधित्व केले जाते. परंतु कालच्या घटनेवरून आपण निवडणुकीत पाठवलेला प्रतिनिधी योग्य आहे का याचा विचार करण्याची वेळ आली आहे. कारण विधिमंडळात सर्वसामान्य जनतेचे प्रश्न कमी अन् राजकीय हेवेदावे यांचीच चर्चा जास्त केली जाते. प्रश्न, समस्या जैसे थे असतात. आमदारांचे समर्थक विधिमंडळ परिसरात येऊन हाणामारी झाल्याची बातमी प्रत्येक टीव्ही वाहिनीवर झळकली. ही बाब निश्चितच चिंतेची आहे. ज्या आमदारांचे समर्थक विधिमंडळ परिसरात आलेत ते गोंधळ घालण्याच्याच उद्देशाने आले असल्याची शंका आमच्यासारख्या सामान्य नागरिकाला आहे. हा गोंधळ पूर्वनियोजित असावा असेच एकंदरीत वाटायला लागले. कारण दोन्ही आमदारांनी एकमेकांना धमकी दिली होती अन् लगेच ही घटना घडली. टाळी एका हाताने कधीच वाजत नाही. विधानसभा अध्यक्षांनी या दोन्ही आमदारांवर चौकशी करून त्यांची आमदारकीच रद्द करायला हवी. तसेच जे समर्थक आले होते त्याच्यावरही कडक कारवाई करायला हवी. यापुढे अशाप्रकारची कृत्ये करायला धजावणार नाही अशी शिक्षा द्यायला हवी अशीच सर्वसामान्य जनतेची इच्छा आहे.आज कायद्याचा धाक राहिलेला नाही असेच कालच्या घटनेवरून दिसून येते. या गुंडांना अटकही होईल. या गुंडांवर कारवाई केली जाईल. प्रकरण न्यायालयात जाईल. परंतु कालांतराने सबळ पुरावा नाही म्हणून त्यांना न्यायालयाकडून मोकळे सोडले जाईल. परत ते गुंडागर्दी करायला मोकळे. आपले प्रतिनिधी कसे असावे याचा विचार करण्याची वेळ आली आहे. आपला प्रतिनिधी तो कोणत्याही राजकीय पक्षाचा असो, विचारांचा असो तो प्रतिनिधित्व करायला लायक आहे का याचा विचार व्हायला हवा.

**रवींद्र गोविंद पांडे**/नागपूर

### तिसऱ्या कसोटी सामन्याची कारणमीमांसा

लॉर्ड्सवर झालेला भारत आणि इंग्लंड यांच्यातील तिसरा कसोटी सामना भारताने थोडक्यात गमावला. भारताने इंग्लंडला पहिल्या डावात ३८७ धावांवर रोखल्यानंतर भारताला पहिल्या डावात आघाडी घेण्याची चांगली संधी होती. परंतु आघाडीच्या फलंदाजांनी निराशा केल्यानंतर के. एल. राहुल आणि ऋषभ पंत चांगले जमलेले असताना उपाहाराला तीन चेंडू शिल्लक असताना, उपाहाराच्या आधी शतक पूर्ण करायचे या के. एल.राहुलच्या हट्टापायी ऋषभ पंतला धावबाद व्हावे लागले आणि तिथेच आघाडीची आशा मावळली. कशीतरी इंग्लंडच्या पहिल्या डावाची बरोबरी झाल्यानंतर आपल्या भारतीय गोलंदाजांना इंग्लंडला दुसऱ्या डावात १९२ धावांत रोखण्यात यश आले. तेव्हा भारताला दुसऱ्या डावात इंग्लंडचे हे माफक आव्हान घेऊन जिंकण्याची चांगली संधी असताना तिथेही भारताच्या आघाडीच्या फलंदाजांनी घोर निराशा केली. रवींद्र जडेजाच्या खेळामध्ये कसोटी जिंकण्याची तडफ दिसत नव्हती. तसे पाहता बुमराह आणि मोहम्मद सिराज यांनी तुलनेने चांगला संयम दाखवला. असो खेळ आहे कोणाची तरी हार जीत असणारच. २३ तारखेपासून सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटी सामन्यासाठी भारताला हार्दिक शुभेच्छा.

**धनंजय पांडे**/नागपूर

### शिवकालीन गडांवर उमटली जागतिक मोहर!

छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्र आणि तामिळनाडू या राज्यांतील १२ गडांना 'जागतिक वारसा मानांकन' मिळणे, हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या गडांचे नाव घेताच त्यांनी केलेले पराक्रम डोळ्यांसमोर येतात आणि ऊर अभिमानाने भरून येतो. गनिमी काव्याच्या साहाय्याने पाच पातशाह्यांचा पराभव करून हिंदवी स्वराज्य निर्माण करणे, हा पराक्रम जागतिक स्तरावर गणल्या गेलेल्या अनेक पराक्रमांमधील एक महान पराक्रम आहे. म्हणूनच, छत्रपतींच्या गडांना 'युनेस्को'कडून मिळालेले मानांकन हा केवळ त्या गडांचा नव्हे, तर हिंदवी स्वराज्याचा सन्मान आहे, असे म्हणणे योग्य ठरेल.

या निमित्ताने एकच मागणी करावीशी वाटते, केवळ १२ गड नव्हे, तर छत्रपतींच्या प्रत्येक गडाला जागतिक वारसाचे मानांकन मिळायला हवे. तसेच गडांवर अन्य धर्मीयांनी केलेली अतिक्रमणे तत्काळ दूर करून सर्व गड अतिक्रमणमुक्त करावेत. हीच खऱ्या अर्थाने छत्रपतींच्या गडांना दिलेली मानवंदना ठरेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# घरकुलसाठी पात्र लाभार्थींनी सेल्फ सर्व्हे करून घ्यावा-आ.संदीप क्षीरसागर

## ग्रामीण भागातील घरकुलच्या सेल्फ सर्व्हेला ३१ जुलैपर्यंत अंतिम मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ जुलै**

पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून त्याकरिता ऑनलाईन सेल्फ सर्व्हे करण्यासाठी ३१ जुलै ही अंतिम मुदतवाढ मिळाली आहे. ३१ जुलै पर्यंत नागरिकांना मोबाईल पद्वारे सेल्फ सर्व्हे करता येणार आहे. त्यामुळे बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यातील ज्या नागरिकांचे सेल्फ सर्व्हे करणे बाकी आहे अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत ३१ जुलै पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सध्या सद्या सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी/ ग्रामसेवक यांचे मार्फत किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकता. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करून घ्यावी, नोंदणी करण्यासाठी अंतिम मुदतवाढ मिळालेली आहे. ३१ जुलै २०२५ ही शेवटची तारीख असून त्या अगोदरच बीड मतदारसंघातील पात्र नागरिकांनी आपले सर्वेक्षण करून घ्यावे असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

अशाप्रकारे करावा सेल्फ सर्व्हे

सेल्फ सर्व्हे करण्यासाठी आवास प्लस- २०२४ हे शासनाचे अधिकृत प्ले-स्टोअरवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टॉल करावे, नंतर आधार फेस आरडी हे प देखील इंस्टॉल करुन घ्यावे, त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून पवर विचारलेली माहिती भरावी, शेवटी आपल्या कच्च्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा, आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.जर स्मार्टफोन उपलब्ध नसेल किंवा तांत्रिक बाबी हाताळण्यास अडचण येत असल्यास आपल्या गावचे ग्रामसेवक यांच्यामार्फतही सर्व्हे करून घरकुलसाठी अर्ज करता येतो.

# माजलगाव भाजपा शहर मंडल निवडी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१९ जुलै**

कार्यकारी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, नामदार पंकजा मुंडे मा खासदार डॉ प्रीतम मुंडे यांच्या आदेशानुसार प्रदेश महामंत्री संजय केनेकर मराठवाडा संघटन मंत्री संजय कोडगे व बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या सूचनेनुसार व महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य अरुण राऊत प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ प्रशांत पाटील मा नगराध्यक्ष अशोक तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली व माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी प्रसिद्ध पत्रकाच्याद्वारे जाहीर केली असून यामध्ये बाळासाहेब क्षीरसागर रामेश्वर चव्हाण उमेश जाधव अविनाश कांडूरे छाया कुलकर्णी पूजा मुंडकर असे सहा उपाध्यक्ष तर पवन मोगरेकर कैलास खुरपे असे दोन सरचिटणीस , विनोद लड्डा मनोज कोरडे संतोष जाधव सुभाष कांबळे चित्रा पाठक अनिता अलकुंटे अशे सहा चिटणीस , आनंद कुलकर्णी एक कोषाध्यक्ष व ४६ कार्यकारणी सदस्य अशा एकूण ६१ निवडी जाहीर करण्यात आलेल्या आहेत . नामदार पंकजा मुंडे, मा खासदार प्रीतमताई मुंडे, व सर्व नेतेगण सर्व पदाधिकारी यांनी निवड झालेल्या सर्व कार्यकारणीतील पदाधिकाऱ्यांचे व कार्यकारिणी सदस्यांचे अभिनंदन करून आपल्या हातून पक्ष संघटनेच्या माध्यमातून देश सेवा , समाजसेवा घडो अशा पुढील वाटचालीस नवनियुक्त कार्यकारणीला हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# विजय साळवे हजारो कार्यकर्त्या समवेत रिपब्लिकन सेनेत सामील

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ जुलै**

बुद्ध शिव फुले शाहु डॉ आंबेडकर यांच्या विचारधारेचा वसा आणि वारसा जोपासत बीड जिल्ह्यातील दलित चळवळीचे नेतृत्व करणारे विजयदादा साळवे यांनी आपल्या हजारो कार्यकर्त्या समवेत रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी मा. आनंदराज आंबेडकर यांच्या नेत्रत्वाखाली रिपब्लिकन सेनेत जाहिर प्रवेश केला आहे.



बीड जिल्ह्यातील गोरगरीब दलित जनतेच्या समस्या सोडवसाठी गेली तिन दशकापासून निस्वार्थपणे सदैव रस्त्यावर उपलब्ध असणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचे खंदे समर्थक तथा जातीपातीचे राजकारण न करता सर्वांसोबत मैत्रीचे संबंध ठेवून बहुजन समाजाला विश्वासात घेऊन योग्य दिशा देणारे सर्वसमावेशक समाजसेवक विजयदादा साळवे यांनी बीड जिल्ह्यातील आपल्या हजारो कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन दिनांक १६ जुलै २०२५ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन दादर येथील मुख्य कार्यालयात आनंदराज आंबेडकर साहेब यांच्या नेत्रत्वाखाली रिपब्लिकन सेनेत जाहिर प्रवेश केला असल्याची माहिती विजय साळवे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे

# गुणवंत विद्यार्थानी शिष्यवृती साठी शुक्ल यजुर्वेदिय शिक्षणोतेजक संस्था बीड येथे अर्ज दाखल करावेत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ जुलै**

दरवर्षीप्रमाणे शुक्ल यजुर्वेदिय मांध्यदिन ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ पुणे व शुक्ल यजुर्वेदिय शिक्षणोतेजक संस्था बीड संयुक्त विद्यमाने पारितोषिक अर्ज संस्थेकडे मागवण्यात येत आहेत.

पारितोषिक १० वी, १२ वी, पदवी, पदविका, व उच्चपदवी धारकांना गुणानुक्रमाणे दिले जाते. त्यासाठी अर्जाची प्रिंट काढून विद्यार्थ्यांना द्यावी व बीड शाखेच्या सही शिक्क्याने मध्यवर्ती पुणे कार्यालयाकडे पाठवावीत तसेच परतफेड शिष्यवृत्तीचे वाटप केले जाते. १२ वी च्या पुढील शिक्षणासाठी संस्थेतर्फे वार्षिक परतफेड शिष्यवृत्ती दिली जाते.

नियम

शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्याने ती परत करायची आहे. अर्जाची किंमत फक्त रु. १०० /- सर्व कागदपत्र पूर्ण करून अर्ज, स्टँप पेपर हमी पत्रासहीत शाखेच्या सही शिक्क्याने मध्यवर्तीकडे पाठवावा.

वरील शिष्यवृत्ती साठी ज्ञाती समाज बांधव गुणवंत विद्यार्थानी संस्थेकडे अर्ज दाखल करावेत

संस्थेचे सभासद असणे आवश्यक

दि ३० जुलै २०२५ पर्यंत अर्ज संस्थेकडे द्यावेत

याचा लाभ घ्यावा असे शुक्ल यजुर्वेदिय शिक्षणोत्तेजक संस्था अध्यक्ष ड कालीदास थिगळे, सचिव प्रा विवेक वैद्य, उपाध्यक्ष ड सी डी देशमुख दिलीप खिस्ती

प्रा शशिकांत पसारकर विश्वाभंर थिगळे दत्तात्रय अदवंत , गोंदीकर, सराफ , नंदकिशोर झरीकर, कुलकर्णी, प्रभाकर शेलमोहकर अनिल बोर्डे श्री देशमुख श्रीकृष्ण जोशी आदि सदस्यानी केले आहे.

# मिलिंद विद्यालयात विविध सहशालेय उपक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१८ जुलै**

आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त,नाथ शिक्षण संस्थेच्या सचिव सौ.राजश्रीताई मुंडे व सहसचिव श्री.प्रदीप खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित सप्ताहाच्या पाचव्या दिवशी मिलिंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा या उद्देशाने गीत गायन, कथाकथन, व रंगभरण इत्यादी विविध सहशालेय उपक्रमांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उस्फुर्तपणे सहभाग घेऊन भरघोस प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.कदरकर व प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य श्री. शिंदे, उपप्राचार्य श्री. शेख इरफान तसेच पर्यवेक्षक श्री. धायगुडे, ज्येष्ठ शिक्षक श्री राठोड इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते. रंगभरण स्पर्धेचे नियोजन मिलिंद माध्यमिक विद्यालयातील कला शिक्षक श्री.शिवप्रसाद राजनाळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. सुनिता कोमावार मॅडम यांनी केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक,सर्व विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मोठी ध्येय ठरवा ते पूर्ण करण्यासाठी प्राणपणाने प्रयत्न करा - व्हेट्रन ग्रुप कॅप्टन श्रीकांत वालवडकर

## खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा थाटात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१९ जुलै**

विद्यार्थी मित्रांनो आपल्या जीवनात मोठे ध्येय ठरवा ते मिळवण्यासाठी जीवाचा आटापिटा करा.आपल्या रोजच्या दिवसाचे योग्य नियोजन करा.शाळेच्या संस्थेच्या सर्व उपक्रमात सहभागी व्हा.तुम्हीही मोठी स्वप्न पहा व ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करा . आजचा ताप उद्याच्या पश्चातापा पेक्षा बरा असे प्रतिपादन व्हेट्रन ग्रुप कॅप्टन श्रीकांत वालवडकर यांनी खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित विद्यार्थी गुणगौरव समारंभ कार्यक्रमात केले.यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.सुरेंद्र आलूरकर तर मंचावर प्रमुख उपस्थिती म्हणून केंद्रीय कार्यकारिणी सदस्या डॉ.कल्पनाताई चौसाळकर,केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अविनाश तळणीकर,स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर, कार्यवाह किरण कोदरकर,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ अतुल देशपांडे, विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले हे उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व भारत मातेच्या प्रतिमा पूजनाने व दिप प्रज्वलनाने करण्यात आली.यानंतर मान्यवरांचे यथोचित स्वागत व सन्मान करण्यात आला.या नंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शालेय समिती अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे यांनी केले.प्रास्ताविकात त्यांनी विद्यालयाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली आणि गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलूरकर म्हणाले की,आज मी या संस्थेचा अध्यक्ष आहे याचा मला सार्थ अभिमान असून श्रीकांत वालवडकर यांच्या सारखे या देशावर प्रेम करणारे नागरीक आपल्या संस्थेच्या विविध संस्कार केंद्रातून तयार होत आहेत याचा मनस्वी आनंद होत आहे.आज ज्यांचे कौतुक या ठिकाणी होणार आहे त्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन पण ज्यांना कमी गुण मिळाले त्यांनी हार न मानता पूढील जीवनात घवघवीत यश मिळवावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.यानंतर शाळाबाह्य स्पर्धा परीक्षेतील सर्व कला व क्रीडा स्पर्धेत विभागीय,राज्यस्तरावर बक्षीस मिळविलेले,शालांत प्रमाणपत्र परीक्षेत गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी गुणवंत विद्यार्थी,त्यांचे पालक,सन्माननीय संस्था सभासद, सेवानिवृत्त शिक्षक,पत्रकार,माजी विद्यार्थी हे देखील उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,प्रशांत पिंपळे,दहावी प्रमुख प्रमोद शिंदे,सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन, स्वागत व परिचय प्रेमल खंडागळे,राजेंद्र शेप यांनी तर बक्षिस वाचन मेघा कुलकर्णी,श्रीकांत काळे,दहावी प्रमुख प्रमोद शिंदे यांनी केले वैयक्तिक पद्य यज्ञेश धाट,आभार प्रदर्शन मुख्याध्यापक अनंतराम कोपले यांनी मानले तर कल्याण मंत्र किशोरी कुलकर्णी यांनी सांगितला.

# ६०० कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण करत अंबाजोगाई पिपल्स बँकेची गरुडझेप

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१९ जुलै**

अंबाजोगाई पिपल्स को-ऑप सहकारी बँकेने ग्राहकांना दर्जेदार बँकींग सेवा देत ६०० कोटी रुपये ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. नुकतेच बँकेच्या सर्वोत्तम एनपीए व्यवस्थापनामुळे शहरी सहकारी बँक गटात 'भारतरत्न सहकारिता पुरस्कार २०२५' ने ही गौरवविण्यात आले आहे. अंबाजोगाई पिपल्स बँकेने पारदर्शक, गतिमान कारभार व तत्पर सेवेला नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यामुळे नेहमीच उत्तम टीमवर्क करून बँकेने सभासद, ठेविदार, ग्राहक आणि हितचिंतक यांची विश्वासार्हता कमावली असल्याचे बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले.

आमच्या प्रतिनिधीशी बोलताना अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले आहे की, चालू आर्थिक वर्षामध्ये बँकेने ६०० कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या प्रगतीचा आलेख आजतागायत उंचावलेला असून नुकतेच २४ मे २०२५ रोजी बँकेच्या स्थापनेस २९ वर्षे पूर्ण झाली आहेत. सामाजिक बांधिलकीतून पिपल्स बँक आज बँकींग क्षेत्रात कार्यरत आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागात बँकेच्या मुख्य शाखा व दोन विस्तारीत शाखांसह एकूण १८ शाखा कार्यरत आहेत. संपूर्ण महाराष्ट्र हे बँकेचे कार्यक्षेत्र आहे. बँकेच्या सर्व शाखा या संगणकीकृत आहेत. यूपीआय ही सुविधा देणारी अंबाजोगाई पीपल्स बँक ही शहरातील पहिली नागरी बँक ठरली आहे. बँकेकडे स्वतःचे अत्याधुनिक डाटा सेंटर आहे. तत्पर, विनम्र आणि दर्जेदार बँकींग सेवा ही बँकेची ओळख आहे.

बँकेस तीन नव्या शाखांना भारतीय रिझर्व बँकेकडून मंजूरी मिळाली आहे.यामध्ये मुरूड, (जि. लातूर) केज, (जि. बीड), निलंगा (जि. लातूर) येथे मंजुरी मिळालेल्या बँकेच्या शाखा कार्यन्वीत होनार आहेत. बँकेकडून नव्यानेच आधारबेस पेमेंट सुविधा सुरू करण्यात आलेली आहे. यामध्ये लाडकी बहीन योजना, गॅस सबसीडी, पीएम किसान सन्मान योजना यासारख्या शासनाकडून मिळणा-या विविध योजनांमधून मिळणारी रक्कम ग्राहकांच्या खात्यात थेट जमा केली जाते.बँकेच्या कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त ग्राहकांना रोख रक्कम बँकेत जमा करता यावी यासाठी बँकेने आपल्या अंबाजोगाई शहरात रक्कम भरणा व काढणे मशीनची सुविधा सुरू केली आहे. अंबाजोगाई शहरामध्ये अशा प्रकारची सुविधा देणारी आपली अंबाजोगाई पिपल्स को.ऑप. बँक ही पहिलीच नागरी बँक ठरली आहे.

ग्राहकांच्या विश्वासार्हतेच्या बळावरच बँकेची यशस्वी कामगिरी- राजकिशोर मोदी

अंबाजोगाई पिपल्स बँकेने आपल्या ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे.त्याच विश्वासार्हतेच्या बळावरच बँक यशस्वी कामगिरी करू शकल्याचे बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी यावेळी आवर्जून सांगितले. बँक सातत्यपूर्ण कामगिरी करीत वेगाने प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. बँकेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेविदार, खातेदार, ग्राहक, हितचिंतक यांच्या बँकींग गरजा पूर्ण करण्याचा नेहमीच प्रयत्न केलेला आहे. अंबाजोगाई पिपल्स बँकही ग्राहकांची आपली हक्काची व त्यांचे हित जपणारी ही बँक असून बँकेने ६०० कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला. तसेच एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केल्याचा आपणा सर्वांनाच आंनद आहे. सर्वानी बँकेच्या अभिनव सेवांचा आणि सुविधांचा पूर्णपणे उपयोग करावा असे आवाहन करून यापुढील काळात ही अंबाजोगाई

पिपल्स बँक आपल्या सर्वाच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहील अशी ग्वाही देतो.

राजकिशोर मोदी
(अध्यक्ष, अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.)

# नगरपालिके समोरच्या रस्त्याची मालकी कोणाकडे?

## प्रशासनाने आगोदर जाहीर करावे - उल्हास गिराम

## रस्त्याची झाली चाळण, रस्त्यासाठी नेमकं कोणतं प्रशासन?

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ जुलै**

बीड शहरातील प्रमुख रस्त्या पैकी एक असणारा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, या रस्त्याची चाळन झाली आहे. नगर पालिका, जिल्हापरिषद याचा मार्गांवर असुन या रस्त्यावर शेकडो लहान मोठे खड्डे पडले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी या रस्त्यावरील खड्या संदर्भात नगरपालिके कडे विचारणा केली तर संबंधित रस्ता आमच्या कडे नसून हा रोड सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) कडे असल्याचे सांगितले, बांधकाम विभागाला विचारले असता त्यांनी नगर पालिकेकडे असल्याचे सांगितले. संबंधित रस्त्याचा मालक कोण? हे प्रशासनाने आगोदर जाहीर करावे, असे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी पत्रकात म्हंटले आहे.



सोमवारी या रस्त्याच्या समस्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्याच्या भेटी घेणार असुन. येत्या महिनाभरात हा रस्ता नव्याने तयार व्हावा या साठी पाठपुरावा करणा असल्याचे उल्हास गिराम यांनी सांगितले. बीड शहरातील मुख्य बाजारपेठेत जाणारा हा मार्ग प्रमुख प्रशासकीय कार्यालयाला ही जोडला आहे. शाळा, महाविद्यालये, बाजार मुख्यालयाला हा प्रमुख रस्ता असुन अश्या उडवा उडवीच्या उत्तराने चीड निर्माण होत आहे. सामान्य जनतेच्या भावनांशी हे प्रशासन खेळत आहे. उप मुख्यमंत्री अजितदादा पवार सध्या जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत. त्यांनी या रस्त्याचे गांभीर्य घेऊन नव्याने तयार करावा या साठी त्यांना पत्र पाठवणार असल्याचे उल्हास गिराम यांनी कळवले.

# शेतकऱ्यांना वेठीस धरु नका , त्यांची कामे लवकर करा-हरिश धार्मिक

## बीडमध्ये अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांचे प्रशासन नागरिकांच्या दारी,म्हाळस जवळा येथे विविध ठिकाणी दिल्या भेटी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ जुलै**

शुक्रवार १८ जुलै रोजी अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी म्हाळसजवळा मंडळ व ग्राम महसूल अधिकारी म्हाळसजवळा सजाची दप्तर तपासणी केली . अपर जिल्हाधिकारी धार्मिक यांनी अचानक आपला मोर्चा म्हाळसजवळा मंडळाकडे वळविला . धार्मिक यांना मंडळ अधिकारी स्तरावर , ग्राम महसूल अधिकारी स्तरावर म्हणजेच तलाठी स्तरावर कशाप्रकारे कामकाज चालते याची चाचपणी करायची होती . शिवाय शासन निर्देशानुसार मंडळ अधिकारी आणि त्यांच्या अधिनस्त ग्राम महसूल अधिकारी यांचे अभिलेखे म्हणजेच रेकॉर्ड व्यवस्थित ठेवण्यात आलेले आहे काय याची त्यांनी यावेळी पाहणी केली .



या वेळी त्यांनी एका आपले सरकार केंद्राला भेट देऊन विविध प्रमाणपत्र कशा प्रकारे दिले जातात , प्रमाणपत्र देताना विलंब होतो किंवा कसे , काही अडचणी आहेत काय याबाबत सविस्तर माहिती घेतली . बेकायदेशीर कामे कराल तर कारवाई होईल याबाबतही त्यांनी तंबी दिली .

सोबतच त्यांना भेटण्यास आलेल्या नागरिकांच्या अडचणींचे तात्काळ निराकरण केले . श्री अविनाश खांडे यांच्या रस्त्याचा प्रश्न अनेक दिवसापासून प्रलंबित आहे . त्याबाबत धार्मिक यांनी तात्काळ तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना फोनद्वारे हा प्रश्न तात्काळ निकाली काढण्याबाबत सूचना दिल्या .

उपस्थित नागरिकांशी चर्चा करताना त्यांनी नमूद केले की जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अधिपत्याखाली जिल्हाभरात अनेक लोकोपयोगी कार्यक्रम सुरू आहेत . जिल्हाधिकारी स्वतः विविध तालुक्यांना फिरून छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर योजना , महाराजस्व योजना , जिवंत सातबारा योजना , रस्त्याच्या विविध योजना , अनेक प्रमाणपत्रांचे वाटप यासाठी फिरत आहेत . साक्षाळ पिंपरी येथे जिल्हाधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना बालविवाह करणार नाही तसेच शेतकरी आत्महत्या होऊ देणार नाही अशा आशयाची शपथ दिली होती .

अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक हे यापूर्वी कोल्हापूर जिल्ह्यात कार्यरत होते . तेथे त्यांनी भटक्या विमुक्त जाती - जमातीसाठी अनेक कामे केली . त्यांना जातीची व इतर प्रमाणपत्र मिळवून दिली . अशाच प्रकारची कामाची धडक मोहीम त्यांनी बीडला आल्यानंतर सुरू केलेली आहे . प्रत्येक आठवड्याला ते उपजिल्हाधिकारी व तहसीलदार आणि त्यांचे अधिनस्त मंडळ अधिकारी , तलाठी यांच्या बैठका ऑनलाईन पद्धतीने घेतात . यात कोणाचेही फेरफार प्रलंबित राहता कामा नये , नागरिकांची शेतकऱ्यांची फार्मर आयडी तात्काळ काढण्यात यावेत , यासाठी ते पाठपुरावा करीत असतात . अपर जिल्हाधिकारी यांच्या भेटीमुळे ग्रामीण भागातील कर्मचारी यांना आश्चर्याचा धक्का बसला आहे . तसेच वरिष्ठ कधीही आपल्या कामकाजाचा आढावा घेऊ शकतात याची जाणीव झाली . तथापि अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नमूद केले आहे की केवळ जनतेची कामे वेगाने व्हावी याच उद्देशाने माझ्या भेटी असतात आणि नागरिकांना थेट मला आपले प्रश्न सांगता यावेत यासाठी माझी ही भेट आहे.ग्रामीण भागातील या भेटीमुळे नागरिक भारावून गेल्याचे चित्र दिसले . अशाप्रकारे महसूल विभागाचे अधिकारी , कर्मचारी ग्रामीण भागात फिरत राहिले तर कोणाचेही कामे प्रलंबित राहणार नाहीत यात शंका नसावी.

# कै.दत्ताजी भाले विद्यालयाचे विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होतात-श्रीरंग गोसावी

## कै. दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात पालक मेळावा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अंबड दि.१९ जुलै**

कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या विकासाबद्दल तसेच विद्यार्थी,पालक व शिक्षक यांच्यामध्ये सुसंवाद साधून शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी भव्य स्वरूपात पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पालक मेळाव्याच्या व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून स्थानिक व्यवस्थापन समिती कार्यवाह मा. श्री.केदारजी मंत्री, प्रमुख मार्गदर्शक म्हणून महात्मा फुले विद्यालयाचे पर्यवेक्षक मा.श्री श्रीरंग गोसावी, शालेय समिती अध्यक्ष मा.श्री.श्रीपाद जपे, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.प्रदीप जोशी उपस्थित होते.मान्यवरांच्या शुभ हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून पालक मेळाव्यास सुरुवात करण्यात आली.

पालक मेळाव्याच्या प्रास्ताविकेमध्ये विद्यालयाचे मुख्यध्यापक प्रदीप जोशी यांनी शाळेची गुणवैशिष्ट्ये सांगत विद्यार्थ्यांना दिलेल्या नियोजन पुस्तके विषयी सविस्तर माहिती सांगितली. यावेळी महिला पालक संघाच्या श्रीम.गौरीताई जाजू, पालक नीताताई टिंगळे, श्री समाधान मुळे यांनी मनोगत व्यक्त करत विद्यालयात मिळत असलेले उत्कृष्ट शिक्षण, व शिस्तबद्धता तसेच विद्यार्थी दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयातील दिले जाणारे दर्जेदार शिक्षण याविषयी मनोगत व्यक्त केले.यावेळी शालेय समिती अध्यक्ष श्रीपाद जपे यांनी शाळेतील सण व शिक्षण यांची सांगड घालत विद्यालयाची वैशिष्ट्ये पालकांना सांगितले.लवकरच कै.दत्ताजी भाले विद्यालय पालकांना नवीन स्वरूपात दिसणार आहे. अशी माहिती दिली.यावेळी पालक मेळ्याव्याचे प्रमुख मार्गदर्शक श्रीरंग गोसावी म्हणाले की प्रत्येक विद्यार्थ्याने विविध क्षेत्रात उत्कृष्ट असावे. आजचा विद्यार्थी हा जीव घेण्यास स्पर्धेतून यशस्वी झाला पाहिजे.



दत्ताजी भाले विद्यालय हे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी, व शिस्तीसाठी ओळखले जाते. भारतीय सण व दिले जाणारे संस्कार यामध्ये दत्ताजी भाले विद्यालयाची ओळख आहे. विद्यार्थ्यांना टीव्ही मोबाईल पासून दूर ठेवा. नुसते शिक्षण महत्त्वाचे नाही तर कृती महत्त्वाची असते पालक मेळाव्यातील पालकांचे उपस्थित राहिल्याबद्दल कौतुक केले.

अध्यक्षीय समारोप मध्ये केदारजी मंत्री यांनी विद्यालयाची माहिती सांगत पालकांनी विद्यार्थ्यांना असलेल्या अडचणी सांगाव्यात. सर्व पालक कै.दत्ताजी भाले विद्यालयास सहकार्य करतात याबद्दल त्यांचे कौतुक केले. यावेळी पद्य गायन विद्यार्थी कु तन्वी जाधव,शिवानी जयमा सूत्रसंचालन मेघा वायकोस व आभार प्रदर्शन श्री.मारुती झाटे यांनी केले. पालक मेळाव्याची सांगता कल्याणमंत्र्यांनी करण्यात आली.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ जुलै -**
येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभाग आणि डॉ.लाल पॅथलॅब लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील शिबिराचे उदघाटन प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने, डॉ.बाळासाहेब चव्हाण, डॉ.मनीषा आष्टेकर, डॉ. साईनाथ उमाटे, डॉ. माधवी कुलकर्णी, डॉ.लाल, इरफान सय्यद, आवेज रजा, सलीम शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

शिबिराचे उदघाटन करताना प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये आरोग्याची हेळसांड होत आहे, कोणीही आरोग्याकडे लक्ष देत नाही. विशेषता महिलांमध्ये हिमोग्लोबिन, कॅल्शियम, लोह यांची कमतरता भासते.या पार्श्वभूमीवर राबवित असलेला राष्ट्रीय छात्र सेना विभागाचा आरोग्य तपासणी उपक्रम स्वागतार्ह आहे.

या आरोग्य तपासणी शिबिरात अधिकाधिक विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी सहभागी होण्यासाठी आवाहन त्यांनी केले. शिबिरादरम्यान हिमोग्लोबिन कॅल्शियम, लोह, शुगर, कॉलेस्ट्रॉल, थायरॉईड, युरिक ॲसिड, ब्लड ग्रुप, लिपिड प्रोफाइल, फिव्हर पॅनल,लिव्हर पॅनल, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन डी आदींची आरोग्य तपासणी करण्यात आली. सदरील शिबिरात उल्लेखनीय बाब म्हणजे सदरील शिबिरात राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे सर्व कॅडेट, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी असा तब्बल १३१ जणांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली.



### संक्षिप्त वृत्त...



## श्रावणमासानिमित्त रुद्रेश्वर मंदिरात पोथी वाचन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ जुलै -**
येथील एलआयसी कॉलनीतील रुद्रेश्वर मंदिरात रुद्रेश्वर प्रतिष्ठानच्यावतीने श्रावणमासानिमित्त श्रीराम विजय पोथी वाचनाला गुरुवारी सुरुवात करण्यात आली. यानिमित्त 'श्रीं'ची पालखी मिरवणूक काढण्यात आली.

येथील रुद्रेश्वर मंदिरात दरवर्षी श्रावणमासानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी श्रीराम विजय पोथी वाचनाला गुरुवारी दुपारपासून सुरुवात झाली. यानिमित्त एलआयसी कॉलनी परिसरातून 'श्रीं'ची पालखी मिरवणूक काढण्यात आली. हे पोथी वाचन २४ ऑगस्टपर्यंत दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत करण्यात येणार आहे. २५ जुलै ते २२ ऑगस्टपर्यंत 'श्रीं'चा रुद्राभिषेक होणार आहे. २८ जुलै ते १ ऑगस्ट या कालावधीत दररोज सकाळी ८ वाजता शिवलीलामृत ग्रंथ पारायण होणार आहे. परमरहस्य ग्रंथ पारायणाचे आयोजन २ ते ८ ऑगस्ट या कालावधीत करण्यात आले आहे. दर सोमवारी सकाळी १० वाजता 'श्रीं'ची महाआरती होणार आहे.

## जयंती समितीने केला आयुक्त मीना यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ जुलै -**
मनपाच्या नूतन आयुक्त श्रीमती मानसी मीना यांची भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने सदिच्छा भेट घेतली व त्यांचा सत्कार करण्यात आला. व यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे व इतर पदाधिकाऱ्यांनी आयुक्त मानसी मीना यांच्या समवेत विविध विषयावर चर्चा केली.

यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्ट्युच्यू ऑफ नॉलेज पुतळा आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क लातूरचे सुशोभीकरण करण्यात यावे तसेच गेल्या काही महिन्यांपासून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील सुशोभीकरणाचे काम रखडले आहे. ते तातडीने सुरू करण्यासंदर्भात योग्य ते निर्देश द्यावेत अशी विनंती केली. यावेळी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे,पप्पू सरवदे,विनय जाकते, डी.उमाकांत,वैभव गायकवाड,आकाश सरवदे,बबलू जोगदंड,अनिरूद्ध कदम,सिद्धांत चिकटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## युनिक स्किल्स अकॅडमीच्या वतीने रविवारी चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ जुलै -**
युनिक स्किल्स अकॅडमीच्या वतीने रविवार, दि. २० जुलै २०२५ रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत लातुरात चित्रपट निर्माता - दिग्दर्शक विशाल गिरी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रेरणादायी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या मोटिव्हेशनल सेमिनार अर्थात प्रेरणादायी चर्चासत्रात वयाच्या पंधरा वर्षांपासून ते पन्नास वर्षे वयापर्यंतची मंडळी उपस्थित राहू शकतात. हे चर्चासत्र आसमा चुडीवाले यांनी सर्वांसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांगितले. विशाल गिरी हे लातूरचेच सुपुत्र असून त्यांना दादासाहेब फाळके अवॉर्ड, राष्ट्रीय आयकॉन अवॉर्डने सन्मानित करण्यात आले आहे. एक नामांकित मोटिव्हेशनल स्पीकर म्हणूनही त्यांची ओळख आहे. लातूर शहरातील एमआयडीसी परिसरातील उद्योग मित्र हॉल या ठिकाणी होणाऱ्या या प्रेरणादायी चर्चासत्रास लातूर शहर व परिसरातील विद्यार्थी - विद्यार्थिनी, पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन युनिक स्किल्स अकॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील परिचारिका बेमुदत संपावर

### आरोग्य व्यवस्था कोलमडली; रुग्णांचे हाल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ जुलै -**
राज्य परिचारिका संघटनेने वेतन त्रुटी आणि कंत्राटी भरतीच्या निषेधार्थ गुरुवारी एकदिवसीय संप पुकारला होता. मात्र, शासनाने या संपाची दखल घेतली नसल्याने शुक्रवारपासून लातूर जिल्ह्यातील ५३८ परिचारिकांनी काम बंद आंदोलन करत बेमुदत संप पुकारला आहे. यामुळे जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था कोलमडली असून, रुग्णांचे हाल होत आहेत.

अधिपरिचारिका, परिसेविका, पाठ्यनिर्देशिका तसेच सार्वजनिक आरोग्य विभागातील बालरोग परिचारिका या पदांच्या वेतन त्रुटींचे निवारण करण्यात यावे. राज्यातील परिचारिकांना केंद्र शासनाप्रमाणे नर्सिंग भत्ता ७२०० व गणवेश भत्ता १८०० मंजूर करण्यात यावा व पात्र परिचारिकंना शैक्षणिक भत्ते मंजूर करण्यात यावेत. केंद्र शासनाप्रमाणे राज्यातील परिचारिकांच्या पदनामामध्ये बदल करण्यात यावा. कंत्राटी पदभरती नियम शासनाच्या परिपत्रकातून वगळण्यात यावे. कायमस्वरूपी १०० टक्के पदभरती, पदनिर्मिती व पदोन्नती देण्यात याव्यात. स्वतंत्र संचालनालयाची स्थापना करण्यात यावी. अधिपरिचारिका सेवा प्रवेश नियमातील लिंगभेद निर्माण करणारे स्त्री-पुरुष प्रमाण ८०:२० वगळावे. विद्यार्थी विद्यावेत वाढविण्यात यावे. शासनमान्य संघटनेचे निवेदने प्रधान्याने विचारात घ्यावेत व नियमीत बैठक घेण्यात यावी. बदली धोरणातून परिचारिकांना वगळण्यात यावे, या मागण्यांसाठी गुरुवारी महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेने गुरुवारी एकदिवसीय संप पुकारला होता. मात्र, राज्य शासनाने याची दखल न घेतल्यामुळे शुक्रवारपासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येत आहे.



या आंदोलनात संघटनेचे राज्य खजिनदार राम सूर्यवंशी, राज्य संघटक पांडुरंग गव्हाणे, कोअर कमिटी सदस्य योगेश वाघ, शीला कांबळे, सुरेखा लहाने, लातूर शाखेच्या अध्यक्षा छाया चव्हाण, उपाध्यक्ष संजीव लहाने, रेणुका पाटील, सचिव भाग्यश्री जोगदंड, सहसचिव भगवान केंद्रे, खजिनदार बालिका सावंत, सहखजिनदार दीपक शिंदे, संभाजी केंद्रे, पाठ्यनिर्देशिका अंजना गिरी, सुनीता गिरी, लातूर स्त्री रुग्णालयातील सचिव आशा कुरुळेकर, संघटक शीला गोचडे, किरण निकम, मीना दैवज्ञ, निर्मला गाडेकर, धनश्री गोसावी, सतीश करे, ज्ञानेश्वर मुंडे, अमित मल्लिशे, संतोष केंद्रे, शरद वाडकर, आनंद पवार, रवी मुदमे आदी सहभागी झाले आहेत.

## नर्सेस असोसिएशनचा जिल्हा कचेरीवर आक्रोश मोर्चा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ जुलै -**
पुरुष नर्सेसवर शासनाकडून होणाऱ्या अन्यायाच्या निषेधार्थ शुक्रवारी नर्सेस असोसिएशन समिती, लातूरच्यावतीने लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

यावेळी शासनाच्याविरोधात घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्यामार्फत शासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

'डीएमआरई' मधील ८०:२० आणि 'डीएचएस' मधील ९०:१० हा नियम रद्द करून पुरुष संवर्गाला न्याय देण्यात यावा, कंत्राटी पदभरती प्रक्रिया बंद करण्यात यावी, कंत्राटी भरतीचा शासन निर्णय रद्द करण्यात यावा, आदी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्यामार्फत शासनाला देण्यात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारून ते सरकारपर्यंत पोहोचवून न्याय मिळवून देऊ, असे आश्वासन दिले.

यावेळी नर्सेस असोसिएशन समिती, लातूरचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कातकडे, रोहन कुंडगिर, शिवाजी जावळे, सोमनाथ शिंदे, अभिषेक तुंगीकर, कृष्णा चिंगारे, वैभव रेड्डी, ओंकार डोंगरे, करण सरवदे, अर्जुन फुके यांच्यासह जिल्ह्यातील नर्सिंग पदाधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## खरेदी-विक्री संघातर्फे दिलीपराव देशमुखांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ जुलै -**
येथील रेणुका शेतकरी खरेदी-विक्री संघाची निवडणूक बिनविरोध झाली. त्याबद्दल नूतन संचालकांनी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची भेट घेवून त्यांचा सत्कार केला.

यावेळी जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन तथा रेणापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, रेणुका शेतकरी खरेदी-विक्री २०१ संघाचे नूतन संचालक माणिक सोमवंशी, रमेश पाटील, जाकीर शेख, प्रकाश जाधव, आनंद कातळे, महादेव भिंगे, माधव चंबुले, नारायण अंबेकर, अशोक पाटील, ललिता भिसे, अण्णासाहेब कसबे, रेणापूर बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती शेषराव हाके, सुरेश लहाने, रेणा साखर कारखान्याचे संचालक धनराज देशमुख, स्नेहल देशमुख, सतीश पाटील, प्रभाकर केंद्रे, सुग्रीव मुंडे, प्रकाश सूर्यवंशी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'सीआरपीएफ'च्या जवानांना शपथ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ जुलै -**
क्रीडा कोट्यातून भरती झालेल्या बॅच क्रमांक ३३ चा पासिंग आउट परेड आणि शपथविधी समारंभ शुक्रवारी लातूर येथील केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या प्रशिक्षण केंद्रात पार पडला. यावेळी प्राचार्य तथा पोलीस उपमहानिरीक्षक अमीरुल हसन अन्सारी यांनी जवानांचे कौतुक करून त्यांना मार्गदर्शन केले.



या परेडमध्ये नौकाविहार, तायक्वांदो, ज्युडो, वुशू, जलतरण, वेटलिफ्टिंग, जिम्नॅस्टिक, आर्चरी आणि आइस स्केटिंग यासारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा समावेश होता. या जवानांना १६ आठवड्यांच्या मूलभूत प्रशिक्षणादरम्यान कठोर आणि शिस्तबध्द प्रशिक्षण देण्यात आले. यात ड्रील, फील्ड क्राफ्ट, बॅटल क्राफ्ट, फायरिंग यासारख्या सैनिकी कौशल्यांचा समावेश होता. यावेळी कमांडंट, मुख्य प्रशिक्षण अधिकारी पारसनाथ, इतर राजपत्रित अधिकारी, प्रशिक्षक आणि जवान उपस्थित होते.

शपथविधीच्या प्रेरणादायी क्षणी जवानांनी राष्ट्रसेवा, निष्ठा आणि बलिदानाची शपथ घेतली. आता हे जवान आपापल्या खेळांमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलाचे प्रतिनिधित्व करत भारताचे नाव उज्ज्वल करणार आहेत. केंद्रीय राखीव पोलीस दलाने दहशतवादविरोधी कारवाया, नक्षलविरोधी मोहिमा, निवडणूक सुरक्षा आणि नैसर्गिक आपत्ती निवारणात नेहमी आघाडीची भूमिका बजावली आहे. दलाची शिस्तबध्दता आणि समर्पित सेवाभाव ही त्याची खरी ओळख आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रशिक्षण केंद्राच्या उत्कृष्ट प्रशिक्षणाचे कौतुक केले.

## मंगळवारी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ जुलै -**
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, मॉडेल करिअर सेंटर आणि रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता लातूर येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. हा मेळावा लातूर येथील बार्शी रोडवरील शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन येथे होणार आहे.

या रोजगार मेळाव्यात नामांकित आस्थापना आणि उद्योजक सहभागी होणार आहेत. दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आयटीआय, डिप्लोमा, बी.ई., बी.टेक आदी शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांना या मेळाव्यात सहभागी होता येईल. इच्छुक उमेदवारांनी २२ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता लातूर येथील बार्शी रोडवरील शासकीय निवसी महिला तंत्रनिकेतन येथे स्वतःच्या खर्चाने उपस्थित राहावे. त्यांनी मुलाखतीसाठी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, बायोडाटा, रेझ्युम आणि पासपोर्ट आकाराचे फोटो (पाच प्रती) सोबत आणावेत.

लातूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार आणि नोकरीइच्छुक उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

## जनसुरक्षा कायद्याच्या विरोधामध्ये काँग्रेसची निदर्शने

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ जुलै -**
महाराष्ट्र शासनाने नुकताच जनसुरक्षा कायदा अधिवेशनात संमत केलेला आहे. या कायद्या मधील तरतुदी ह्या लोकशाही प्रणालीच्या विरूध्द आहेत, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या स्वातंत्र्याची व नागरी हक्कांची पायमल्ली होणार आहे. काँग्रेस पक्षाची भूमिका ही कायम या अन्यायकारक ठरणाऱ्या जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात राहीली आहे.

प्रांताध्यक्ष श्री. हर्षवर्धन सपकाळ साहेब, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आ. अमित देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे व लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धिरज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जनसुरक्षा कायद्याच्या विरोधामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय समोर लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात आली.

यावेळी शासनाच्या विरोधामध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर जिल्हाधिकारी महोदयांना जनसुरक्षा कायद्याच्या विरोधामध्ये निवेदन देण्यातआले. या निवेदनाद्वारे जन सुरक्षा विधेयक हे संविधानिक मूलभूत अधिकारांचा गळा घोटणारे असून सरकारच्या असंविधानिक, चुकीच्या धोरणावर जो जो विरोधी पक्ष, संघटना, सामाजिक कार्यकर्ते, सामान्य नागरिक टीकाटिपणी करतील, सरकारच्या विरोधात बोलतील न्यायासाठी संविधानिक मार्गाने रस्त्यावर उतरून आंदोलन करतील अशा सर्व पक्ष संघटना नागरिक यांच्याविरुद्ध बिना चौकशी फौजदारी कारवाई करण्याची तरतूद या जाचक विधेयकात असून या कायद्याचा वापर सरकार त्यांच्या फायद्यासाठी करण्याची दाट शक्यता आहे, त्यामुळे लवकरात लवकर हे जनसुरक्षा विधेयक सरकारने मागे घ्यावे अन्यथा या विधेयका विरोधात काँग्रेस पक्ष आक्रमकपणे तीव्र जन आंदोलन उभा करेल असा इशारा यावेळी देण्यात आला.

## अजित पाटील कव्हेकरांकडून संघटन बळकटीकरणास वेग

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ जुलै -**
भाजपा लातूर शहर जिल्ह्याच्या अध्यक्षपदी अजित पाटील कव्हेकर यांची निवड झाल्यानंतर त्यांनी आता संघटन बळकटीकरणास वेग दिला आहे. आगामी मनपा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर संघटन मजबूत होण्याच्या दृष्टीकोनातून शहर जिल्हा अंतर्गत येणाऱ्या आठही मंडलांच्या कार्यकारिणी त्यांनी जाहीर केल्या आहेत.

या माध्यमातून ४८० पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली असून लवकरच शहर जिल्हा भाजपाचीही कार्यकारिणी जाहीर करण्यात येईल असे जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले आहे.

लातूर शहर जिल्हा अंतर्गत आठ मंडले येत असून यामध्ये श्री सिद्धेश्वर मंडल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मंडल, महात्मा बसवेश्वर मंडल, छत्रपती शिवाजी महाराज मंडल, महर्षी स्वामी दयानंद सरस्वती मंडल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मंडल, छत्रपती संभाजीराजे मंडल, छत्रपती शाहू महाराज मंडल यांचा समावेश आहे. या मंडळांच्या अध्यक्षांची नियुक्ती यापुर्वीच करण्यात आली आहे.

यामध्ये अनुक्रमे सुरेश जाधव, सौ.निर्मला कांबळे, राहूल भुतडा, रोहित पाटील, विशाल हावा पाटील, काकासाहेब चौगुले, सचिन सुरवसे, गोपाळ वांगे यांच्याकडे मंडल अध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. शहर जिल्हा भाजपाच्या अध्यक्षपदी अजित पाटील कव्हेकर यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी संघटन बळकटीकरणासाठी पक्षातील ज्येष्ठांसोबत विस्तृतपणे चर्चा केली आहे.



आगामी महानगरपालिका निवडणुका लक्षात घेता संघटन अधिक बळकट व्हावे यासाठी मंडल कार्यकारिणी गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार प्रदेश महामंत्री आ.संजय केणेकर, संजय कौडगे, पालकमंत्री भोसले, आ.संभाजी पाटील निलंगेकर, आ.रमेश कराड व आ.अभिमन्यू पवार यांच्या मार्गदर्शनाने मंडल कार्यकारिणी मध्ये प्रत्येकी ६० जणांचा समावेश करण्यात आलेला आहे.

मंडल कार्यकारिणी गठीत करताना सर्व जातींना यामध्ये समाविष्ठ करत महिलांनाही सहभागी करून घेण्यात आले आहे. प्रत्येक मंडळाच्या कार्यकारिणीत ६० जणांना स्थान देण्यात आलेले असून याकरीता पक्षनिष्ठा आणि पक्षकार्याला अधिक प्राध्यान्य देण्यात आलेले आहे. या मंडल कार्यकारिणीच्या माध्यमातून शहरातून ४८० जणांना भाजपचे पदाधिकारी म्हणून काम करण्याची संधी मिळालेली आहे. मंडल कार्यकारिणीमध्ये सरचिटणीस, चिटणीस, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष व कार्यकारिणी सदस्य अशी पदे देण्यात आलेली आहे. आगामी काळात प्रत्येक मंडलाअंतर्गत मोर्चा व आघाडी अध्यक्षांचीही निवड करण्यात येणार आहे. या माध्यमातून पक्ष संघटन अधिक व्यापक करत आगामी होऊ घातलेल्या मनपा निवडणुका अधिक ताकतीने लढण्यास बळ मिळणार आहे. या कार्यकारिणीची निवड म्हणजे केवळ नावांची घोषणा नसून आगामी निवडणुकांमध्ये पक्षाचा प्रचार, जनसंपर्क आणि रणनीती अंमलबजावणीसाठी या कार्यकारीन्या महत्वाचा कणा ठरणार असून लवकरच शहर जिल्हा भाजपाची कार्यकारिणी जाहीर करण्यात येईल असे अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले आहे. मंडल कार्यकारिणीत सहभागी झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत या पदाधिकाऱ्यांनी पक्षाची विचारधारा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवून संघटन वाढीसाठी योगदान द्यावे असे आवाहन केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### बहुचर्चित बालाजी मंदिरच्या जमिनीबाबत पुन्हा उच्च न्यायालयात सुनावणी होणार

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील सुभाष रोडवरील श्री बालाजी मंदिर (श्रीराम) च्या मालकीच्या मौजे पारवा (ता.जि. परभणी) येथील सुमारे २५ एक्कर जमीनीच्या कथित विक्री प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने पुन्हा सूनावनी घ्यावी, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

मौजे पारवा शिवारात गट क्रमांक १५५ मध्ये श्री बालाजी मंदिर संस्थानच्या मालकीची सुमारे २५ एक्कर जमीन आहे. मंदिराचे महंत अखिलेश्वरदास यांच्याशी हातमिळवणी करीत काही व्यक्तींनी जमीन खरेदी केली. त्यामुळे भक्तगणात मोठ्या प्रमाणावर अस्वस्थता पसरली. त्याबाबत मंदिराचे निस्सिम भक्त मोहन शाळीग्राम सोनवने यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेऊन या खरेदी-विक्रीच्या व्यवहारावर आक्षेप नोंदविला. परंतु, औरंगाबाद खंडपीठाने सोनवने यांना प्रकरण दाखल करण्याचा अधिकार नसल्याचा निर्णय दिला. त्यामुळेच सोनवने यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या या निर्णयास सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने सर्व पक्षकारांच्या बाजू ऐकल्यानंतर औरंगाबाद खंडपीठाने ८ जानेवारी २०२४ रोजी दिलेल्या आदेशाला अमान्य करीत हे प्रकरण पुन्हा औरंगाबाद खंडपीठाकरीता सूनावनीसाठी पाठविले.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयासमक्ष निकाली निघालेल्या याचिकेस पुनर्जिवित करीत संपूर्ण प्रकरण हे गुणवत्तेवर निकाली काढावे, असे आदेशित करीत दोन्ही बाजूस १८ ऑगस्ट २०२५ रोजी उच्च न्यायालयात हजर रहावे, असे निर्देश दिले आहेत. तसेच या प्रकरणात अंतीम निकाल येईपर्यंत गट क्रमांक १५५ या जमीनीच्या महसूल अभिलेखास उच्च न्यायालयासमक्ष प्रलंबित याचिकेच्या निकालापर्यंत जैसे थे ठेवण्याचे आदेश कायम ठेवले आहेत.

दरम्यान, सोनवने यांच्या बाजूने सर्वोच्च न्यायालयात ॲड. परमजितसिंह पटवालिया यांनी बाजू मांडली. त्यास ॲड. सुजीत देशमुख यांनी सहकार्य केले.

### परभणीत २७ जूलै रोजी महिलांसाठी खुली मेहंदी स्पर्धेचे आयोजन

#### यशस्विनी महिला मंचचा उपक्रम : दोन गटात होणार स्पर्धा

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील यशस्विनी महिला मंचच्या वतीने रविवार, दि. २७ जुलै रोजी शहरातील श्री मंगल कार्यालय येथे दुपारी २ ते ४ या वेळेत खुल्या मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंचच्या अध्यक्षा डॉ. संप्रिया राहुल पाटील यांनी दिली.

यशस्विनी महिला मंचच्या वतीने सातत्याने महिलांसाठी विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांच्या ृखलेत यावेळी मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असणार आहे. स्पर्धा दोन गटांमध्ये होणार असून, एक गट यशस्विनी मंचच्या सदस्यांचा तर दुसरा गट खुल्या नागरिकांचा असेल. मंच सदस्य गटातील स्पर्धकांसाठी सहा विजेत्यांची निवड केली जाईल. यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिकांसह तीन उत्तेजनार्थ पारितोषिकांचा समावेश असेल. खुल्या गटातील विजेत्यांना तीन आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत.

या स्पर्धेसाठी कोणतीही प्रवेश फी आकारण्यात आलेली नाही, त्यामुळे इच्छुक स्पर्धक मोफत सहभाग घेऊ शकतात. मात्र, नोंदणी आवश्यक आहे. स्पर्धकांनी ठिक १.३० वाजता श्री मंगल कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक आहे. स्पर्धकांनी स्वतःचा मेहंदी कोन घेऊन यावे, आयोजकांकडून मेहंदी साहित्य पुरविण्यात येणार नाही. स्पर्धेचा कालावधी ४५ मिनिटांचा असेल. पेपरवर डिझाईन बनविण्यास परवानगी नाही. स्पर्धक स्वतःच्या हातावर मेहंदी काढू शकतात किंवा एखाद्या पार्टनरच्या हातावरही डिझाईन करू शकतात. डिझाईनसाठी घड्याळ लावण्याच्या भागाच्या थोडक्या खाली असलेल्या मनगटापर्यंत डिझाईन काढणे आवश्यक आहे. अंतिम निर्णय परीक्षकांचा असणार आहे व तो सर्वांना बंधनकारक राहील.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी बंधनकारक असून, ती दि. २६ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत करावी लागेल. इच्छुकांनी आ. डॉ. राहुल पाटील यांच्या शिवाजी नगर येथील तोरणा निवास कार्यालयात कृष्णा शिंदे (मो. ८०८०९२१९१४) यांच्याशी संपर्क साधून नाव नोंदवावे, असे आवाहन यशस्विनी महिला मंचच्या अध्यक्षा डॉ. संप्रिया पाटील यांनी केले आहे.

### जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाबाबत घेतला आढावा

**परभणी,/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद परभणी, महानगरपालिका परभणी आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाबाबत शुक्रवार १८ जुलै रोजी येथील बी. रघुनाथ सभागृहात आढावा बैठक पार पडली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती गीता साखरे होत्या. यावेळी महानगरपालिका क्रीडा अधिकारी राजकुमार जाधव, शारीरिक शिक्षण संघटनेचे अध्यक्ष रणजित काकडे, जिल्हा क्रीडा संकुल समितीचे नवनियुक्त सदस्य गणेश माळवे, राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन, नियोजन आणि ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेतील अडचणी यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये येणाऱ्या अडचणींवर तालुका संयोजकांनी आपली मते मांडली. क्रीडा साहित्याची उपलब्धता आणि खेळाडूंना सुविधा मिळाव्यात यावरही चर्चा झाली.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील विभागीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाविषयी जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती साखरे यांनी मार्गदर्शन केले.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# जिंतूर येथील औद्योगिक वसाहतीला अच्छे दिन कधी येणार ?

## १९८८ साली उभारण्यात आली होती एमआयडीसी, कामगारांना मिळाली आशा



**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील पुंगळा शिवारात १९८८ साली उभारण्यात आलेल्या औद्योगिक वसाहत बाबत एमआयडीसीला अच्छे दिन नक्कीच येतील या भागातील नागरिकांमध्ये आतापर्यंत तसा एकही मोठा उद्योग येथे उभारण्यात आलेला नाही. या भागातील त्यामुळे असंख्य युवक शिक्षण पूर्ण करून नोकरीसाठी पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नाशिक आशा मोठा शहरांमध्ये जावे लागत आहे.

तालुक्यात औद्योगिकीकरण येथील तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा. या हेतूने पुंगळा शिवारात १९८८ साली एमआयडीसीची स्थापना करण्यात आली. ८१.४४ हेक्टर जागेत १०० प्लॉट पाडण्यात आले. सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतीलअसे आश्वासनदेण्यातआले . मात्र, हे आश्वासन आज पर्यंत आश्वासन राहिलेत. सदर एमआयडीसी ५०० लिटर प्लास्टिकच्या टाकी मधून सर्व उद्योजकांना पाण्याचा पुरवठा नळामार्फत केला जात आहे. आठच महिने पाणीपुरवठा केला जातो .उन्हाळ्यात मात्र तीव्र पाणीटंचाई निर्माण होते. सदरील इंधन विहिरीवरून पाणीपुरवठा केला जात असल्याने अपुरापारी पुरवठा होत आहे. उद्योजकांना खाजगी टँकरच्या साह्याने पाणीपुरवठा करावा लागत आहे. सर्वच रोडवर झाडे -झुडपे वाढली आहेत. तसेच रोडवर मागील वीस वर्षांपूर्वी टाकलेले लाईट आज मोडकळी झाली असून एमआयडीसी सर्व अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे .या ठिकाणी पोलीस चौकी नाही, बँकेची व्यवस्था नाही, रोडच्या साईडने नाल्या नाहीत, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शैक्षणिक संस्था नाही, एखादा अपघात झाल्यावर रुग्णालय नाही. विद्युत पुरवठा नियमित होत नाही. या ठिकाण जिंतूर शहराला विद्युत पुरवठा केला जात असल्याने अनेक वेळा लाईन बंद होत आहे. त्यामुळे उद्योजकांचे मोठ्या प्रमाणात नुस्कान होत आहे. अशा अनेक समस्यांनी येथील उद्योजक आपला व्यवसाय बंद करून मोठ्या शहराकडे जात आहेत. याकडे मात्र शासकीय अधिकारी व राजकीय नेत्यांनी जाणून बुजून दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येत आहे. कुठे बोटावर मोजण्याइतकेच छोटे-छोटे उद्योग सोडले तर आजपर्यंतच्या काळात येथे कोणता मोठा उद्योजक इकडे फिरकला नाही. आणि कोणता मोठा तद्योग येथे उभारला नाही. विशेष बाब म्हणजे या भागातील लोकप्रतिनिधीनी सुद्धा येथे मोठे उद्योग उभरावेत, यासाठी प्रयत्न केले नसल्याने नेमकी कोणती आणि कोणाची उदासीनता आहे हेच कळेनासे झाले आहे.

**चौकट क्रं.०१**
**राजकीय पुढाऱ्यांचे अपुरे प्रयत्न या एमआयडीसीमध्ये गेल्या प्रवक्या**
**ना मोठे उद्योग, ना बेरोजगांसाठी रोजगार नोकरीची पायपीट कधी थांबेल या औद्योगिक वसाहतीमध्ये एका इमारतीत आयटीआय आहे. पण नोकरी नाही. त्यामुळे आयटीआयचे शिक्षण पूर्ण करायचे आणि नोकरीसाठी पुणे, मुंबईची वाट धरत आहे, असे चित्र अनेक वर्षांपासून आहे. नोकरीसाठीची पायपीट कधी थांबेल, यावर मात्र कुणीच बोलत नाही.**

**चौकट क्रं.०२**
**वर्षांत मोठ्या प्रमाणावर रोजगानिर्मिती होईल आणि बेरोजगारांच्या हाताला काम मिळेल असा एकही उद्योग येथे आणण्यासाठी**
**राजकीय पुढाऱ्यांनी यासाठी प्रयत्नही केला नाही. परिणामी तालुक्यातील तरुण नोकरी-धंद्यासाठी नाविलाजस्तव मेट्रो -सिटीकडे धाव घेताना दिसत आहेत.**

**चौकट क्रं.०३**
**... स्थलांतराची वेळ आली नसती**
**तालुक्यात वाडीतांड्यांची संख्या जास्त आहे. दरवर्षी दहा हजाराच्यांवर ऊस तोडणीसाठी मजूर स्थलांतर करतात. तेव्हा एमआयडीसीत कारखाने आले असते तर स्थलांतराची वेळ आली नसती. . त्यातच एमआयडीसीपासून संभाजीनगर ते हैदराबाद राष्ट्रीय महामार्गही गेला आहे. असे असतानाही औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योग का आले नाहीत, असे प्रश्न उपस्थित होत आहे.**

**चौकट क्रं.०४**
**एमआयडीसीचे अभियंता यांच्याकडे लेखी व तोंडी तसेच मोबाईलवर अनेक वेळा एमआयडीसीतील समस्या सोडविण्यासाठी तक्रार करूनही या बाबीकडे दुर्लक्ष केले जात आहे.**
**प्रमोद परभणीकर**
**अध्यक्ष उद्योजक संघटना जिंतूर**

**चौकट क्रं.०५**
**जिंतूर तालुक्यातील पुंगळा औद्योगिक वसाहतीमध्ये ८१.४४ हेक्टर औद्योगिक क्षेत्र उद्योजकासाठी संपादित करून तालुक्यात एकूण ४५७ लघु व सुषमा उद्योग आहेत. या उद्योजकांना पाठबळ पायाभूत सुविधा देण्यासाठी एमआयडीसी कडून पर्यत्न होणे आवश्यक आहे. परंतु याकडे प्रशासकी व राजकीय दुर्लक्ष केले. जात आहे.**
**मंचक देशमुख**
**उद्योजक एमआयडीसी जिंतूर**

## जिल्हाधिकारी यांच्या हस्ते स्वामी यांचा केला सन्मान



**सोनपेठ,/प्रतिनिधी:** सन २०२४-२०२५ या कालावधीत पार पडलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणूकांमध्ये वार्तांकनातुन केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते संपादक किरण रमेश स्वामी यांना प्रशस्तीपत्र व पुष्प भेट देऊन सत्कार करण्यात आला.

सोनपेठ येथील किरण स्वामी यांनी निवडणूक काळामध्ये आपल्या साप्ताहिक मधून जनजागृती करत मतदान संदर्भात विविध विषयांवर योग्य वार्तांकन करुन शासनास सहकार्य केले होते. याची दखल घेऊन जिल्हा प्रशासनाने त्यांना सन्मानित केले. यावेळी उपस्थित अपर जिल्हाधिकारी डॉ.प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंडगे व जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

### हरिपाठ स्पर्धेचे आयोजन होणार

**जिंतूर,/प्रतिनिधी-** वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष श्री ह भ प विठ्ठल महाराज पाटील काकाजी सांगली यांच्या नियोजनामध्ये हरिपाठ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्र १४ वर्धापन दिनानिमित्त घेण्यात येणाऱ्या हरिपाठ महिला मंडळांच्या हरिपाठ स्पर्धा संत जनाई मुक्ताई हरिपाठ मंडळाच्या हरिपाठ स्पर्धा घेण्यात येणार आहेत व दिंड्यांना सुंदर पारितोषिक मिळणार आहेत त्याविषयी आज जिल्हा परभणी येथे आढावा बैठक संपन्न झाली बैठकीसाठी प्रमुख उपस्थिती वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्र मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री ह भ प बाळासाहेब महाराज मोहिते नाना वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्र परभणी जिल्हा अध्यक्ष श्री ह भ प माऊली महाराज दाभाडे आडगावकर वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्र परभणी महिला जिल्हाध्यक्ष व महिला जिल्हा उपाध्यक्ष व सर्व जिल्ह्यातील तालुका अध्यक्ष व पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

## महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री ना.हसन मुश्रीफ यांची भांबळे यांनी मुंबई येथे घेतली भेट

**जिंतूर,/प्रतिनिधी:-** महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री मा.ना.श्री हसन मुश्रीफ साहेब यांची मा.आ.विजयराव भांबळे यांनी मुंबई येथे भेट घेतली.

जिंतूरचे मा.आ.विजयराव भांबळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजितपवार गट) पक्षात जाहीर प्रवेश केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते तथा वैद्यकीय शिक्षण मंत्री मा.ना.श्री हसन मुश्रीफ साहेब व माजी कॅबिनेट मंत्री तथा परभणी जिल्ह्याचे माजी पालकमंत्री मा.ना.श्री नवाब मलिक साहेब, राज्याचे विद्यमान सहकार मंत्री मा.ना.श्री बाबासाहेब पाटील साहेब, राज्याचे क्रीडा, युवक कल्याण, अल्पसंख्याक व औकाफ मंत्री मा.ना.श्री दत्तात्रय मामा भरणे साहेब, राज्याचे अन्न व औषध प्रशासन तसेच हिंगोली जिल्ह्याचे माजी पालकमंत्री मा.ना.श्री नरहरी झीरवळ साहेब यांची सदिच्छा भेटी घेतल्या व सर्वांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन मुंबई येथे सत्कार केला. तसेच जिंतूर-सेलू तालुक्यातील विविध समस्या बाबत चर्चा केली. यावेळी सोबत अजयराव चौधरी, नामदेवआप्पा डख, कृष्णकांत देशुमुख भोगावकर, चंद्रकांत गाडेकर, मिलिंद पवार व शंकरआप्पा गंजे ई. सोबत होते.



## कापसावर प्रक्रिया करणारे उद्योगासाठी सवलती द्या,शेतमाल खरेदीचा वेग वाढवा- आ.डॉ.राहुल पाटील यांनी मांडला प्रश्न

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-** कापसावर प्रक्रिया करणारे उद्योगासाठी सवलती द्या,शेतमाल खरेदीचा वेग वाढवा आ.डॉ.राहुल पाटील यांनी मांडले प्रश्न परभणी-मराठवाड्यात कापसावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगासाठी सवलती आणि सॉफ्ट लोन योजना राबवण्याची मागणी करत आ.डॉ.राहुल पाटील यांनी शासकीय खरेदी केंद्रावर शेतमाल खरेदी करण्याच्या विलंबावर आवाज उठवत खरेदी केंद्रावर सुवीधा,बारदाना साहित्य का देत नाहीत असा प्रश्न करत सरकारवर हल्लाबोल केला. विधानसभेच्या अधिवेशनात बोलताना आ.पाटील यांनी परभणीसह मराठवाड्यातील विविध प्रश्नावर सरकारला धारेवर धरले.अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात त्यांनी तळमळीने जिल्ह्यातील शेतीप्रश्न मांडत सरकारचे लक्ष वेधले.उर्जा,रस्ते, शेतमालभाव,खरेदी, शहरातील विकासकामे यावर त्यांनी आवाज उठवला.यावेळी सभागृहात बोलताना ते म्हणाले,आपल्या परभणी जिल्ह्यात व मराठवाड्यात कापसाचे उत्पादन सर्वाधिक आहे. त्यामुळे मराठवाड्यात कापसावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगासाठी सवलती आणि सॉफ्ट लोन योजना राबवण्याची मागणी सभागृहात केली. जेणेकरून आमच्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आधिकचा भाव मिळेल.त्यामुळे कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरु करा अशी मागणी केली.



शेतमाल खरेदी केंद्राच्या सावळ्यागोंधळावर देखील त्यांनी सरकारवर हल्लाबोल केला.ते म्हणाले,शासकीय खरेदी केंद्रावर कुठं बारदाना नाही, कुठं वजनकाटे बरोबर नाहीत, कर्मचारी कमी, गोडाऊन अपुरे असे अनेक प्रश्न धान खरेदीच्या निमित्ताने होतात व परिणामी फटका शेतकऱ्यांना बसतो.कापूस, हरभरा, सोयाबीन खरेदीचं उद्दिष्टच पूर्ण होत नाही. १४ लाख टनाचं ध्येय ठरवलेलं असताना सोयाबीन खरेदीचं फक्त ५५% उद्दिष्ट पूर्ण झालं.या अडचणी दूर करून शेतमाल सुरक्षिततेची हमी शासनाने द्यावी.अशी मागणी केली.

## शिवसेनेकडून भव्य कावड यात्रा आयोजनाबाबत आढावा बैठक संपन्न

**शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांची महिती**

**परभणी ,/प्रतिनिधी:** येत्या २८ जुलै, सोमवार रोजी सकाळी ८ वाजता पहिल्या श्रावण सोमवारी आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य कावड यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी शिवसेनेच्या वतीने एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक नुकतीच पार पडली. ही बैठक सकाळी ११ वाजता शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, परभणी येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत यात्रेच्या संपूर्ण तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यात्रेचा मार्ग पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे: ओंकारेश्वर मंदिर श्रीक्षेत्र त्रिधारा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक नारायण चाळ गांधी पार्क छत्रपती शिवाजी महाराज चौक मृत्युंजय पारदेश्वर महादेव मंदिराजवळून मार्गक्रमण करत श्री बेलेश्वर महादेव मंदिरात जलाभिषेक करून यात्रेचा समारोप करण्यात येईल, अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख श्री. आनंद भरोसे यांनी दिली. या बैठकीस शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी, शाखाप्रमुख, युवासेना पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रेदरम्यान सहभागी होणाऱ्या हजारो श्रद्धाळू भाविकांच्या सोयीसाठी पुढील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# ऑटो लावण्याच्या कारणावरुन खून



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१९ जुलै -**

शहरातील खुदबाईनगर चौकात आज दि.१९ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास एका ५५ वर्षीय व्यक्तीचा खून करण्यात आला. या व्यक्तीवर खंजीराने पोटात तीन-चार वार करण्यात आले असून, घटनेनंतर पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले. मृत व्यक्तीचे नाव शेख अजीम शेख समद (५५) असून ते मूळचे परभणीचे रहिवासी आहेत. सध्या ते खुदबाईनगर, नांदेड येथे वास्तव्यास होते.

शेख अजीम यांनी आपला ऑटो खुदबाईनगर चौकातील इदगाह मैदानाकडे जाणाऱ्या रस्त्यावर लावला होता. त्या ठिकाणी एक पानटपरी होती, जी मोहम्मद इमरान मोहम्मद गौस (४५) याच्या मालकीची आहे. दुकानासमोर ऑटो लावल्याच्या कारणावरून शेख अजीम आणि मोहम्मद इमरान यांच्यात वाद झाला. वादाच्या पार्श्वभूमीवर मोहम्मद इमराननने आपल्या सहकाऱ्यांसोबत चाकूने शेख अजीमवर हल्ला केला. या हल्ल्यात शेख अजीम यांच्या पोटात तीन-चार घाव झाले आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक सुशील कुमार नायक आणि नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आवश्यक सूचना दिल्या असून, मोहम्मद इमरान मोहम्मद गौस याला ताब्यात घेण्यात आले आहे.

## सहस्त्रकुंड सिंचन प्रकल्पाला गती
# जलसंपदा मंत्र्यांकडून दोन महिन्यांत कार्यवाहीचे लेखी आश्वासन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१९ जुलै -**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील सहस्त्रकुंड बहुउद्देशीय सिंचन प्रकल्पासंबंधी महत्त्वपूर्ण लक्षवेधी सूचना मांडण्यात आली. या प्रकल्पाची अंमलबजावणी १६ वर्षांपासून रखडली असून, त्यास गती देण्याच्या दृष्टीने किनवट माहुर विधानसभे आमदार भीमराव केराम यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले. यावर जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुढील दोन महिन्यांत प्रकल्पासंदर्भातील कार्यवाही पूर्ण केली जाईल, असे लेखी आश्वासन विधिमंडळात दिले.

सहस्त्रकुंड बहुउद्देशीय प्रकल्पाचा प्रारंभिक उद्देश यवतमाळ जिल्ह्यातील अंदाजे १२,२४० हेक्टर दुष्काळी, डोंगराळ व आदिवासी भागाला सिंचनाचा लाभ देणे होता. दि. २० जुलै २००९ रोजी रु. ५८३ कोटींना मूळ प्रशासकीय



मान्यता देण्यात आली होती. पुढे किनवट व माहूर या आदिवासी तालुक्यांनाही या प्रकल्पात समाविष्ट करावे, अशी मागणी झाली. मात्र जानेवारी २०११ मध्ये पार पडलेल्या पर्यावरण जनसुनावणीत बाधित गावातील ग्रामस्थांनी बुडीत क्षेत्र जास्त असल्याने तीव्र विरोध केला. त्यानंतर दि. २२ मार्च २०११ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यात भूसंपादन आणि पुनर्वसन खर्च वाढल्यामुळे सुधारित आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले.

सुधारीत आराखडा तयार केल्यानंतर प्रकल्पाची व्यापती बदलल्यामुळे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणने दि. १३ ऑक्टोबर २०१५ रोजी प्रकल्पास दिलेली मान्यता स्थगित केली. यानंतर कोणतीही कामे किंवा खर्च करू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. ही स्थगिती दि. ४ डिसेंबर २०१७ रोजी उठवण्यात आली, आणि प्रकल्पाला नव्याने चालना देण्याचे प्रयत्न सुरू झाले.

सद्यस्थितीत सुधारित आराखड्याचा आधार घेऊन शासनाने दि. ३० नोव्हेंबर २०१८ रोजी रु. ७०७४.३६ कोटी किंमतीचा प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव तयार केला. हा प्रस्ताव दि. १६ जून २०२५ रोजी राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्याकडे सादर करण्यात आला. २३४ वी बैठक दि. २५ जून २०२५ रोजी नाशिक येथे झाली. त्यात प्रकल्पाच्या आराखड्यावर सविस्तर चर्चा झाली असून, समितीची सहमती घेऊन अंतिम प्रस्ताव शासनास सादर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. यानंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे अंतिम मान्यतेसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर केला जाणार आहे.

सुधारीत प्रकल्पाअंतर्गत नांदेड व यवतमाळ जिल्ह्यांतील एकूण अंदाजे ३२,००० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. २०५ दलघमी पाणीसाठा निर्माण होणार असून, डोंगराळ व आदिवासी भागातील शेतकऱ्यांना सिंचनाचा मोठा फायदा होणार आहे.पाळीव प्राणी, वन्यजीव, तसेच संपूर्ण पर्यावरणीय परिस्थितीवर सकारात्मक परिणाम होईल. क्षेत्रातील शेती उत्पादन वाढून, स्थलांतर आणि पाणीटंचाईचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात कमी होईल.दोन दशकांपासून रखडलेल्या सहस्त्रकुंड सिंचन प्रकल्पास अखेर गती मिळण्याची चिन्हं दिसत आहेत. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीस गती मिळाल्यास यवतमाळ आणि नांदेड जिल्ह्यांतील शेतकरी, आदिवासी समाज व ग्रामीण जनता यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मात्र, हे आश्वासन प्रत्यक्षात उतरणे आणि निधीचे निर्गमण होणे हे आता महत्त्वाचे टप्पे ठरणार आहेत.

# ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांत डायलिसिस सुविधा त्वरित उपलब्ध करा-खा.रवींद्र चव्हाण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१९ जुलै -**

ग्रामीण भागातील किडनीच्या आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना डायलिसिससाठी शहरात यावे लागत असल्यामुळे त्यांना वेळेवर उपचार मिळणे कठीण जात आहे. शिवाय आर्थिक अडचणींचाही सामना करावा लागत आहे. तालुकास्तरावरील उपजिल्हा रुग्णालये तसेच ग्रामीण रुग्णालयांमध्ये डायलिसिस सुविधा उपलब्ध करून रुग्णांची होणारी हेळसांड थांबवावी, अशी मागणी खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

# विनापरवानगी गाळे बांधकामाविषयी माहीती सादर करण्याचे उपनिबंधकांचे कृऊबा सचिवास आदेश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१९ जुलै -**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मोकळ्या भूखंडावर विनापरवानगी गाळे बांधण्यात आले असून, त्या गाळ्यांची विक्री करण्यात येत असल्याची तक्रार रऊफ जमीनदार यांनी अॅड.प्रमोद नरवाडे यांच्यामार्फत सहकारी संस्थेच्या उपनिबंधकाकडे केली होती. या तक्रारीची दखल घेत उपनिबंधकांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना या तक्रारी सबंधाने माहिती सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ताब्यातील एसबीआय बँकेच्या जवळील जागेमध्ये विनापरवानगी गाळ्यांचे बांधकाम करण्यात आले. तसेच ते गाळे विक्री करण्यात येत आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यरत संचालक व पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी तसेच महापालिका आयुक्तांची परवानगी न घेता गाळ्याचे बांधकाम केले. यासबंधाने राष्ट्रवादी कॉंग्रेसचे रऊफ जमीनदार यांनी अॅड.प्रमोद नरवाडे यांच्यामार्फत तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेत उपनिबंधकांनी माहिती सादर करण्याचे आदेश कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना दिले आहेत. गाळ्याचे नविन बांधकाम तसेच हस्तांतरण, दोन इमारतीमधील वीस पेक्षा जास्त गाळ्याचे पक्के बांधकाम कोणत्या आधारावर करण्यात आले, कोणत्या आधारावर भाडेतत्वावर विक्री केले, वजन काट्याच्या बाजूचे टेलिफोन भवन गाळे, पारसेवर कंपनीच्या शॉप पुढचे गाळे, विवांश जिमच्या बाजूला असलेले गाळे याची माहिती सादर करावी, तसेच या बांधकामास पणन संचालक पुणे या संस्थेकडून परवानगी घेतली काय, ज्या जागेत बांधकाम केले त्या जागेच्या लेआऊटची पणन संचालकाकडून मान्यता घेतली काय, बाजार समितीने कोणत्या उद्देशाने गाळ्याचे बांधकाम केले, त्यास पणन संचालकाची मान्यता घेतली काय, इमारत गाळा विक्रीच्या येणाऱ्या रक्कमेचे काय विनियोग करणार, महापालिकेची बांधकाम परवानगी व गाळे संख्या तसेच बांधकाम करण्याकरिता गुत्तेदारास अदा करण्यात आलेले बिल व गुत्तेदारानी भरलेली निविदा, रक्कम तपशिल कार्यालयास सादर करण्याचे आदेश सहकारी संस्थेचे उपनिबंधक सिध्दार्थ गायकवाड यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना दिले आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### अभिवक्ता संघाच्या अध्यक्षपदी अॅड. थोरात तर सचिवपदी अॅड. भुरे

**नांदेड-** दि.२ जुलै रोजी अभिवक्ता संघाची बैठक घेण्यात आली या बैठकीत सर्वानुमते अॅड. भिमराव थोरात यांची अभिवक्ता संघ मुदखेड



२०२५- २७ च्या कार्यकारणीचच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तर सचिव पदी अॅड. अमोल भुरे यांची निवड करण्यात आली आहे. मुदखेड अभिवक्ता संघ २०२५-२७ नविन कार्यकारणी अध्यक्ष अॅड. भिमराव थोरात, उपाध्यक्ष अॅड. सुरेखा येरपलवाड, सचिव अॅड. अमोल भुरे, कोषाध्यक्ष अॅड. गणेश देशमुख, सहसचिव अॅड. संतोष लोकरे यांची निवड करण्यात आली. या निवडी प्रसंगी अभिवक्ता संघाचे जेष्ठ सदस्य अॅड. अशोक हामंद, अॅड. बी.एस . निखाते, अॅड.प्रदिप कस्तुरे, अॅड. के.पी. चौदंते, अॅड. एम. एम. हाटकर, अॅड. आशिष महाजन , अॅड. संतोष मगरे, अॅड. गणेश देशमुख, अॅड. के.डी. हामंद, अॅड. गोविंद गुजरवाड, अॅड. तानाजी ढगे व ईतर वकील मंडळी उपस्थित होते.

### मतिमंद व अपंग विद्यार्थ्यांना समानतेची वागणुक हि सर्वांची जबाबदारी-न्या.जाधव

**हदगाव-** समाजात वावरतांना मतिमंद व अपंग विद्यार्थ्यांना समानतेची वागणुक हिच सर्वांची जबाबदारी आहे. मतिमंद व अपंग विद्यार्थी यांना आपले जीवन व्यतीत करताना इतरांप्रमाणेच मानसन्मान व समानतेची भावना आपण ठेवली पाहिजे असे प्रतिपादन न्यायमुर्ती



अमरजीत भारतराव जाधव यांनी सम्राट अशोक निवासी मतिमंद विद्यालय येथे कायदेविषयक शिबिररात मार्गदर्शन करताना केले. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड यांच्या निर्देशानुसार मानसिक आजारी आणि बौध्दिक अपंग व्यक्तींसाठी विशेष कायदेशीर जागरुकता कार्यकम तालुका विधी सेवा समिती, हदगाव आणि अभियोक्ता संघ हदगाव यांच्या संयुक्त विद्यामान सम्राट अशोक निवासी मतिमंद विद्यालय, हदगाव येथे दि. १९ जुलै रोजी सकाळी ९.४० वाजता केले. या कार्यकमाचे सुत्रसंचालन अॅड. एस.जे. तोष्णीवाल, मार्गदर्शन अॅड. डी. आर. सुर्यवंशी यांनी केले. सदर कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप मा. न्यायाधीश ए.बी.जाधव साहेब यांनी केला तसेच अॅड ए. व्ही. कोंडामंगल यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमास एकूण ९० मंतिमंद व अपंग विद्यार्थी हजर होते.

### एमआयटीच्या विभागीय समन्वयकपदी डॉ. गणेश जोशी

**नवीन नांदेड-** एमआयटीअंतर्गत राष्ट्रीय सरपंच संसदच्या संभाजीनगर विभागीय समन्वयकपदी डॉ. गणेश जोशी यांची निवड करण्यात आली



आहे. एमआयटी वर्ल्ड पीस युनिर्व्हसिटी पुणे व राष्ट्रीय सरपंच संसद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ व २० जुलै रोजी श्रीक्षेत्र आळंदी पुणे येथे महाराष्ट्र वारकरी किर्तन गोलमेज परिषद आयोजित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने राज्यातील ५० ज्येष्ठ किर्तनकार राष्ट्रीय सरपंच परिषदेचे शंभर प्रमुख पदाधिकारी यांना निमंत्रीत करण्यात आले आहे. त्यात नांदेड येथील डॉ. गणेश जोशी यांच्या नावाचा समावेश असून राष्ट्रीय सरपंच संसदच्या विभागीय समन्वयकपदी त्यांची निवड केली आहे. एमआयटी शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल कऱ्हाड, महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे देहूकर, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, राष्ट्रीय सरपंच संसदचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील, सहसमन्वयक प्रकाश महाले यांनी ही निवड केली आहे.

# राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जनविश्वास सप्ताह

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१९ जुलै -**

महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त येत्या २२ तारखेपासून नांदेड जिल्ह्यात जनविश्वास सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली आहे.

तब्बल सहा वेळा महाराष्ट्र राज्याचा सलग उपमुख्यमंत्री होण्याचा बहुमान मिळवणारे जाणते नेतृत्व तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांचा वाढदिवस येत्या २२ जुलै रोजी विविध कार्यक्रमानी साजरा करण्यात येणार आहे. वाढदिवसानिमित्त संबंध महाराष्ट्रामध्ये जनविश्वास सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने नांदेडसह जिल्ह्यातील तालुका पातळीवर ही सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यात रक्तदान शिबिरे , आरोग्य तपासणी शिबीर , वृक्षारोपण अभियान , युवा संकल्प शिबिर, महिला सक्षमीकरण मेळावा , राष्ट्रवादी विचार मंथन सभा , अजितदादा विकास प्रदर्शन , राष्ट्रवादी संवाद यात्रा आदी कार्यक्रमांचा समावेश आहे . या सर्व कार्यक्रमांचे नियोजन करण्याच्या अनुषंगाने आणि जनविश्वास सप्ताह मोठ्या थाटात यशस्वीरित्या पार पाडण्याच्या अनुषंगाने दिनांक २१ जुलै रोजी दुपारी १.०० वाजता आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष या संपर्क कार्यालयात नांदेड येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे . या बैठकीला राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्व आजी-माजी आमदार , राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्व प्रदेश कार्यकारिणी सदस्य , जिल्हाध्यक्ष , तालुकाध्यक्ष ,शहराध्यक्ष , महिला तालुका अध्यक्ष , महिला शहर अध्यक्ष यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सलग्न असणाऱ्या सर्व शाखांचे आजी-माजी पदाधिकारी यांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# हातभट्टी अड्ड्यावर छापा; शेकडो लिटर हातभट्टी दारू, रसायन नष्ट

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.१९ जुलै -**



तालुक्यातील कुपटी शेत शिवारातील ओढ्या जवळ अवैधरित्या गावठी दारू तयार करणाऱ्या हातभट्टी अड्ड्यावर माहूर पोलिसांनी मासरेड कारवाई दरम्यान छापा टाकला.या कारवाईमध्ये दारू तयार करण्यासाठी लागणारे ६०० लिटर मोहफूल सडवा रसायन व १०० लिटर तयार हातभटीची दारू असा एकूण ४० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून एका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहूरचे पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी आज दिनांक १९ जुलै रोजी तक्रारदार खंडाळे यांच्या तक्रारीवरून सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप अन्येबोईनवाड,पोलिस जमादार गजानन चौधरी, संग्राम पवार,पवन राऊत,नागरगोजे यांना सोबत घेऊन माहूर पोलीस स्टेशन हद्दीमधील कुपटी शिवारातील एका ओढ्याजवळ सकाळी १० च्यासुमारास मासरेड कारवाई दरम्यान छापा टाकला असता त्या ठिकाणी अंदाजे ६०० लिटर मोह फुल सडवा रसायन व १०० लिटर तयार हातभट्टीची दारू असा एकूण ४० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांना मिळून आला.

या प्रकरणी रामभाऊ देवराव अंभोरे वय ४५ रा. कुपटी याच्याविरुद्ध माहूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास जमादार गजानन चौधरी हे करीत आहेत.

# भाजपाची अर्धापूर तालुका-शहर कार्यकारीणी जाहीर

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि.१९ जुलै -**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार ड श्रीजयाताई चव्हाण, नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, यांच्या सुचनेनुसार आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाचे तालुकाध्यक्ष बालाजी पाटील गव्हाणे यांनी तालुका तर शहराध्यक्ष योगेश हाळदे यांनी शहर कार्यकारणी जाहीर केली आहे.

जिल्ह्यातील भाजपा जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, मंडलाध्यक्षांच्या नियुक्तीनंतर संपूर्ण कार्यकारिणीच्या नियुक्तीकडे भाजपा कार्यकर्त्यांचे लक्ष लागले होते आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाचे तालुकाध्यक्ष बालाजी पाटील गव्हाणे यांनी तालुका तर शहराध्यक्ष योगेश हाळदे यांनी शहर कार्यकारणी जाहीर केली आहे. भाजपा तालुका उपाध्यक्षपदी सतीश देशमुख लहानकर, राजाराम पवार, अमोल डोंगरे, बाळासाहेब बंडावर, सौ. सुनीता कल्याणकर, सौ. दैवशाळा धुमाळ, सचिव ईश्वर कपाटे, शिवसांब बारसे, अनिल इंगोले, ज्ञानेश्वर भरकड, वैष्णवी भुसे, सौ. सुनीता कल्याणकर, सरचिटणीस अवधूत कदम, बालाजी कदम, कोषाध्यक्षक यशवंत राजेगोरे, युवा मोर्चा अध्यक्ष पवन इंगोले, महिला मोर्चा सौ. मंगलाताई स्वामी, अनुसूचित मोर्चा अध्यक्ष शंकरराव ढगे, किसान मोर्चा गोविंद कदम, ओबीसी मोर्चा गणेश राठोड, अल्पसंख्याक शेख गुलाब तर अनु.जमाती मोर्चा अध्यक्षपदी बाळू कोकाटे तसेच सदस्यपदी ४५ जणांची वर्णी लागली आहे.

शहर कार्यकारणीत उपाध्यक्षपदी व्यंकटी राऊत, तुकाराम साखरे, नितिन डाढाळे, कृष्णा वनटनकर, सौ. पल्लवी लंगडे, श्रीमती रेखाताई साबळे, सरचिटणीसपदी नवनाथ बारसे, प्रमोद मुळे, चिटणीसपदी साहेबराव लोखंडे, रमेश मेटकर, आनंदा वीरकर, सौ. रूपाली कोळी, सौ. शिवानी नागलमे, सौ. रेखाताई कोठूळे तर कोषाध्यक्षपदी विनायक व्यंकटेश शेटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कार्यकारणी सदस्यपदी ४५ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. आगामी स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षसंघटना झपाटून कामाला लागली आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाच्या तालुक्यातील नवीन कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांकडे मोठी जबाबदारी राहणार आहे.

# शेतकऱ्यांना पीकविमा वाटप करा अन्यथा आदोलन : शिवसेना

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१९ जुलै -**

देगलूर, बिलोली, मुखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०२३-२०२४ खरीप हंगामातील पीकविमा वाटप करावे अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने नांदेड येथील न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या कार्यालयासमोर उग्र व तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अप्पर निवासी जिल्हाधिकारी अंबेकर व युनायटेड इंडिया इन्शुरन्स लि. कंपनीच्या अधिकाऱ्यांना घेराव घालून निवेदन शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर, मुखेड शिवसेना तालुकाप्रमुख उमेश पाटील आडलूरकर बिलोलीचे तालुका प्रमुख शिवकुमार बाबणे युवा सेना जिल्हा समन्वयक विपुल पटणे बिलोलीकर सगरोळीकर यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

या बाबतीत अधिक माहिती अशी खरीप हंगाम २०२४ वर्षी शेतकरी बांधवांनी सावकारी, बिन सावकारी, बॅकेचे व्याजीबट्टी, कर्ज काढून महागामोलाचे बियाणे, खते खरेदी करून सोयाबीन, कापूस, उडीद, मुग आदी पिकांची मोठ्या प्रमाणात मोठ्या आशेने पेरणी केली होती पण वारंवार झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पीक वाया गेल्याने शेतकरी



राजा कधी नव्हे एवढा आर्थिक संकटात सापडला होता यांची दखल घेऊन नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तात्कालिन जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार खरीप हंगामातील शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रीम बोनस नुकसान भरपाई पिकविमा कंपनीने वाटप केले होते त्यातसुद्धा अनागोंदी, अनियमितीता, असल्याने असंख्य शेतकरी बांधवांना २५ टक्के रक्कमेपासुन सुध्दा वंचित राहावे लागले होते सध्या या वर्षीच्या खरीप हंगामातील शेतीसाठी लागणारे महागामोलाचे खते, बियाणे किटकनाशके खरेदी करून पेरणी केली आहे पावसाने पुन्हा पाठ फिरवून उघड पडल्याने या वर्षीचा खरीप हंगाम वाया जातो की काय अशी कोरडी दुष्काळी परिस्थिती दिसते आहे तरी पण निसर्गाच्या भरवशावर पुढील मशागत करण्यासाठी आर्थिक अडचण असल्याने मदत मिळणे गरजेचे आहे त्यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना अनुदानाच्या मदतीची अत्यंत गरज आहे गेल्या ५ वर्षा पासुन ओला दुष्काळ पडला असल्याने शेतकरी बांधवांना कोणी उसनवारी सुद्धा देत नाही, थकबाकीदार शेतकऱ्यांना बॅकासुद्धा बॅकेसमोर फटकू देत नाहीत अशा या कठीण प्रसंगी शेतकऱ्यांना हक्काचा पिकविमा हेच एक मदतीचा मार्ग राहील्या असल्याने ज्या शेतकऱ्यांना २५ टक्के नुकसान भरपाई मिळाली अशा शेतकऱ्यांना व २५ टक्के रक्कम न मिळालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ पिक विमा वाटप करण्यात यावा अन्यथा देगलूर, मुखेड, बिलोली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने नांदेड येथील न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या कार्यालयासमोर उग्र व तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अप्पर निवासी जिल्हाधिकारी अंबेकर व युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या अधिकाऱ्यांना घेराव घालून शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे, मुखेड शिवसेना तालुकाप्रमुख उमेश पाटील आडलूरकर, बिलोली चे तालुका प्रमुख शिवकुमार बाबणे सगरोळीकर युवा सेना जिल्हा प्रमुख विपुल पटणे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे

# हिमायतनगरचे भूमिपुत्र आशिष भोरे यांचा जर्मन दौरा

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.१९ जुलै -**

ग्रामीण भागात शिक्षण घेऊन आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करत जर्मनीच्या अग्रगण्य असलेली ऑटोमोबाईल कंपनीमध्ये उच्च पदावर नोकरी करणाऱ्या हिमायतनगर येथील आशिष संजय भोरे या नवतरुण युवकांस जर्मनी च्या वुर्थ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून यावर्षीच्या उत्कृष्ट कामाचे पारितोषिक म्हणून त्यांना विदेशवारीसाठी पाठविण्यात आले त्यांचा विदेश दौरा १७ जुलै ते २४ जुलै दरम्यान होणार आहे त्यामुळे भोरे कुटुंबातील हा पहिलाच तरुण विदेशवारी करणार असल्यामुळे आशिष चे सर्व स्तरातून अभिनंदन होत असल्याचे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले.



जर्मन वुर्थ ऑटोमोबाईल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी चे जाळे सध्या महाराष्ट्र सह नांदेड, परभणी सह हिंगोली जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पसरले आहे. या कंपनीमध्ये हिमायतनगर चे भूमिपुत्र आशिष संजय भोरे हे मागील दोन वर्षापासून एरिया मॅनेजर या पदावर कार्यरत आहे. त्यांच्या कामाची उत्कृष्ट दखल म्हणून कंपनी कडून त्यांना यावर्षीच्या विदेशवारीसाठी सन्मानित करण्यात आले आहे. दिनांक १७ जुलै ते २४ जुलै या दरम्यान विदेशातील कजाकिस्तानच्या दौऱ्यासाठी आशिषची निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीसाठी नांदेड परभणी हिंगोली जिल्ह्याची एरिया मॅनेजर आशिष भोरे, सीनियर मॅनेजर योगेश सोनवले , रीजनल मॅनेजर धीरज दली यांच्या मार्गदर्शनाखाली आशिष भोरे यांना मार्केटिंग क्षेत्रात कंपनीला भरघोस उत्पन्न मिळून दिले.